# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र**

**सत्र–३**

# लिंगभाव लेखापरीक्षण

**(Gender Audit)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम

शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
एम. ए. भाग २ (सत्र ४ : लिंगभाव लेखापरीक्षण) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ६००**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-48427-36-6

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर–४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ ■


अध्यक्ष - **डॉ. अर्चना राजकुमार कांबळे (जगतकर)**
न्यू कॉलेज, १०६२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती प्रतिमा एस. पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. प्रल्हाद एम. माने**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. आनंद लक्ष्मण गाडीवड्डु**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
  ता. कालग, जि. कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती भाग्यश्री मल्लिकार्जुन पाटील**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज, (केएमसी) कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती सविता माधवराव गिरे**
  दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज,
  वडूज, ता. खटाव, जि. सातारा
- **डॉ. वसंत कृष्णा मोरे**
  मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. कृष्णाजी मारूती देसाई**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **डॉ. अर्जुन पांडुरंग जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
  इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
- **डॉ. संदिप मुरलीधर चौधरी**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  एसबीइएस कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स,
  छत्रपती संभाजी नगर
- **डॉ. सुगत शेषराव बनसोडे**
  श्री. शिव-शाहू कॉलेज सरूड,
  ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर
- **डॉ. मधुकर गंगाराम धतूरे**
  विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे,
  ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. अभिजित पाटील**
  ७ए-३०१, अशोक नगर, दादलानी पार्क जवळ,
  बाळकुम, ठाणे (वेस्ट)-४००६०८

# प्रस्तावना

एम. ए. भाग–२, सत्र ३ साठी 'लिंगभाव लेखापरीक्षण' या ऐच्छिक पेपरची निवड करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मी मनःपूर्वक स्वागत करते.

''लिंगभाव लेखापरीक्षण'' या पेपरमध्ये दोन घटकांचा समावेश केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने लिंगभावाचे लेखापरीक्षण, लिंगभाव लेखापरीक्षण कसे करावे या घटकांचा समावेश केला आहे.

शेवटी मी सर्वप्रथम मा. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक, अभ्यासमंडळाचे अध्यक्ष व अभ्यास मंडळाचे सर्व सदस्य, हा पेपर पूर्ण करणारे इतर सहकारी प्राध्यापक आणि दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाले. वरील सर्वांना त्यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

■ **संपादक** ■

**प्रा. (डॉ.) ए. आर. कांबळे (जगतकर)**
न्यू कॉलेज, शिवाजी पेठ, कोल्हापूर,
जि. कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **श्री. बबन पाटोळे**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **श्री. अक्षय बाम्हणे**<br>समाजशास्त्र अधिविभाग,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |

■ **संपादक** ■

**प्रा. (डॉ.) ए. आर. कांबळे (जगतकर)**
न्यू कॉलेज, शिवाजी पेठ, कोल्हापूर,
जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | लिंगभावाचे लेखापरीक्षण | १ |
| २. | लिंगभाव लेखापरीक्षण कसे करावे | ३४ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक १
# लिंगभावाचे लेखापरीक्षण

**घटक संरचना**

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टे

१.३ विषय विवेचन

१.३.१ मूलभूत संकल्पना: लिंग, लिंगभाव, पितृसत्ताक पद्धती, लिंगभाव भूमिका, लिंगभावाचे लेखापरीक्षण

१.३.२ लिंगभाव संबंधित सिद्धांत: उदारमतवादी, जहालवादी, समाजवादी.

१.३.३ जात, वर्ग आणि धर्माच्या दृष्टीने लैंगिक असमानतेचा आकृतिबंध

१.४ सरावासाठीचे प्रश्न

१.५ सरावासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

१.६ सारांश

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ प्रस्तावना:

लिंग अभ्यास हा नेहमीच संशोधन आणि धोरण निर्मितीचा एक महत्त्वाचा भाग राहिला आहे. लिंगसंबंधित मुद्द्यांवर संशोधकांनी केलेले अध्ययन अनेक महत्वपूर्ण दस्तऐवजांचे आधार बनले आहेत. समकालीन काळात, जेव्हा न्याय आणि सामाजिक कल्याण हे शासनाचे प्रमुख लक्ष असते, अशावेळी समस्या परिपक्वपणे ओळखल्या जात नाहीत आणि त्यावर संशोधन होत नाही तोपर्यंत उद्दिष्टे साध्य होऊ शकत नाहीत. केवळ उपयुक्तता केंद्रित आणि तार्किक संशोधनामुळे समस्यांचे निराकरण होऊ शकते. 'स्त्रिया', ही संज्ञा जड अर्थाने वैशिष्ट्यीकृत आहे. सर्वच स्त्रिया एकाच श्रेणीत गणल्या जात नाहीत. ग्रामीण महिलांसारख्या स्त्रियांच्या वर्गातील विविध वर्गांच्या जीवनक्षेत्रात डोकावण्याची गरज आहे; शहरी महिला; सुशिक्षित महिला; अशिक्षित महिला; कुशल, अकुशल महिला; अपंग महिला, एचआयव्ही एड्सची लागण झालेल्या महिला, ट्रान्सजेंडर महिला, लेस्बियन, तरुण मुली, मुले इत्यादी. महिला वर्गाच्या विविधीकरणाचा हा छोटासा संदर्भ या सर्व क्षेत्रांमध्ये संशोधन करणे किती महत्त्वाचे आहे हे स्पष्ट करतो. जर तरुण मनांना असा अभ्यासक्रम (लिंगाचे समाजशास्त्र) शिकवला गेला तर स्त्रीवाद संबंधित प्रवाह आणि समस्यांचे स्पष्ट आकलन होऊ शकेल अशी आशा आहे. स्त्रीवादी निर्माण करण्याची गरज नाही, परंतु स्त्री जीवनाच्या

समस्यांकडे प्रामाणिकपणे लक्ष देणारे शिक्षणतज्ज्ञ आणि संशोधकांचा पंथ निर्माण करण्याची गरज आहे. केवळ अशा अभ्यास आणि प्रशिक्षणांमुळे समस्या कार्यक्षमपणे सोडवता येतात. या संदर्भाने स्त्रीवाद, लिंग आणि विकास आणि यासारखे अनेक सिद्धांत आहेत. प्रमुख विचारवंतांनी व्यक्त केलेले विचार सध्याच्या वाटचालीचा महत्त्वपूर्ण भाग आहेत. यामुळे शिकणाऱ्यांचा संज्ञानात्मक विकास होईल आणि त्यांच्यामध्ये लिंगसंबंधित समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता अधिक पायाभूत आणि स्पष्टीकरण करण्यायोग्य दृष्टिकोन वेळोवेळी निर्माण होईल. लिंगाच्या समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमातील सामग्रीचे संपूर्ण अध्यापन आणि शिक्षण विद्यार्थ्यांना संबंधित समस्या अधिक समजून घेण्यासाठी उपुक्त्त ठरेल. समस्यांचे प्रभावीपणे निराकरण कसे करता येईल याबद्दल आपणास अधिक आकलन होईल.

## १.२ उद्दिष्टे

१. मूलभूत संकल्पना: लिंग, लिंगभाव, पितृसत्ताक पद्धती, लिंगभाव भूमिका, लिंगभावाचे मूल्यमापन समजून घेता येईल.

२. लिंगभाव संबंधित सिद्धांत: उदारमतवादी, जहालवादी, समाजवादी समजून घेता येईल.

३. जात, वर्ग आणि धर्माच्या दृष्टीने लैंगिक असमानतेचा आकृतिबंध समजून घेता येईल.

## १.३ विषय विवेचन:

प्रस्तुत घटकात आपण लिंगभाव विषयक महत्वपूर्ण सिद्धान्त त्याच बरोबर विविध स्त्री सुधारकांनी दिलेल्या संकल्पना आणि वैश्वीक दृष्टीकोन समजून घेणार आहोत. त्याच बरोबर भारतीय समाज सुधारकांचे महत्वपूर्ण योगदान याचीही चर्चा विस्तृत पणे करणार आहोत. जात, धर्म आणि लिंग या बाबत स्त्रीचे असणारे स्थान याचीही येथे चर्चा करणार आहोत. त्याच बरोबर महाराष्ट्रातील प्रमुख स्त्रीवादी विचार प्रवाह सुद्धा समजून घेणार आहोत.

### १.३.१ मूलभूत संकल्पना: लिंग, लिंगभाव, पितृसत्ताक पद्धती, लिंगभाव भूमिका, लिंगभावाचे लेखापारीक्षण.

उपरोक्त बाबतीत आपण विस्तृतपणे सदर संकल्पनांची चर्चा करणारच आहोत. स्त्री-पुरुषांमध्ये भारतातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये विषमता असल्याची दिसून येते त्याचे कारण म्हणजे या गोष्टीसाठी जबाबदार आपणास निसर्ग आहे असे दिसत असल्याचे भासते परंतु, लिंग,धर्म, जात, वंश वर्ग यातील विषमतेप्रमाणे स्त्री-पुरुषांमधील विषमता पूर्णत: मनुष्यनिर्मित असल्याचे दिसते. एका विशिष्ट कालखंडामध्ये या विषमतेचे निर्मिती झाल्याचे आपणास दिसून येते. या घटनेचे कार्यकारणभाव जाणून घेतल्यास आपल्याला असे दिसून येते की, यामागे मानवी श्रेष्ठ-कनिष्ठता हि मानसिकता आणि पुरुषप्रधान संस्कृतीची श्रेष्ठता असल्याचे आपल्याला दिसून येते आणि हेच कारण दुय्यमत्व निर्माण करते. परंतु या परिस्थितीला विचाराने आव्हान देता येते आणि यामध्ये बदल घडवून आणता येतो. समाजामध्ये स्त्री मुलांना जन्म देते म्हणून तिला

दुय्यम लेखणे हे महत्वाचे कारण असून या दुय्यमत्वामुळे स्त्रीला तिच्या न्याय हक्कापासून तिला वंचित ठेवणे हेही कारण अमानवीय आहे असे महत्त्वपूर्ण म्हणावे लागेल. भारत व इतर दक्षिण गोलार्धातील सामाजिक संदर्भात स्त्री-पुरुषांची चिकित्सा करण्याचे विश्लेषक साधन म्हणून चिकित्सेचे हत्यार म्हणून लिंगभाव ही संकल्पना वापरायला हवी. गेर्डा लर्नर, ऑन ओकले, सिलविया वॉलबी, मारिया मिस, या स्त्रीवादी विचारवंताबरोबर बिना अग्रवाल, सास्कीया विरिंगा यांनी विकसित केलेली दक्षिण गोलार्धातील स्त्रीवादी परिदृष्टी त्या अधोरेखित करतात. राष्ट्रीय स्वातंत्र्याचे आंदोलने, विकास योजना, कायदे, भांडवली विकास प्रारूप या सर्व प्रक्रियेतून लिंगभावाची जडणघडण, आपणास या मुद्द्यातून समजून घेता येईल. स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे महत्त्वाचे कारण त्यांच्या शरीरचनेत आहे असे मानण्याची प्रवृत्ती आहे. जेंडर म्हणजे लिंगभाव या संकल्पनेमुळे आपल्याला लिंग आणि लिंगभाव हे दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत हे मांडणी शक्य होते. प्रत्येक जण नर किंवा मादी म्हणून जन्माला येतो आणि जनेंद्रियावरून त्याचे किंवा तिचे लिंग ठरते. परंतु प्रत्येक सांस्कृती मध्ये मुलगा आणि मुलगी यांच्या मूल्यमापनाच्या विशिष्ट पद्धती त्यानुसार मुला मुलींना वेगवेगळ्या भूमिका प्रतिसादाच्या पद्धती नुसार व्यक्तीचे वर्तन घडून येते. अशाप्रकारे जन्मापासून मुला-मुलीसाठी भिन्न सामाजिक आणि सांस्कृतिक असा कृती कार्यक्रमच आखून दिला जातो यालाच लिंगभाव म्हणता येईल. प्रत्येक समाज नर -मादीला हळूहळू एक स्त्री व एक पुरुष म्हणून घडवत असतो त्यांचे अस्तित्व व पुरुषोत्त्व हे (बाईपणा व पुरुषपणा) वेगवेगळ्या भूमिका, वेगळे गुण, हक्क, जबाबदाऱ्या, अपेक्षा व वर्तन प्रकार यातून घडवले जाते. लिंग हे जैविक घटकांनी ठरते परंतु स्त्रिया व पुरुषांच्या लिंगभावाशी निगडित अस्मिता मानसिक व सामाजिक पातळीवर म्हणजेच ऐतिहासिक व सांस्कृतिक घटकांनी ठरतात.

लिंगभाव ही संकल्पना सर्वप्रथम वापरणाऱ्या स्त्रीवाद्यातील एक ज्येष्ठ विचारवंत अँन ओकेले या म्हणतात,''लिंगभाव एक सांस्कृतिक बाब आहे. त्यातून स्त्री व पुरुषाची बाईपनात व पुरुषपणात होणारी सामाजिक वर्गवारी सूचित होते. एखादी व्यक्ती स्त्री की पुरुष हे जैविक पुराव्याने ठरते. परंतु व्यक्तीचे बाईपन पुरुषपण मात्र स्थळ काळानुसार बदलणाऱ्या सांस्कृतिक निकषाशी ठरत असते. म्हणजेच लिंग हे वैशिष्ट्य स्थिर असते. लिंग भाव मात्र बदलत असतो ते सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर असतात हे स्वीकारायला हवे. शेवटी अँन ओकेले म्हणतात की, लिंग भावाला जैविक मूळ नसते. म्हणजेच लिंग व लिंगभावातील संबंध नैसर्गिक अजिबात नाहीत.ते समाज निर्मित व मानव निर्मित आहेत.

**लिंग (Sex)**

लिंग हे नैसर्गिक असते. लिंग हे जीवशास्त्रीय आहे. ते स्त्री-पुरुषाच्या जनन्द्रियातील फरकामुळे दृश्य स्वरूपाचे आहे. लिंगातील भेद हे प्रजनन प्रक्रियेतील कार्यावर अवलंबून आहेत. लिंग हे शक्यतो सहजपणे बदलता येत नाही परंतु असे असले तरी सद्याच्या तंत्रज्ञानामुळे लिंग बदलणे हे आता शक्य झाले असून अपवाद ठरत आहे असे म्हणता येईल.

लिंग या संकल्पनेचा उदय भारतामध्ये १९७० च्या दशकात झाला. लिंग या शब्दांचा उपयोग व्यक्ती अनेक विभागात करू लागला प्राणी वस्तू याबाबत याचा उपयोग सातत्याने सुरूच राहिला. लिंग हे जैविक

दृष्टिकोनातून दर्शवले जाते. परंतु मनुष्य जीवनामध्ये लिंग हे भेदाभेदीचे कारण बनते. त्याच प्रकारे लिंग हे जैविक दृष्टिकोनातून स्त्री–पुरुषांमध्ये सामाजिक, पारंपारिक आणि सांस्कृतिक संदर्भातील लक्षणे दर्शवतात. लिंग हे महिला आणि पुरुषांना परस्पर वेगळे करते. ज्याचा प्रत्यक्ष संबंध जैविक आहे. लिंग हे मनुष्याद्वारे वर्गीकृत केलेले आहे. ज्यामुळे स्त्री आणि पुरुषांची मानसशास्त्रदृष्ट्या सामाजिक निर्मिती झाल्याचे दिसून येते. एखाद्या व्यक्तीचा जन्म झाला त्याचे कारण स्त्री किंवा पुरुष जबाबदार आहेत या दृष्टिकोनातून समजले जाते. परंतु असे असले तरी समाजाच्या माध्यमातून लिंगाचे अस्तित्व ग्राह्य धरले जाते. लिंग शब्दाचा प्रयोग जैविकदृष्ट्या वास्तविक शारीरिक आणि मानसिक प्रभावातून निश्चित केला गेला आहे .

**लिंगभाव (Gender)**

लिंगभाव हा सांस्कृतिक असून मनुष्य निर्मित आहे. भूमिका, गुण, वर्तन प्रकार व जबाबदारी इत्यादींची स्त्रीयोचीत आणि पुरुषोचित अशी विभागणी करतो. लिंग भाव बदलता असतो. काळ, संस्कृती इतकेच काय कुटुंबा कुटुंबात तो बदलतो. लिंग हे शारीरिक आहे तर लिंगभाव समाजात घडवला जातो. स्त्रिया आणि पुरुषांना विशिष्ट प्रकारे वाढवले जाते; यात स्त्रियांनी व पुरुषांनी कसे वागावे हे शिकवले जाते. ह्याच स्त्रीत्व आणि पुरुषत्व ह्या कल्पना होत. ह्या कल्पना माणसांच्या वागणुकीवर खोलवर प्रभाव टाकतात. स्त्रीत्व आणि पुरुषत्वाच्या रूढ कल्पना ह्या स्त्रिया आणि पुरुषांना साचेबद्ध करून एकमेकांविरुद्ध उभे करतात. उदा. स्त्रीने सहनशील, नम्र असावे, आज्ञाधारक असावे, सर्वांशी जुळवून घ्यावे अशी अपेक्षा असते. तर पुरुषांना आक्रमक बनायला मुभा असते. ह्या कल्पना स्त्री–पुरूषांवर अवास्तव ओझे लादतात. उदा. पुरुषांना रडायची मोकळीक नसते. एखादा पुरुष रडायला लागला तर, काय मुलीसारखा मुळूमुळू रडतोस म्हणून हिणवले जाते. एखादी स्त्री जोरजोरात बोलली, हसली तर तिच्याकडे पुरुषी म्हणून बघितले जाते. घरकाम, चूल–मूल ही बाईची जबाबदारी तर घराबाहेरच्या असणाऱ्या जबाबदाऱ्या पुरुषाच्या मानल्या जातात. मुलींना लहानपणी खेळायला बाहुली, भातुकली तर मुलांना सायकल, कार, बंदूक अशी खेळणी दिली जातात. प्रौढ वयात येणाऱ्या जबाबदारीचे प्रशिक्षण लहान वयातच सुरू होते. स्त्री–पुरुषामधला शारीरिक फरक हा प्रामुख्याने त्यांच्या पुनरुत्पादना संदर्भातील आहे. स्वयंपाक, घरसफाई, शिवण–टिपण, शेतातले काम, डॉक्टर, नर्स, इंजिनिअर, शिक्षक इत्यादी . मात्र घरकाम आणि बालसंगोपन ह्या आजही स्त्रीच्याच प्राथमिक जबाबदाऱ्या मानल्या जातात. इतक्या की बाहेरच्या जगातही स्त्रियांना बहुतेकदा घरकामाची विस्तारीत कामे मिळतात उदा. शिक्षिका, नर्स, स्वागतिका अशा प्रकारच्या कामात स्त्रियांचा अधिक भरणा असतो. अगदी शेतीकामातही स्त्रियांना पुरुषाच्या तुलनेत कमी मजुरी देण्याची मानसिकता आढळते. अर्थात काळानुसार आणि समाज परिवर्तनाच्या प्रयत्नांमुळे लिंगभावाच्या कल्पना आता बदलत चालल्याचे ही दिसते त्याच बरोबर नव्या दिशा हि खुल्या होऊ लागल्याचेही चित्र निर्माण झाल्याचे दिसत आहे. या परिवर्तनीय प्रक्रियेत लिंगभाव भूमिकेप्रमाणे बदलताना दिसून येत आहे. लिंगभाव हा सामाजिक –सांस्कृतिक संरचनातून घडवला जातो उदा. जात, धर्म, वय इ. वेगवेगळ्या संस्कृतींनुसार लिंगभाव बदलत राहतो. पुरुषप्रधान समाजात लिंगभावाची जडणघडण पुरुषांना झुकते माप देणारी असते आणि तुलनेने स्त्रियांना पक्षपाताला अधिक तोंड द्यावे लागते. भारतीय समाजव्यवस्था ही पुरुषसत्ताक असल्यामुळे कुटुंबप्रमुख म्हणजेच पुरुषाकडे संपूर्ण

मालमत्तेची मालकी असते. बहुतेकदा स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यम स्थानामुळे अत्याचारांना तोंड द्यावे लागते. अधिकाधिक स्त्रिया सार्वजनिक क्षेत्रात अनेक जबाबदाऱ्या निभावत आहेत आणि स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटनाही वाढत आहेत. ह्यासाठी सामाजिक प्रबोधन आणि स्त्रियांचा माणूस म्हणून आदर समाजात रुजवणे गरजेचे आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की लिंगभाव म्हणजे स्त्रियांचा वेगळा विचार नव्हे तर लिंगभाव म्हणजे एखाद्या समाजातील स्त्रिया आणि पुरुषांची सापेक्ष सामाजिक स्थिती. अर्थात आजपर्यंत प्रामुख्याने स्त्री आणि पुरुष ह्या दोन लिंगभाव अस्मितांचाच विचार झाला आहे. याहून भिन्न लिंग व लिंगभाव अस्मिता समजून त्याचीही लिंगभाव संवेदनशील दृष्टीकोनातून चिकित्सा होणे गरजेचे आहे. जन्मानंतर लगेच कुटुंबाकडून आणि समाजाकडून मुलावर लिंगभावात्मक संस्कार बिंबण्यास सुरुवात होते. अनेक दक्षिण आशियाई देशांमध्ये मुलांचा जन्म झाला की आनंद साजरा केला जातो, तर मुलगी जन्मली की शोक करतात. मुलावर प्रेम, माया, कोड कौतुक, योग्य आहार, आरोग्याची काळजी यांची खैरात असते आणि मुलीला मात्र यातील काहीच मिळत नाही. मुलाने शूरवीर, कर्तबगार असावे, असे सांगितले जाते. तर मुलीने प्रेमळ, लाजाळू, घरगुती असावे असे शिकवले जाते. सर्वच समाजात लिंगभाव नैसर्गिक नाही. तो सामाजिक सांस्कृतिक आहे, याचा पुरावा म्हणजे स्थल, काल आणि समाजपरत्वे लिंगभावामध्ये परिवर्तन होते. उदाहरणार्थ मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलीचे विश्व घरा पुरते किंवा शाळेपुरते मर्यादित असते. परंतु त्याचवेळी त्याच वयातील आदिवासी मुली मात्र घर आणि घराच्या बाहेर मुक्तपणे फिरते. गुरांना चारण्यासाठी जंगलात घेऊन जाते. जंगलात फळे फुले आणि जळणाचे लाकूड मिळवण्यासाठी सराईतपणे झाडावर चढते उतरते. थोडक्यात म्हणजे ती मुक्तपणे संचार करू शकते. आता आपण ज्याची उदाहरणे घेतली त्या दोघेही मुले आहेत. दोघींची शरीर सारखे आहेत पण तरीही दोघींची स्वप्ने, इच्छा, आकांक्षा, गुण आणि क्षमता इत्यादी बाबतीत कमालीचा विरोधाभास जाणवतो. पूर्वी मुलींना शाळेत पाठवले जात नव्हते. मुलगी दहा अकरा वर्षाची झाली, की रात्री नऊ दहा वाजल्यानंतर एकटीने घराबाहेर पडण्यास मज्जाव असे. मुलगी वयात येण्याआधीच म्हणजेच लहानपणीच तिचे लग्न केले जात असे. पण आज परिस्थिती बदलली आहे. सगळ्याच स्त्रीयांना शिक्षण घेता येत नसले तरी बऱ्याच स्त्रिया आजच्या काळात शिकून नोकऱ्या करीत आहेत. थोड्या प्रमाणात का असेना पुरुषांच्या शिक्षणात, भूमिकेत व जबाबदाऱ्यात बदल झालेले आहेत. लिंग भाव परिवर्तनीय आहे असे म्हणतात. कारण विविध कुटुंबात व समूहात तो भिन्न असतो. इतकेच नव्हे तर त्याच कुटुंबात वेगवेगळ्या काळात लिंगभाव वेगळा असतो. स्रीपुरुष आपल्या शरीराचा आकार व ताकद आपण व्यायाम, योग्य वापर, करून बदलू शकतो. स्त्री किंवा पुरुष कुस्तीगीर, व्यायामपट्टू, धावपटू, नर्तक, योगाभ्यास करणारे अशा साऱ्यांची यांची उत्कृष्ट उदाहरण आहेत. त्याचप्रमाणे स्त्रिया त्यांच्या शरीरचनेमुळे प्रजननाचे काम करतात, हे खरेच परंतु आज मूल कधी होऊ द्यायचे, किती अंतराने मुले हवी किंवा नको ते सर्व निर्णय घेता येऊ शकतात. याचा अर्थ प्रजनन ही आज स्त्रियांसाठी इतर प्रजातीतील माद्या सारखी अटळबाब राहिलेली नाही. तेव्हा स्त्री आणि पुरुषांच्या दर्जातीलला फरक आहे, तो संपूर्णतः समाज व संस्कृतीत निर्मीत आहे. त्याचा निसर्गाशी काहीही संबंध नाही. बहुतेक सर्व समाजामध्ये स्त्री-पुरुषांमध्ये विषमता दिसते. याचे कारण लिंग नसून लिंगभाव आहे. समाजात स्त्रियांना अत्यल्प अधिकार असतात संपत्तीवर त्यांचा हक्क नसतो आणि पुरुषापेक्षा अधिक वेळ स्त्रिया कामे करीत असतात, पण त्यांच्या कामाची

योग्य मूल्यमापन केले जात नाही. पुरुषांच्या कामाच्या तुलनेत स्त्रियांच्या कामांची अवहेलना केली जाते. त्यांना मोबदलाही कमी दिला जातो. त्यांना पुरुषाकडून आणि समाजाकडून होणाऱ्या व्यवस्थात्मक हिंसेला तोंड द्यावे लागते व सामाजिक, राजकीय, आर्थिक संस्थांमध्ये त्यांना निर्णयाचे अत्यल्प अधिकार असतात. प्रत्येक समाजात मुला मुलीसाठी वेगवेगळे नियम असतात. जीवनाच्या प्रत्येक पहिली वर नियमांचा प्रभाव पडत असतो आणि साहजिकच त्यांचे भविष्यही या नियमानुसार आकार घेते. आयुष्याच्या अनेक महत्त्वाच्या पैलूवर या नियमांचा प्रभाव पडत असतो आणि साहजिकच त्याचे भविष्यही या नियमानुसार आकार घेत असते. महत्त्वाच्या पैलूवर व नियमांचा कसा परिणाम होतो याची चर्चा थोडक्यात करू.

**वेशभूषा: Attire**

बहुतेक सर्व समाजात मुले मुली, स्त्री-पुरुषांचा उल्लेख वेगळा असतो. काही समाजामध्ये हे वेगवेगळेपणा पुसट असते तर काही ठिकाणी मात्र फारच ठळक असते. काही समाजात स्त्रियांना नखशीखांत पोशाख परिधान करावे लागतात व चेहरा देखील उघडा ठेवण्याची मुभा नसते. लोकांच्या पोशाखाच्या पद्धतीवरून लोकांची एकत्र भेटण्या मिसळण्याची क्षमता, त्यांच्यातील हक्क व स्वातंत्र्याची जाणीव आणि समाजातील प्रतिष्ठा व्यक्त होत असते.

**गुणवैशिष्ट्ये: Attribute**

साधारणपणे अशीच अपेक्षा केली जाते स्त्री ही मृदू, काळजी घेणारी, जोपासना करणारी व आज्ञाधारक असली पाहिजे. तर पुरुषाकडून बळकट, आत्मविश्वास पूर्ण, स्पर्धात्मक व तार्किक असण्याची अपेक्षा केली जाते. स्त्रीने पोरांना जन्म देण्याची जितके नैसर्गिक आहे तितकेच तिने त्यांचा सांभाळ करणे हेही नैसर्गिक समजले जाते.

**पितृसत्ताक पद्धती: Patriarchy**

कुटुंबातील घटक असलेल्या व्यक्तींवर पित्याची वा वडीलधार्या पुरूषाची अधिसत्ता असणारी कुटुंबाची संघटना म्हणजे पितृसत्ताक कुटुंबपद्धती. अशा पद्धतीच्या कुटुंबातील सर्वच स्त्री-पुरूष व्यक्तींचे जीवन नियंत्रित करण्याचा अधिकार वयाने किंवा नात्याने मोठ्या असलेल्या पुरूषाकडे असतो. परंतु पितृसत्ताक पद्धतीत वयात आलेल्या इतर व्यक्तींचेही अधिकार वाढतात, हे या संदर्भात लक्षात ठेवावे लागते. निरनिराळ्या काळी व निरनिराळ्या देशांत कुटुंबीय व्यक्तींवरील मुख्य पुरूषाच्या अधिकाराच्या मर्यादा वेगगगवेगळ्या दिसतात. मालमत्तेचा वारसा आणि सामाजिक स्थान पित्याच्या वांशिक परंपरेने चालत असे आणि पुढेदेखील पुरूष संततीकडेच संक्रमित होत असे. या प्रकारची कुटुंबपद्धती भारत, चीन, जपान या आशियाई देशांत वा प्राचीन यूरोपात प्रामुख्याने दिसून येते. प्राचीन रोमन प्रजासत्ताकाच्या सुरूवातीच्या कालखंडात पितृसत्ताक कुटुंबपद्धती ही अधिक प्रभावी होती. तेथे तर कुटुंबातील व्यक्तींचे जीवन हे सत्ताधारी पुरूषांच्या हातीच असे, कुटुंबातील व्यक्तींच्या वर्तनास मर्यादा घालून देणे, कुटुंबातील मुला-मुलींचे विवाह ठरवणे, संपूर्ण संपत्तीवर आपली मालकी ठेवणे आदी. अरबांच्या टोळ्यांत अशीच अमर्याद

पितृसत्ता होती. चीनमध्ये कुटुंबप्रमुख, त्याची पत्नी, विवाहित आणि अविवाहित मुले, नातवंडे यांनी बनलेले विस्तारित कुटुंब पिढ्यान्पिढ्या राहात आलेले होते. आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक घटक म्हणून हे कुटुंब कार्य करीत होते. कम्युनिस्ट क्रांतीनंतर कुटुंबविषयक नवे कायदे झाले आणि ही रचना बदलली. अशा रीतीने अनेक प्राचीन मानवी समूहांत अमर्याद पितृसत्ता असलेली कुटुंबपद्धती होती, असे दिसते. आधुनिक काळातदेखील सुधारलेल्या मानवी समाजात पितृसत्ताक पद्धती असली, तरी पित्याच्या अधिकाराला आता खूपच मर्यादा पडलेल्या आहेत. पितृसत्ता ही सामाजिक, राजकीय व आर्थिकदृष्ट्या कार्यरत असणारी सत्तेची संरचना आहे. ज्याच्या आधारे स्त्रीयांना दुय्यमत्त्व दिले जाते. भेदभाव, दुर्लक्ष, नियंत्रण, शोषण, दडपशाही, हिंसा या स्वरूपात स्त्रियांवर कुटुंबात, कामाच्या ठिकाणी व समाजात दुय्यमत्व लादले जाते. आधुनिक स्त्रीवादी विचार प्रक्रियेमधील महत्त्वाची संकल्पना म्हणून 'पितृसत्तेचा विचार होतो. स्त्रीवादी चळवळ, स्त्री-अभ्यास, स्त्रीवादी राजकारण या सर्वांना पुढे नेण्यासाठी 'पितृसत्तेचा विरोध' करणे हा एक कार्यक्रम असतो. 'लिंगभाव' या संकल्पनेबरोबरच 'पितृसत्ता' ह्या संकल्पनेचा वापर स्त्रियांना संरचनात्मक आणि व्यवस्थात्मक दुय्यमत्व देण्यासाठी केला जातो, असा स्त्रियांचा आक्षेप असतो. गेर्डा लर्नर पितृसत्तेच्या निर्मितीविषयी त्यांच्या ''द क्रिएशन ऑफ पेट्रीआर्की'' या पुस्तकात मांडतात कि, पुरुषांप्रमाणेच स्त्रियांदेखील इतिहासाचा विषय व इतिहासाच्या कर्त्या होत्या, स्त्रियांनी विश्वाच्या निर्मितीमध्ये पुरुषांइतकेच किवा त्याहीपेक्षा अधिक योगदान दिले आहे. पितृसत्तेची निर्मिती ही प्रत्यक्षरित्या आदिम राज्यसंस्थेमधून झाली आहे कारण आदिम राज्य संस्थेचा  पितृसत्तेची संरचना व कुटुंब हाच महत्त्वाचा घटक होता. पितृसत्ताक पद्धतीमुळे स्त्रियांच्या लैंगिकतेवर पुरुषांचे नियंत्रण आले. गेर्डा लर्नर याच्या मांडणीनुसार हे स्पष्ट होते की, विविध सामाजिक व्यवस्थामधील पितृसत्तेचा अभ्यास करून असा निष्कर्ष निघतो कि, पितृसत्ताक व्यवस्थेला मूळ असा उगम नसून ही व्यवस्था प्रक्रियेतून विकसित होत गेलेली व्यवस्था आहे.

### लिंगभाव भूमिका: Gender Roles

पुरुष हा कुटुंब प्रमुख, मुख्य कमवता, मालमत्तेचा मालक आणि मालमत्ता सांभाळण्याची निर्णय घेणारा मानला जातो. पुरुषाने मुख्यता, व्यापार उद्दीम, राजकारण, धर्मकारण, व्यवसाय या क्षेत्रात कार्यरत असावे, अशी अपेक्षा असते. या उलट स्त्रीने मुलांना जन्म द्यावा, त्यांचा योग्य सांभाळ करावा, त्यांच्यावर योग्य संस्कार करावेत, घरातील अबालवृध्द, आजारी व्यक्तींची मनोभावी सेवा करावी, घरातील इतर कामे चोखपणे करावीत असे मानले जाते. समाजामध्ये कोणी, कोणता व्यवसाय करावा कोणी कोणत्या जबाबदाऱ्या पूर्ण करावेत कोणी शिक्षण घ्यावे या सर्व गोष्टी समाजाकडून निर्धारित केल्या जातात. म्हणजेच समाजाने नेमून दिलेल्या भूमिका नुसार कोण पुढे जाऊन शिक्षण घेणार किंवा नाही, कोणता व्यवसाय करणार, नोकरी करणार याची निर्णय, त्याची पूर्वतयारी होत असते. स्त्रिया आणि पुरुषांच्या भूमिकांच्या अपेक्षा विविध समाजात बऱ्याच भिन्न असतात. अनेकदा त्यांच्याविषयी नियम केवळ नोंदवलेले असतात आणि स्त्री-पुरुषातील भूमिकांच्या तात्पुरत्या अदलाबदली विषयीच्या अपेक्षा विविध समाजात बऱ्याच भिन्न असतात. स्त्री पुरुष भूमिका बाबत अशी बरीच कार्य आहेत की ज्या स्त्रिया पूर्ण करू शकतात. अशी अनेक एक उदाहरणे आपणास देता येतील. स्त्री पुरुष भूमिका बाबत असे अनेक कौशल्य स्त्री आणि पुरुष दोघांच्या

मध्ये असतात एकमेकांची कामे ते उत्कृष्टरित्या पूर्ण करू शकतात. परंतु समाजामध्ये परस्पर विरोधी केलेली कामे आज हि नामर्दपनाची खून आहे असे मानले जाते. थोडक्यात, याबाबतीत समाजाच्या दृष्टिकोन बदल होणे ही काळाची गरज आहे. इतर काही समाजात मात्र स्त्री-पुरुषांच्या भूमिकांचे काटेकोर विभागणी केलेली असते याचे ठळक उदाहरण अँन ओकेल यांनी ब्राझील मधील मुंदूरुककु जमातीची भारतीयांच्या संदर्भात देतात. लिंगभेद हा तेथे समाजाचा मुख्य आधार असून स्त्री-पुरुषाचे संपूर्ण ध्रुवीकरण करण्यात आले आहे. इथे पुरुष आणि मुले पुरुषांच्या घरात वेगवेगळ्या राहतात तर स्त्रिया आणि मुली वेगवेगळ्या ठिकाणी राहतात. लहान मुले वगळता स्त्री आणि पुरुष आपापल्या लिंगाच्या व्यक्तीशी संवाद साधत असतात. स्त्री-पुरुषात असलेल्या हा शत्रुत्वाचा प्रत्यय त्यांच्या अनेक प्रथांमध्ये आपल्याला येतो. येथील हे लैंगिक ध्रुवीकरण केवळ सामाजिक व आर्थिकबाबी पुरते सिमित नसून व्यक्तिमत्त्वाच्या सर्व पैलूतून ते व्यक्त होत असते. त्यामुळे प्रभुत्व गाजवणे व इतरांच्या वर दुयमत्व लादणे, हे अतिशय महत्वाचे ठरते. त्या समाजातील लोकसाहित्याच्या आणि विधीच्या अनेक उदाहरणातून रूढ लैंगिक भूमिका साकारण्याची क्षमता व नेमून दिलेले व्यक्तिमत्व प्रत्यक्षात आणायचे आहे, याविषयीची काळजी व अशा दिलेल्या साच्यापलीकडे जाण्याची खरी व काल्पनिक आज दोन्ही व्यक्त होतात. आपला असा समज आहे की, पाश्चात्य समाजात स्त्री-पुरुष असा भेदभाव केला जात नाही. पण अँन ओकेल हे दाखवून देतात की, लिंग हा आजच्या पाश्चात समाज रचनेचा आधारभूत घटक असून मुंदूरुककु जमाती प्रमाणे तिथेही लिंगानुसार सामाजिक स्थान आणि भूमिका ठरवल्या जातात. मग मृदुरूकुप्रमाणे पाश्चात्य संस्कृतीत लोकांना सर्वात मोठी चिंता वाटते की, लिंग भावावर आधारलेल्या भूमिका मुळे येणाऱ्या अपेक्षांची, यात नवल ते काय. या अपेक्षाचे दडपण अतिशय ताण निर्माण करते. मनोवैज्ञानिक सांगतात की, स्त्री-पुरुषांनी आपापल्या नेमून दिलेल्या लिंगभाव कक्षेत राहणे त्यांच्या सुरक्षिततेची भावना निर्माण करते. म्हणजे अशा समाजात जर मानसिक स्वास्थ्य हवे असेल तर आपण समाजाने आखलेल्या लिंगभाव कक्षेतच राहिले पाहिजे अशी परिस्थिती निर्माण होते.

**लिंगभावाचे लेखापरीक्षण Gender Audit**

स्त्री-पुरुष समानतेसाठी फक्त लिंगभाव न्याय अस्तित्वात असणे अथवा राष्ट्राच्या आर्थिक अंदाजपत्रकात लिंग व अंदाजपत्रकाची तरतूद करणे एवढेच अपेक्षित नाही तर लिंगभाव अंदाजपत्रकाप्रमाणे त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली का? स्त्री विकासाचा दर प्रगत झाला आहे का, याचा अभ्यास लेखापरीक्षणाद्वारे केला जातो. सार्वजनिक धोरणातील एक मुख्य प्रवाहाचा भाग म्हणून लिंगभाव लेखापरीक्षणाकडे पाहिले जाते. सार्वजनिक धोरणांतर्गातील कायद्यांचा, नियमांवलीचा, कर आकारणीचा, सामाजिक प्रकल्पाचा सर्व अभ्यास करताना तो स्त्री उत्कर्षवादी आहे का? तसा झाला आहे का पाहिले जाते. लिंगभाव लेखापरीक्षण हे सरकारच्या उत्पन्नाच्या आणि खर्चाच्या परिदृश्याचे विश्लेषण करते म्हणजेच यातून स्त्री विकासाचा अंदाज लावून त्या दृष्टीने नियोजन करता येते. ''लिंगभाव लेखापरीक्षणाचा मूळ उद्देश स्त्री-पुरुष अशी समानता प्रस्थापित करणे, व सामाजिक विषमता नष्ट करणे हा होय''. महिलांसाठी संयुक्त राष्ट्र विकास निधी, राष्ट्रकुल, सचिवालय, आणि आंतरराष्ट्रीय विकास संशोधन केंद्र हे जगातील राष्ट्रांना आणि सल्लागार संघटनांना लिंगभाव लेखापरीक्षण करण्यासाठी प्रोत्साहित करतात. तसेच ते या

लेखापरीक्षणाच्या आलेल्या निष्कर्षाच्या अंमलबजावण्यासाठी राष्ट्रांना प्रेरित करतात. जेणेकरून राष्ट्रीय अर्थसंकल्प लिंग सापेक्ष दृष्टिकोनातून अधिक न्यायसंगत ठरावा.

**लिंगभाव लेखापरीक्षण कशासाठी? (Why gender audit?)**

साधारण राष्ट्रीय अंदाजपत्रक सादर करतेवेळी नागरिक व सर्वसमान या दृष्टीने ते निर्देशित केलेले असते. परंतु प्रत्येक नागरिक मग तो स्त्री किंवा पुरुष असो त्याचप्रमाणे त्याचे आर्थिक परिस्थिती गोष्टीचा विचार राष्ट्रीय अंदाजपत्रकाचा अभ्यास करताना करावा लागेल. कारण स्त्रियांची सामाजिक, आर्थिक परिस्थिती या घटकावर राष्ट्रीय अंदाजपत्रक विचारात घ्यावे लागते व त्यामुळे राष्ट्रीय अंदाजपत्रकात लिंगभाव अंदाजपत्रक तयार केल्याने व लिंगभाव लेखापरीक्षण केल्याने महिलांना आर्थिक लाभ मिळतो की नाही, त्याचा फायदा त्या घेतात की नाही. त्यातून राष्ट्रीय उत्पन्नास फायदा किती, कसा झाला याची माहिती मिळते. त्यामुळे लिंगभाव लेखापरीक्षण आवश्यक आहे. लिंगभाव लेखापरीक्षणामुळे स्त्रियांमधील जागरूकता वाढीस लागेल. आर्थिक गोष्टींमध्ये घटकांमध्ये पुरुषांचा सहभाग हा स्त्रियांपेक्षा जास्त असतो. सामान्यतः लिंगभाव लेखापरीक्षणामुळे स्त्रियांचे आर्थिक जागरूकता जागी होईल व ती आर्थिक बाबतीत राष्ट्रीय अंदाजपत्रकाच्या लिंगभाव अंदाजपत्रकास व त्याच्या लेखापरीक्षणास जास्तीत जास्त सहभाग घेऊन स्वतःची आर्थिक प्रगती साधण्यासाठी व स्त्री-पुरुष समानता निर्माण करण्यासाठी, ती विकसित करण्यासाठी प्रयत्नशील राहील. याशिवाय लिंगभाव लेखापरीक्षणाद्वारे राष्ट्रीय अंदाजपत्रकामधील खर्चाच्या बाबतीत पुरुषाला की स्त्रीला जास्त फायदेशीर ठरल्या आहेत हे पाहता येईल. स्त्री मग मोलमजुरी करणारी, नोकरदारी, गृहिणी, व्यावसायिक अर्थात वेगवेगळ्या क्षेत्रातील व वेगळी आर्थिक स्थिती असणाऱ्या स्त्रियांच्या बाबतीत राष्ट्रीय आर्थिक अंदाजपत्रकात लिंगभाव अंदाजपत्रक तपासले जाते व त्या अर्थाने त्याचे लिंगभाव लेखापरीक्षण केल्याने खऱ्या अर्थाने स्त्रीचे आर्थिक दृष्टिकोनातून स्वातंत्र्य, सक्षमीकरण या गोष्टीस न्याय मिळवण्यासाठी व स्त्री-पुरुष समानता निर्माण होऊन स्त्री सामाजिक मानसन्मान दर्जा प्राप्त होण्याच्या दृष्टीने लिंगभाव लेखापरीक्षण ही एक महत्त्वाचे बाब राष्ट्रीय पातळीवर ठरत आहे.

**भारतातील लिंगभाव अंदाजपत्रक Gender Audit in India**

स्त्री-पुरुष समानता व लैंगिक समानता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने भारतामध्ये २००५ पासून आर्थिक अंदाजपत्रकात महिला केंद्रीत व किंवा लिंगभाव समानतेला अनुसरून अंदाजपत्रक तयार केले जात आसून अंदाजपत्रक तयार करताना प्रामुख्याने शासनाच्या प्रत्येक खात्यामध्ये महिलांशी निगडित काही रकमेची तरतूद त्यांचा विकास व सक्षमीकरण हा मुद्दा समोर ठेवून तरतूद अंदाजपत्रकात केली जाते. अंदाजपत्रकातील काही भागांमध्ये महिलां विकासासाठी १०० टक्के तरतुदीचा ठेवला जातो तर काही भागांमध्ये कमीत कमी ३० टक्के पर्यंतचे रक्कम तरतूद केली जाते. एकंदरीत महिलांचा विकास, स्त्री-पुरुष विषमता कमी करण्यासाठी लिंगभाव अंदाजपत्रकामध्ये आर्थिक तरतुदी केल्या जातात व यास अनुसरून भारतातील आतापर्यंत १६ राज्यांना अशा प्रकारच्या अंदाजपत्रकाचा स्वीकार त्यांच्या राज्यस्तरीय आर्थिक अंदाजपत्रकात केला आहे. यामध्ये असे

निदर्शनास आले आहे की लिंगभाव अंदाजपत्रकाचा सकारात्मक परिमाणाम झालेला दिसून येतो. ही बाब जमेची म्हणावी लागेल.

**लिंगभाव अंदाजपत्रक तयार करण्याचे फायदे: Benefits of preparing a gender budget**

१. लिंग भाव अंदाजपत्रक खऱ्या अर्थाने महिला केंद्रित झाले तर, महिलांचा आत्मविश्वास वाढेल त्या आर्थिक दृष्ट्या सक्षम होतील व आर्थिक स्वातंत्र्य ही त्यांना भक्कमपणे मिळेल.

२. सरकारी क्षेत्रातील असो की खाजगी क्षेत्रातील असो ज्या महिला नोकरदार आहेत.त्यांना महिला सुरक्षितता, मातृत्व काळातील रजा, महिला विकासासाठी समान योजना व कायदे लागू होणे आवश्यक आहे. तर खऱ्या अर्थाने सर्व नोकरदार महिलाना लिंगभाव अंदाजपत्रकाचा उपयोग होऊ शकेल.

३. महिला केंद्रित अंदाजपत्रक हे शासनाच्या प्रत्येक खात्याच्या महिलाविषयक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक खात्यात तशी तरतूद केली जाईल व त्यामुळे याबाबत प्रत्येक खात्याचा लोकप्रतिनिधी स्त्री विकासाच्या दृष्टीने जबाबदारीने व जाणीवेने काम करेल.

४. स्त्री समाजाची अर्धी शक्ती आहे, परंतु स्त्री पुरुष असमानतेमुळे तिचे स्थान गौण ठरवले गेले परंतु महिला लिंगभाव अंदाजपत्रकातील महिलाविषयक आर्थिक तरतुदीमुळे खऱ्या मार्गाने तळागाळातील महिलापर्यंत योजना पोहोचवल्या की नाही, त्याचा फायदा झाला की नाही हे ओळखून त्यादृष्टीने संबंधित अंदाजपत्रकात बदल करणे, सुधारणा करणे शक्य होईल तसेच ते स्त्री विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल. दक्षिण आशियामधील राष्ट्राच्या अंदाजपत्रकातील स्त्रीहीत विषयक भूमिका या २००० मध्ये आयोजित केलेल्या कार्य शाळेमुळे स्पष्ट झाली. लिंगभाव अंदाजपत्रकास किंबहुना महिला केंद्रित अंदाजपत्रकास भारतात चालना मिळाली, अशा लिंगभाव अंदाजपत्रकास सुरुवात झाली असली तरी याचबरोबर देशभरातील निरनिराळ्या विद्यापीठांमध्ये स्त्री अभ्यास केंद्राची हि सुरुवात झाली. विविध स्त्री अभ्यासाच्या माध्यमातून शासनास स्त्रियांची स्थिती लक्षात यावी व या अर्थाने शासनास उपाययोजना राबविता याव्यात, या दृष्टीने भारतात प्रयत्न होत आहेत. एकंदरीत पाहता महिलांना पुरुषांच्या बरोबरीने आणणे, समानता प्रस्थापित करने, स्त्रीचा आत्मविश्वास वाढवणे, तिला स्वयंनिर्भर करणे हेच धोरण या पाठीमागे आहे.

## १.३.२ लिंगभाव संबंधित सिद्धांत: उदारमतवादी, जहालवादी, समाजवादी.

## Theories related to gender: liberal, radical, socialist.

### स्त्रीवादाचा अर्थ Meaning of feminism

पाश्चात्त्य देशांचा सुरुवातीचा इतिहास पाहता, स्त्रिया या फक्त चूल आणि मूल याच कार्यक्षेत्रात अडकलेल्या होत्या. त्यांना सार्वजनिक जीवनात स्थान नव्हते. स्त्री हि फक्त पुरुषांचाच अधिकार समजला जाई. मध्ययुगात स्त्रियांना संपत्तीतवाटा नव्हता आणि शिक्षणाची संधी नव्हती. स्त्रियांचे सामाजिक स्थान,

समाजजीवनातील त्यांचा सहभाग आणि योगदान, त्यांचे विविध प्रश्न व समस्या इत्यादींबद्दलचे विचारमंथन अठराव्या शतकात होऊ लागले.

या विचारमंथनातून स्त्रीवादी विचारधारेचा उगम झाला आणि स्त्रीशिक्षण,स्त्रियांचे राजकीय हक्क, समान संधी अशा अनेक प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधले गेले. ज्ञानोदयाचा एपश्रळसहींशपाशपीं प्रबोधनयुगाचा प्रभाव स्त्रीवादावर पडला. त्यातून 'आम्ही सार्या एकत्र येऊन मिळून जाऊ ', ही प्रबोधनकालातील स्त्रीवादी घोषणा गाजली; पण तिचे संलग्न चळवळीत कधीच रूपांतर झाले नाही. तथापि ज्ञानोदय काळातील काही सुधारणावादी स्त्रियांनी स्वातंत्र्य, समता आणि नैसर्गिक अधिकार हे स्त्री-पुरुष या दोघांनाही सारखेच लागू करावेत, अशी जोरदार मागणी केली. मेरी वुलस्टोनक्राफ्टचा ''ए व्हिन्डिकेशन ऑफ द राइट्स ऑफ विमेन'' (१७९२ ) हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यात मेरीने स्त्री-पुरुषांना शिक्षण, काम आणि राजकारण यांत समान संधी द्यावी; कारण त्या पुरुषांइतक्याच नैसर्गिक दृष्ट्या बुद्धिगम्य-हुशार आहेत, असे ठणकावून लिहिले. त्यांना शैक्षणिक व आर्थिक संधी आणि समान नागरी हक्क दिले, तर त्या पुरुषांएवढ्याच सक्षम व समर्थ बनतील. ज्ञानोदय युगाने राजकीय क्षोभ निर्माण केला होताच, त्याचा परिणाम म्हणून फ्रान्स, जर्मनी आणि इटलीत वैचारिक मंथन होऊन उन्मूलनवादाच्या चळवळीस अबॉलिशन मूव्हमेंट चालना मिळाली. एकोणिसाव्या शतकात स्थित्यंतराची-बदलाची मागणी यूरोप व उत्तर अमेरिकेत होऊ लागली. पॅरिसमधील स्त्रीवादी महिलांनी ''द व्हाइस ऑफ विमेन'' हे दैनिक काढले (१८४८) आणि स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली. स्त्रीशिक्षण, स्त्रियांचे राजकीय हक्क, समान संधी, समान वेतन, कुटुंबांतर्गत आणि कुटुंबाबाहेरील हिंसाचार, श्रमविभागणी अशा बहुविध प्रश्नांकडे या दैनिकाने समाजाचे लक्ष वेधले आणि स्त्रीवादाची सैद्धांतिक भूमिका मांडली. त्याच सुमारास जर्मन लेखिका लूईस डिटमर हिने ''सोशल रिफॉर्म'' हे नियतकालिक काढून स्त्रियांचे प्रश्न चर्चेत आणले. याच सुमारास न्यूयॉर्क राज्यातील सेनेका फॉल्स येथे स्त्रियांच्या हक्कांसाठी विदवत सभा भरली (१८४८) आणि त्यांनी अकरा ठराव संदर्भात संमत केले. त्यांमध्ये स्त्रियांच्या मतदानाचा अधिकार हा प्राधान्याने विचारात घेतला गेला. लिंगभेदाच्या आधारे स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते आणि सामाजिक दमनाला, अन्यायाला त्यांना तोंड द्यावे लागते. त्यासाठी पुरुषप्रधान-पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत बदल होणे आवश्यक आहे. असा समाजवादी समतेचा सिद्धांत तिने मांडला. स्त्रियांना विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अनुक्रमे देशपरत्वे मतदानाचा हक्क प्राप्त झाला आणि त्यांचे काही हक्कही मान्य झाले. स्त्रीवादाचा हा प्रसार-प्रचार पाश्चात्त्य देशांतून आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेत प्रसृत झाला आणि विकसित राष्ट्रांबरोबरच त्याचे लोण अविकसित व विकसनशील देशांत पोहोचले. प्राचीन समाजातील स्त्रियांचा दुय्यम दर्जा होता. स्त्री व पुरुष यांची शारीरिक मानसिक भिन्नता जरी जीवशास्त्री स्वरूपाचे असले तरी सामाजिक स्तरावर स्त्रीला लिंगभेदा आधारित वागणूक मिळू लागली. स्त्री पुरुष असमानता हा मूळ मुद्दा धरून तिला सर्वच क्षेत्रात कमीपणा प्राप्त झाला याचे आपण वेळोवेळी चर्चा केलीच आहे. स्त्री दुय्यमत्व स्थान हे अन्याय विषमतेवर आधारित असल्याने याविरुद्ध स्त्रीत्वाचे दुय्यमत्व स्थान नाकारून माणूस म्हणून व्यक्ती म्हणून समाजात स्थान मिळवण्यासाठी तिचा प्रयत्न सुरू झाला.

त्या व्यवस्थेमध्ये तिला तिचे स्वतःचे स्थान निर्माण करण्याची गरज भासू लागली व यातून स्त्रीवादाचा जन्म झालेला दिसून येतो. ''स्त्रीवाद म्हणजे स्त्री पुरुष समानतेसाठीचा लढा स्त्रीला तिचे गरजेचे, विकासाचे स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठीचा लढा म्हणजेच एकूणच समाज व्यवस्थेमध्ये पुरुषाप्रमाणे स्त्रीला सर्व स्तरावर तिची गुणवत्ता, कार्यक्षमता सिद्ध करण्यासाठी तिचे अस्तित्व एक व्यक्ती म्हणून स्थान मिळवण्याच्या दृष्टीने सर्व समावेशक मांडणी व तिचा अभ्यास म्हणजे स्त्रीवाद होय''. एकूणच स्त्रीवादी संकल्पना स्पष्ट करताना तिला तिच्या अस्तित्वाचा, समानतेचा, स्वातंत्र्याचा अधिकाराचा हक्क प्राप्त करण्यासाठी त्यांनी उभ्या केलेल्या व्यवस्था म्हणजे स्त्रीवाद. जगातील विविध राष्ट्रात या संदर्भात अभ्यास सुरू आहे. आंतरराष्ट्रीय पातळीपासून ते अगदी स्थानिक पातळीपर्यंत स्त्रीवादी संकल्पना अभ्यासताना आपण पाहतो.

**स्त्रीवादाची वैशिष्ट्ये Characteristics of feminism**

**स्त्री विषयक विचारांचा अभ्यास: The study of feminist thought**

स्त्रीवाद ही एक चळवळ आहे हि चळवळ मुळातच स्त्री व्यक्तीला केंद्रींत धरून आहे .पुरुष जसा व्यक्ती आहे तशीच स्त्री हि सुद्धा हि एक व्यक्ती आहे. मात्र पुरुषसत्ताक वृतीतून स्त्रीला कमी लेखण्याची तिला मनुष्यहीन म्हणून वागणूक देण्याची जी प्रथा पूर्वीपासून चालत आली आहे जागतिक पातळीवर फार मोठ्या प्रमाणात विरोध झालेला दिसतो इंग्लंडमध्ये १७ व्या शतकाच्या मध्यंतरी फर्ग्युसन यांनी सुरू केली धर्मनिरपेक्ष स्त्रीवादी चळवळव, तदनंतर मेरी उलस्टोन क्राफ्ट, जे एस मिल, लुसी कोमिसार अशा अनेक स्त्रीवादी विचारवंतांनी स्त्रीविषयक आपापली मते मांडून स्त्रीवादी जनजागृती करण्याचा प्रयत्न केला भारतात राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, म.धो. केशव कर्वे डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, ताराबाई शिंदे अशा अनेक समाजसुधारकाने आपल्या विचार व कृतीतून स्त्रीवादी भूमिकेस प्राधान्य देऊन स्त्री पुरुष स्वतंत्र, समता, बंधुता विकास यासाठी कार्य केलेले दिसते अगदी अलीकडील काळात, विद्युत भागवत, छाया दातार,कमला भसीन या स्त्रीवादी भूमिका विषयी आपले विचार मांडलेले दिसतात एकूणच स्त्रीवादाचे वैशिष्ट्य म्हणून स्त्रीविषयक परखड, स्पष्ट अभ्यास व्यक्त होणारा विचाराचा एक स्वतंत्र भाग म्हणून अभ्यासता येतो.

**स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार Advocacy of Women's Freedom**

स्त्रीने चूल व मुल एवढे सांभाळावे, तिचे कार्यक्षेत्र तेवढेच आहे. तिला कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार नाही. धार्मिक अनिष्ट चालीरीतीच्या बंधनातील जीवन जगावे. तिला शिक्षण नकारले गेले गुलामा सारखेच स्थान देण्यात आले. बालविवाह, सती प्रथा, बुरखा पद्धती अशा अनेक तिच्या मनाविरुद्ध, सक्ती करून तिच्यावर अन्याय अत्याचार केले जात. या सर्व विरुद्ध स्त्रीवादी भूमिका उभा राहताना दिसते. मुळातच पुरुषाप्रमाणे स्त्री सुद्धा एक व्यक्ती आहे. ज्या पद्धतीने स्वतः विकास करण्यासाठी पुरुष प्रयत्नशील असतो तसेच व्यक्ती म्हणून स्त्रीने स्वतःचा विकास साधण्यासाठी जे जे अत्यावश्यक आहे ते प्राप्त करण्यासाठी स्वतः प्रति स्वातंत्र्याची मागणी करणे आवश्यक आहे म्हणून स्त्रीवादी विचार स्त्री स्वातंत्र्याच्या अधिकाराचा पुरस्कार त्यांना करताना दिसतो.

**उदारमतवादी स्त्रीवाद Liberal feminism**

पुरुषसत्ताक मानसिकतेतून, अनिष्ट प्रथा,परंपरा.मानसिक गुलामगीरीतून स्त्रियांची मुक्तता हा स्त्रीवादाचा मूळ हेतू आहे. अर्थात हा हेतू साध्य करताना त्या त्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीनुरूप निर्माण झालेले दिसतात. प्रामुख्याने स्त्रीवादी विचाराचा अभ्यास करताना स्त्रीवादी सिद्धांत अभ्यासणे गरजेचे असते. यामध्ये प्रामुख्याने स्त्रीवादाचा उदारमतवादी दृष्टिकोन, मार्क्सवादी समाजवादी दृष्टिकोन, जहालवादी दृष्टिकोन असा स्त्रीवादी विविध सिद्धांताचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. मुळात उदारमतवादी सिद्धांत व्यक्तीला केंद्रस्थानी मानतो. व्यक्ति हितामध्ये सामाजिक हित साधले जाते व सामाजिकच समाज हितातून समाज विकास आपोआप घडतो. मात्र सार्वजनिक जीवन जगत असताना राज्यसंस्थेने आपली सत्ता मर्यादित ठेवून व्यक्तीवर किमान निर्बंध घालावे व व्यक्तीच्या खाजगी जीवनात पूर्ण स्वातंत्र द्यावे ही भूमिका उदारमतवाद मांडताना दिसतो. व्यक्ती स्वातंत्र्य, व्यक्ती प्रतिष्ठा व समता यावर आधारित समाजजीवनाची जगण्याची, विकासाची संकल्पना उदारमतवाद मांडतो. उदारमतवादाची ही वैचारिक मांडणी विविध उदाहरणात स्त्रीवादी विचारवंतांनी मांडलेली दिसते. स्त्रीला पुरुषाप्रमाणे शिक्षण मिळावे जर तिला शिक्षण प्राप्त झाले तर ती पुरुषाप्रमाणे स्वतःच्या विचार क्षमतेच्या आधारावर आपले हक्क उपभोगेल. पुरुषाप्रमाणे ती नागरी जीवनात आत्मविश्वासाने सहभागी होईल, आपली जबाबदारी पार पाडेल अशी स्त्रीविषयक प्रखर भूमिका मेरी वुलस्टोन क्राफ्ट ने मांडली. स्वातंत्र्याचा खंदा पुरस्कर्ता जॉन स्टुअर्ट मिल यांने १८६९ मध्ये ''दी सब्जेक्शन ऑफ वुमेन'' या पुस्तकात स्त्री स्वातंत्र्य विषयक आपले विचार व्यक्त केले. पुरुषाप्रमाणे स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा, आपले अधिकार बघण्याचा अधिकार असावा असे मत व्यक्त करतात. समान वागणूक समान कामासाठी समान वेतन या पद्धतीने स्त्री-पुरुष समानतेचा स्वातंत्र्याचा ते पुरस्कार करताना दिसतात. एकंदरीत उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांत पुरस्कार प्रभावीपणे स्त्री चळवळीमध्ये स्वीकारलेला दिसतो. उदारमतवादी स्त्रीवादाचा हेतू हा की, स्त्रियांना राजकीय कायदेशीर समता प्राप्त करून देणे, एकदा समाजात स्त्री पुरुष समानता प्रस्थापित झाली की स्त्री तिच्या क्षेत्रात किंबहुना तिला हव्या त्या क्षेत्रात संधीच्या द्वारे स्वतःची कुवत, क्षमता सिद्ध करेल, विवेकवाद, समता, स्वातंत्र्य, व्यक्तिवाद या मूल्याचा स्वीकार करून स्त्री सुद्धा विवेकशील व्यक्ती असल्याने त्यांना पुरुष या व्यक्तीप्रमाणे सर्वाधिकार स्थान, दर्जा,प्राप्त व्हावा व तो विवेकावर व सामाजिक न्यायावर आधारित असावा. अशा पद्धतीची भूमिका उदारमतवादी स्त्रीवाद मांडताना दिसतो. एकंदरीत उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांताचा अभ्यास करताना पुढील मुद्दे ठळक पद्धतीने लक्षात येतात.

१. सर्व व्यक्ती समान आहेत साहजिकच पुरुषाप्रमाणे स्त्री ही एक व्यक्ती असून ती पुरुष समान आहे.

२. उदारमतवादाचे प्रमुख तत्त्व म्हणजे स्वातंत्र्य संधीची समानता स्त्री-पुरुषांना आहे.

३. लिंगावर आधारित विषमता करू नये.

४. उदारमतवादाचा विवेकवादावर विश्वास आहे.

५. सामाजिक व सर्व पातळीवर चांगल्या परिवर्तनासाठी शिक्षण हा प्रमुख मार्ग आहे. त्याचा अधिकार पुरुषाप्रमाणे स्त्रीला असणे गरजेचे आहे.

६. सामाजिक व सर्व पातळीवर चांगल्या परिवर्तनासाठी शिक्षण हा प्रमुख मार्ग आहे. ज्याचा अधिकार पुरुषाप्रमाणे स्त्रीला असणे गरजेचे आहे.

७. स्त्री पुरुष समानता, स्त्रियांच्या बुद्धिमत्तेवर विश्वास, शैक्षणिक संधी, मताधिकार, राजकीय सहभाग, रोजगाराचा हक्क, समान वेतन, संधीची समानता, समान नागरी हक्क अशा विविध महत्त्वाच्या मुद्द्यांना अनुसरून उदारमतवादी विचाराने स्त्रीचे भावविश्व जागे करून त्यासाठी उदारमतवादी स्त्रीवादी विचार आग्रही राहिलेले दिसतात.

**जहालवादी: Radical feminism**

स्त्रीवादाचा निरनिराळ्या सिद्धांतांमधून आणि त्यांच्या परस्परसंबंधांमधून जो विकास घडला, त्यामध्ये स्त्रीच्या गौणत्वाला कारणीभूत ठरणार्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, मानसशास्त्रीय घटकांचा सखोल विचार करण्यात आला. त्याचप्रमाणे स्त्रीत्वाची काही सार्वत्रिक, सार्वकालिक व्याख्या करणे शक्य आहे काय ? स्त्रीत्व हे निसर्गदत्त असते व म्हणून अपरिवर्तनीय असते, की ते एक सामाजिक रचना सोशल कन्स्ट्रक्ट असते व म्हणून परिवर्तनशील असते? असे स्त्रीवादाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे, मूलभूत प्रश्नही उपस्थित करण्यात आले आहेत. स्त्री प्रश्नांचे सैद्धांतिक आणि व्यावहारिक पातळ्यांवर वर्ण, वर्ग, जात इत्यादींशी जे गुंतागुंतीचे संबंध असतात, त्यांच्यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे. स्त्रीमुक्तीचा लढा हा सर्व शोषित, वंचित मानवसमूहांच्या मुक्तीच्या लढ्यांपासून वेगळा काढता येत नाही, याचे एक सुजाण भान या सर्व चर्चेमधून निर्माण झाले आहे. एकूण पाश्चात्त्य स्त्रीवादाच्या विचारसरणीत स्त्रीच्या व्यक्तित्वाचा मानसन्मान, सर्व प्रकारची स्वातंत्र्ये आणि समानता यांवर भर देण्यात आला आहे; तथापि भारतात स्त्री विरुद्ध पुरुष अशी भावना भारतीय संस्कृतीत कधीच नव्हती. उलट, स्त्रियांच्या उद्धाराचे प्रयत्न राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, आगरकर, न्यायमूर्ती रानडे, महर्षी कर्वे इत्यादी. पुरुषांनीच मोठ्या प्रमाणात सुरू केले. स्त्रीवादी सिद्धांताचा अभ्यास करताना मार्क्सवादी समाजवादी स्त्रीवादी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. भांडवलशाही समाज व्यवस्थेत कुमकुवत, गरीब वर्गाचे शोषण केले जाते म्हणून भांडवलशाही व्यवस्थेस मार्क्सवादी विचार विरोध करताना दिसतात. साहजिकच कुमकुवत, शोषित व दास्य वर्ग म्हणून स्त्रीकडे पाहिले जात असल्याने व मार्क्सवादी सिद्धांत हा शोषित दास्य प्रथा यांना विरोध करत असल्याने स्त्रीवादी विचार मार्क्सवादाकडे आकर्षित झालेला दिसतो. कार्ल मार्क्स, एंजल्स लिखाणात भांडवलशाही समाजात होणारी जुलूम, जबरदस्ती, अन्याय, शोषण, गुलामी थांबवण्यासाठी सर्व शोषित घटकांनी एकत्र येऊन लढा करण्याची व क्रांती करण्याची आवश्यकता स्पष्ट केली. साहजिकच स्त्री हा समाजाचे एक महत्वपूर्ण घटक असला तरी तिचे स्थान ही खालच्या दर्जाचे गुलाम म्हणून समजले जात होते. फेडरिक एंजल्स यांच्या मते, आदिवासी समाजात मुक्त लैंगिक संबंध गैर नव्हते. अर्थव्यवस्था स्त्री केंद्रित होती. मातृसत्ताक पद्धती होती. मानवाचे जीवन एका ठिकाणी स्थिर झाल्यानंतर, कुटुंब संस्था निर्मितीत अर्थ उत्पादनाच्या भूमिका बदलल्या व पुरुष

कौटुंबिक व सामाजिक स्थानी सर्वोच्च झाला. साहजिकच संपत्ती, पैसा, समाज नियमावली या सर्व घटकात स्त्रीचे स्थान दुय्यम होत गेले. एंजल्स ने ऐतिहासिक भौतिक वादाच्या आधारे स्पष्ट केले. श्रमविभागणीच्या मुद्द्यावर एंजल्स ने आपल्या The Origin Of The Family Private Property And State या पुस्तकात असे स्पष्ट केले की, कुटुंबात पुरुष भांडवलदार व स्त्री ही श्रमिकांचे प्रतिनिधित्व करते. पुरुषाच्या श्रमाला मोल असते. परंतु स्त्रीच्या कुटुंबातील राबण्याला आणि तिच्या श्रमाला मूल्य नाही म्हणजेच कुटुंब ही व्यवस्था स्त्रीचे दुय्यमत्व दर्शवते. हीच गोष्ट भांडवलदारांना पोषक ठरली. पुरुषाबरोबर समान पातळीवर श्रमाचा मोबदला पुरुषासारखा स्त्रीलाही मिळावा यासाठी मार्क्सवादी दृष्टिकोन प्रयत्नशील ठरतो. स्त्रीवादी विचारवंताने घरात काम करणाऱ्या, कौटुंबिक जबाबदारी सांभाळणाऱ्या स्त्रियांचा आर्थिक विकासात कसा संबंध येतो हे स्पष्ट केले त्याच बरोबर तिच्या या कामाचे बाजारात विक्री होत नसल्याने तिचे श्रम दुय्यम, अर्थहीन ठरवले जाते. उलट तिची घरगुती श्रमातून आर्थिक उत्पादनाच्या माध्यमातून अतिरिक्त मूल्यांची ही निर्मिती करते पण पुरुषशाही किंवा भांडवलशाही एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याने बाजारपेठेत असो की कुटुंबात स्त्रीचे स्थान कमी दर्जाचे लेखते व म्हणूनच भांडवलशाही आणि घरकामाचे श्रम याचे नाते लक्षात घेता स्त्रियांनी आपल्या स्वातंत्र्यासाठी श्रमाच्या बाजारपेठेत प्रवेश मिळवण्यापेक्षा घरात राहून घरकामाचाच मोबदला मागितला पाहिजे असे मार्क्सवादी विचारवंतांचे मत आहे. घरकामाचे सामाजिक महत्त्व सांगून घरकाम ही भांडवलशाहीची अटळ गरज आहे हे डार्कोष्टाने स्पष्ट केले आहे . सार्वजनिक उद्योगधंद्यात स्त्रियांना समान पातळीवर सहभाग घेता आला पाहिजे तसेच त्यासाठी समतावादी शासनाने बाल संगोपन, वृद्धांची देखभाल, कुटुंबात होणारे इतर उत्पादक काम, यांची जबाबदारी उचलली पाहिजे असे मत मार्क्सवादी विचारवंताने मांडले. एकंदरीत घर कामासाठी लागणाऱ्या स्त्रियांच्या श्रमात, त्यांच्या घर कामात मूल्यदिष्टीत दृष्टिकोन प्राप्त करून देण्यासाठी व लिंग भेदातून निर्माण होणाऱ्या स्त्री शोषणाकडे लक्ष वेधण्याचे काम मार्क्सवादी स्त्रीवादी विचाराने केलेली दिसते. उदारमतवाद आणि मार्क्सवाद यातील भूमिका घेऊन समाजवादी विचारसरणी निर्माण झाली. मार्क्सवादी विचाराचा पुढील टप्पा म्हणून समाजवादी विचाराकडे पहावे लागेल. पुरुष व भांडवलशाही या दोन्हीच्या शोषणातून स्त्रिया मुक्त होणे या भूमिकेतून समाजवादी स्त्रीवादी विचार मांडताना दिसतात. जुलैट मिचेलने कुटुंब या घटकाची आधारभूत मुद्द्यांची चर्चा करताना उत्पादन, पुनरुत्पादन, लैंगिकता यास महत्व देताना दिसते. खाजगी संपत्तीचे उच्चाटन करून स्त्रियांना सार्वजनिक जगात, उद्योगधंदात सहभागी झाल्या की स्त्रियांच्या दुय्यमतेचे, शोषणाचे प्रश्न संपुष्टात येत असे नाही. याउलट मिचेल कौटुंबिक संरचना बद्दल समाजवादी दृष्टिकोनातून विचार व्यक्त करतात. कुटुंबामध्ये असणाऱ्या लहान मुलावर स्त्री किंवा पुरुष अशा पद्धतीने संस्कार करण्यापेक्षा माणूस म्हणून जर त्यांच्यावर संस्कार झाले तर कुटुंब ही शोषण व्यवस्थेचा भाग राहणार नाही. किंबहुना पितृसत्ताक कुटुंब पद्धती नष्ट करावी अशी भूमिका समाजवादी स्त्रीवाद स्पष्ट करतो. मानसिकदृष्ट्या स्त्रिया, पुरुषी अन्यायाविरुद्ध, शोषणाविरुद्ध सक्षम उभे राहण्याची गरज समाजवादी स्त्रीवाद सांगतो. मार्क्सवादी स्त्रीवादाने स्त्री शोषणाचे आर्थिक पैलू स्पष्ट करून त्या विरोधात आवाज उठवला. मात्र समाजवादी स्त्रीवादाने आर्थिक शोषणाबरोबरच कुटुंब, पितृसत्ताक पद्धती अशा रचनांमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने

विचार व्यक्त करून स्त्रियांनी स्वतःमध्ये यासाठी सक्षम मानसिकता निर्माण करण्याची गरज स्पष्ट करतात. एकंदरीत मार्क्सवादी/समाजवादी स्त्रीवादी विचाराचा अभ्यास करताना खालील मुद्दे स्पष्ट होतात.

१. आर्थिक परावलंबत्वामुळे स्त्री शोषण, स्त्री अन्याय झाला आहे असे मार्क्सवादी स्त्रीवाद सांगतो.

२. भांडवलशाही व पुरुषसत्ताक पद्धतीमुळे स्त्रियांचे घरगुती काम, श्रम याला मूल्य प्राप्त झाले नाही व स्त्रियांच्या पुनरुत्पादनाचा, अतिरिक्त मूल्याचा विचार केला गेला नाही. तिला दुय्यम स्थान प्राप्त झाले.

३. फक्त श्रम विभाजन हा भागच फक्त स्त्री शोषणास कारणीभूत नाही तर एकूण कुटुंब संस्था, पितृसत्ताक पद्धती व्यवस्था मुळे शस्त्रीचे शोषण फार मोठ्या प्रमाणात झाले आहे.

४. उदारमतवादी स्त्रीवाद सिद्धांत व मार्क्सवादी सिद्धांत यातील विचारांचा समन्वय साधून समाजवादी विचारसरणी निर्माण झाली.

५. अन्याय, शोषणाविरुद्ध स्त्रीने सक्षम मानसिकता तयार करून अत्याचारी पुरुषी व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवणे. यामध्ये पुरुष या व्यक्तीस विरुद्ध नसून पुरुष व्यक्तीमधील वाईट विचाराचारांना विरोध आहे अशा पद्धतीने समाजवादी स्त्रीवादी पुरुष वर्चस्व व पुरुष सत्तेच्या विरोधात आपली मांडणी करताना दिसतात.

६. एकंदरीत स्त्री मुक्तीचा लढा हा लिंग व वर्ग या दोन्ही पातळीवर लढावा लागेल अशी भूमिका मार्क्सवादी समाजवादी स्त्रीवादी सिद्धांत स्पष्ट करतो.

**समकालीन मार्क्सवादी स्त्रीवाद Contemporary Marxist Feminism**

समकालीन मार्क्सवादी स्त्रीवादी विचारवंत असे म्हणतात की, स्त्रीवादी विचाराची बीजे मार्क्सने मांडलेल्या वर्ग व्यवस्थेच्या मूलभूत संरचनेत सामावलेले असून विशेषतः समकालीन भांडवलशाही वर्ग व्यवस्थेच्या संरचनेत सामावलेली आहेत. वर्ग व्यवस्थेत जो लिंगभेद रुजवण्यात आला तो समकालीन भांडवलशाही वर्ग व्यवस्थेत जो लिंग भेद रुजवण्यात आलाय तो समकालीन भांडवलशाही व व्यवस्थेत मध्यमवर्गीयांचा उदय झाल्यावर हे मध्यमवर्गीय स्वतः उत्पादक आणि संघटनात्मक औद्योगिक उगम स्त्रोताचे, कृषी व्यापारी करणाचे आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापाराचे मालक होते. मध्यमवर्गीय स्त्रिया या स्वतः मालमत्ता धारक नव्हत्या तर त्या स्वतः च त्यांच्या पतीची मालमत्ता होत्या व त्यांच्याच ताब्यात होत्या. या स्त्रिया दिसण्यास सुंदर होत्या म्हणून त्यांचा विनिमय होत असे. मध्यमवर्गीय स्त्रिया त्यांच्या पतीची भावनात्मक सामाजिक व लैंगिक सेवा करीत. थोडक्यात भांडवलशाहीवर व्यवस्थित मध्यम वर्गाच्या समावेशा बरोबरच स्त्री पुरुष असमानता अस्तित्वात आली. लिंग असमानता विशेषता: पगारी वर्गात पाहायला मिळते. नोकरदार स्त्रियांना त्यांच्या दुय्यम दर्जामुळे पुरुषाच्या तुलनेने कमी वेतन दिले जाते. हा लिंगभेदाला प्रोत्साहन देणारा ठरला. शेवटी या संदर्भात असे म्हणता येईल की नोकरदार स्त्री ही तिच्या पतीच्या दृष्टीने उत्पादन प्रक्रियेची एक साधन असून तिची स्थिती ही गुलामापेक्षा ही वाईट आहे. असे एकंदर पाहायला मिळते. आजच्या काळात ही परिस्थिती फारशी बदलली असे वाटत नाही. मार्क्सवादी

स्त्रीवादी विचारवंतांच्या मताने लिंगभेद ही जीवशास्त्रीय प्रक्रियेतून आकारलेली विविध कारणाची घटना नसून वर्ग व्यवस्थेच्या संरचनात्मक अपरिहार्य परिणाम आहे.

**जहालवादी स्त्रीवाद/मार्क्सवादी स्त्रीवाद याबद्दलचा दृष्टिकोन: Perspectives on radical feminism/Marxist feminism**

१९७० च्या स्त्रीवादाने उग्ररूप धारण केले व पुढे १९८० च्या दशकामध्ये जहाल स्त्रीवाद पुढे आला. या स्त्रीवादाने भांडवलदार व कामगारांच्या संघर्ष नसून स्त्री-पुरुषांच्यातील संघर्ष हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे असे विचार मांडून स्त्रीवादी विचारांमध्ये आपले उग्र व जहाल विचार व्यक्त केले. **Shulamith Firestone** शुलामिथ फायर स्टोन "The Dialectics of sex", त्याचं बरोबर **The Second Sex (Simone de Beauvoir)** सिमोन द बुव्हाने १९४९ साली स्त्रीवाद आपल्या ग्रंथात स्त्रीवादी दृष्टिकोनामध्ये सर्वार्थाने पुरुषी वर्चस्वाला, पुरुष सत्तेला विरुद्ध दर्शवला आहे. स्त्रीवाद हा स्त्री जीवनावर अनुभवावर आधारित व्यक्त झालेला आहे. जहाल स्त्रीवाद हा स्त्री जीवनावर अनुभवावर आधारित व्यक्त झालेला दिसतो. सामाजिक व्यवस्थेमध्ये जीवन जगताना स्त्री शोषण हे फक्त तेवढ्यापुरते मर्यादित न राहता स्त्रीचा येणाऱ्या सर्व घटकाशी संबंधित येतो. फक्त आर्थिक बाबी पुरते शोषण न राहता लैंगिक, भौतिक, सांस्कृतिक, ज्ञानात्मक, मानसीक अशा सर्व स्वरूपाचे असते व अशा संबंधित घटकाद्वारे तिची शोषण राहते. म्हणून स्त्री शोषणाची व्याप्ती फार मोठी आहे असे मत जहाल स्त्रीवादी विचारवंत व्यक्त करताना दिसतात. स्त्री-पुरुषाचे नाते शोषित आणि शोषक आहे जसे जहाल स्त्रीवाद म्हणतो कारण पुरुष सर्वत्र संपूर्ण नियंत्रण ठेवून आपले वर्चस्व हीच संबंध पद्धतीशीरपणे जोपासतो. स्त्रीचे सामाजिक, राजकीय आर्थिक जगण्यामध्ये पुरुषाचे वर्चस्व असते. म्हणजेच सार्वत्रिक ठिकाणी पुरुष वर्चस्वा बरोबर खाजगी जीवनात म्हणजेच विवाह, कुटुंब संबंध,अपत्य अशा विविध घटकात पुरुषी वर्चस्व स्त्रीवर असते. म्हणजेच स्त्रीचे जीवन खाजगी असो वा सार्वत्रिक पुरुषी वर्चस्वानी व्यापलेल्या आपणास दिसून येते. The Second Sex (Simone de Beauvoir) सिमोन द बुव्हाने १९४९ साली स्त्रीवाद आपल्या ग्रंथात विधान करतात की, आपण बाई म्हणून जन्माला येत नाही तर आपण बाई म्हणून घडविले जाते. एकूण स्त्रीच्या जन्माबरोबर पुरुष सत्ता कुटुंब व्यवस्थेचे तिचे स्थान दुय्यम गौण ठरवले जाते व या दडपणामध्ये तिची स्वतःला कमी लेखण्याची मानसिकता निर्माण होते. एकूणच कौटुंबिक, वैवाहिक व्यवस्थेमध्ये स्त्रीला दुय्यमत्व देऊन तिच्यावर वर्चस्व, नियंत्रण ठेवण्याची पद्धत पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये केली गेल्याने जहाल स्त्रीवाद या व्यवस्थेस दोष देतो. स्त्री-पुरुष संबंधांमध्ये वर्चस्ववादी भूमिका न ठेवता मैत्री भाव वाढवून स्वतंत्र माणूस म्हणून स्वतःच्या अस्तित्व जोपासण्याचे काम स्त्रीने करावे. शिक्षण, नोकरी, राजकीय हक्क प्राप्त झाले पण त्याचबरोबर तिला दिल्या जाणाऱ्या दुय्यम, कनिष्ठ स्थानामुळे तिच्या समोरील समस्या वाढलेल्या दिसतात व या समस्या वाढण्याचे कारण म्हणजे पुरूषी सत्ता होय असे जहालवाद स्त्रीवादी विचारवंत सिमोन द बुव्हा व्यक्त करतात. जीवन जगत असताना स्त्रीचा प्रत्येक मार्ग हा पुरुषाच्या हातात असतो व यातूनच पुरुषी वर्चस्व निर्माण होते, पुरुषी व्यवस्था दिसून येते व त्यामुळे या सर्व पुरुषी व्यवस्थेला जहाल स्त्रीवाद हा विरोध करतो. समाजातील ज्या संस्था लिंगभेद करून स्त्री-पुरुषांना समाजापासून दूर करतात त्या प्रथा, परंपरा आणि

अनिष्ट अशा रूढी या नष्ट केल्या पाहिजेत. कौटुंबिक जबाबदारी, अपत्य प्राप्ती, बाल संगोपन हा पुरुषी सत्तेचाच एक भाग असल्याने स्त्रीने याला बगल देऊन प्रगत प्रजनन तंत्रातील गोष्टी उदाहरणार्थ संतती नियमाची साधने, कृत्रिम गर्भधारणा अशा द्वारे स्वतःला मुक्त करण्यासाठी प्रयत्नशील राहावे. एकूणच जे जे खाजगी ते राजकीय या स्त्रीवादी घोषणा वाक्यातून जहाल स्त्रीवादाची भूमिका स्पष्ट होताना दिसते. एकंदरीत जहाल स्त्रीवादी सिद्धांताचा अभ्यास करताना काही ठळक मुद्दे स्पष्ट होतात ते पुढील प्रमाणे.

१. पुरुषसत्ताक पद्धतीस जहाल स्त्रीवादी विचार विरोध करताना दिसतात.

२. कुटुंब संस्था ही पितृसत्ताक पद्धतीचा भाग आहे म्हणजे ती पुन्हा पुरुषीसत्तेचे अथवा पद्धतीचे प्रतिनिधित्व करत असल्याने जहाल स्त्रीवादाचा कुटुंब पद्धतीस विरोध आहे.

३. खाजगी, सार्वजनिक सर्वच क्षेत्रातील विकासात्मक संस्था पुरुषसत्ताक असल्याने सर्वत्र स्त्रीला गौण, कनिष्ठ दर्जाचे स्थान देण्यात आले असल्याने जहाल स्त्रीवाद या सर्व संस्थांना विरोध करतात त्यांचे समूळ नष्ट करण्याची भाषा बोलतात.

४. जहाल स्त्रीवाद पुनरुत्पादन/ वंश सातत्य, मातृत्व, बाल संगोपन या स्त्री तत्वास दुय्यम स्थान देणाऱ्या घटकांना बगल देऊन प्रगत प्रजनन तंत्रज्ञानाद्वारे स्त्री तत्वास मुक्त विचारांना स्त्रीवाद प्राधान्य देतो.

५. लैंगिक विग्रह, स्त्रीत्व व पुरुषत्व या संशोधपनाचे उच्चाटन हा जहाल स्त्रीवादाचा अंतिम हेतू आहे.

६. जहाल स्त्रीवाद हा मुख्यत्वे स्त्रीच्या स्त्री म्हणून येणाऱ्या अनुभवावर आधारित आहे.

७. स्त्री पुरुष मैत्री भाव, आधुनिक प्रजनन तंत्राचा वापर या गोष्टीद्वारे समाजाची पुनर्बांधणीची अपेक्षा जहाल स्त्रीवाद व्यक्त करतो.

**समाजवादी स्त्रीवाद Socialist feminism**

समाजवादी स्त्रीवाद यांच्यामध्ये, खाजगी मालमत्ता या कल्पनेत स्त्रीच्यादास्याचे मूळ आहे. भांडवलशाहीमुळे हे दास्यत्व टिकून राहिले आहे. जर सर्व स्त्रियाना भाग्यवान व मुक्त व्हायचे असतील तर भांडवलशाही व्यवस्था नष्ट करून समाजवादी समाज रचना निर्माण करावी लागेल अशी समाजवादी स्त्रीवाद्यांची मांडणी होती. अर्थात त्यामागे आर्थिक स्वातंत्र्याने आपोआप समता मिळेल असे समीकरण होते. या स्त्रीवादामध्ये स्त्रियांच्या दुय्यम स्थानाची मूळ कारण खाजगी संपत्ती व वर्ग विभाजित समाजरचना मानल्याचे दिसून येते दिसून येते. कुटुंबासारख्या सामाजिक संस्था ही स्त्रियांची दुय्यम स्थान कायम ठेवत असतात. व्यक्ती विशिष्ट वर्गातील असणे हे सत्ता मिळवण्यासाठी लिंगभेदाप्रमाणे कारणीभूत ठरते. पितृसत्ताक वर्गांमधील संघर्षामध्ये हीच बाब आढळते. समाजवादी दृष्टिकोन असलेल्या स्त्रीवाद्यांच्या मते, स्त्रियांची शक्तीहीनता ही प्रजनन, उत्पादन, कामेच्छा त्याचप्रमाणे बालकांच्या सामाजिक कारणावर आधारित आहे. यासाठी स्त्री संघटना आणि स्त्रिया बद्दलच्या मुद्द्यावर आपले लक्ष केंद्रित करण्याबरोबरच समाजातील अन्य पीडित व शोषित वर्गाच्या संघर्षाशी आपले आंदोलन जोडावे. अशाप्रकारे आणखीही काही दृष्टिकोन असले तरी वरील प्रकार इतके महत्त्वाचे नाहीत एकूण काय सर्व स्त्रीवाद हे स्त्रियांना सर्व प्रकारच्या शोषणातून

अन्यायातून भेदातून मुक्त करू इच्छितात. त्यासाठी सर्वकांश संघर्षावर भर देतात. समाजातील सामान्य स्त्रियांना समता, सन्मान, व स्वातंत्र्य मिळवून देऊन कुटुंबाबाहेर त्यांना स्वतःच्या जीवनावर, शरीरावर स्वतःचा हक्क मिळवून देऊ इच्छितात. अशा प्रकारची विचारसरणी असलेले अनेक पुरुष स्त्रीवादी आहेत. स्त्रिया बाबतच्या सामाजिक परिवर्तनाचे प्रेरक डॉ.बाबासाहेब आंबेडकर, ज्योतिबा फुले अशासारखे पुरस्कर्ते आहेत. अशा स्त्रीवाद्यांपैकी एक महात्मा फुले हे ज्यांनी महाराष्ट्रामध्ये प्रथम पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचार शोध घेऊन त्या विरुद्ध मूलभूत तथ्यांसह लढले. त्यांनी लैंगिक भेदातून होणारे शोषण व विषमता जाणून घेतली. त्यांनी पुरुषाचे वर्चस्व आणि पुरुषप्रधानता समजून घेऊन त्या विरुद्ध कृती केली. त्यांचा स्त्रीवाद हा इतरांना फक्त उपदेश करणारा किंवा विचार मंचावर बोलण्यापुरता नव्हता. तर त्यांच्या स्त्रीवादामध्ये विचार वृत्ती आणि कृती यांची सांगड असलेली दिसून येते. त्यांनी समाजातील स्त्रियांची स्थिती जाणून घेऊन स्त्री शिक्षणाचे कार्य, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, परित्यांकत्यांचे प्रश्न इत्यादी स्त्री विषयक केलेले कार्य पूर्णपणे उदारमतवादी असलेले दिसून येते.या नंतर आपण आधुनिकतावादी स्त्रीवादी दृष्टीकोन समजून घेणार आहोत.

### आधुनिकतावादी स्त्रीवादी दृष्टीकोन: Post Modernist Feminist Perspective

सर्वच स्त्रीवादी दृष्टीकोन हे स्त्रीला मिळणारे दुय्यमत्व याला विरोध नाकरतो. पुरुषप्रधान मानसिकतेचा बिमोड करणे या मागील उद्दिष्ट आहे. स्त्रीने आज प्रत्येक क्षेत्रात आपली छाप पाडलेली आहे. स्व विकास, स्वतंत्रता, स्वायत्तता, स्वयंनिर्णय, सक्रीय सहभाग या गोष्टी स्त्रीला व्यक्ती म्हणून परिपक्व बनवत असतात. त्या मिळवून देण्याचा प्रत्यत्न स्त्रीवादी चळवळीने केला आहे. आपल्या आजच्या प्रस्थापित समाजातील सांकल्पिक, सैद्धांतिक चौकटीमध्ये विचारवंतानी केले आहे. त्याच प्रमाणे हे समाजाजिक वास्तव बदलण्यासाठी काय करावे याचे विवेचन हि सविस्तरपणे केले आहे. काळानुसार स्त्रीवादी चळवळीत जहाल, मवाळ, मार्क्सवादी, पर्यावरनवादी, आधुनिकोत्तत्रर अशा प्रकारच्या विविध विचार प्रणालीचा समावेश सुद्धा स्त्रीवादामध्ये करण्यात आला. विसाव्या शतकाच्या उत्तार्धात स्त्रीवादी सुधारणावादी महिला आंदोलनाला जोर वाढला. त्या चळवळीने स्त्रीयांचे दमन ओळखले. स्त्री दुय्यमत्व निर्माण करणाऱ्या अनेक पैलूवर लक्ष केंद्रित केले. त्याच प्रमाणे पितृसत्ताक पद्धती मधील अमर्यात सत्ता, स्पर्धा, श्रेणीव्यवस्था, वर्चस्ववाद. याचे उच्चाटन करावे असे सुचविले. जेजे व्यक्तिगत आहे ते राजकीय अशी घोषणा करताना स्त्रियांच्या जाणीव जागृतीवर भर दिला. स्त्री आणि पुरुष यांचा विकासाच्या दोन वेगवेगळ्या प्रक्रिया ना मानता दोहोच्या विकासाच्या दृष्ट्यीने एक सर्व समावेशक विचार व्हावा. असे मनोविश्लेषणवादी मानतात. स्त्री हि माणूस आहे. म्हणून व्यक्ती या स्वरुपात तिचा विचार व्हावा. नरनारी ही व्यवस्था नैसर्गिक आहे. परंतु पुरुष प्रधान समाज व्यवस्थेमध्ये लिंग भेदभाव मुद्दाम घडविला गेला. संस्कृतीच्या इतिहासाने स्त्रीची सांगड निसर्गाशी घातली. त्यामुळे स्त्री विषयक प्रश्नाचा विचार निसर्ग सापेक्ष केला पाहिजे. पितृसत्ताक पद्धतीची विचारसरणी ही श्रेणीबद्ध, द्वंद्ववादी आणि वर्चस्ववादी आहे. अशा विचारसरणीमुळे आता पर्यंत स्त्रीचे मोठ्या प्रमाणत शोषन झाले आहे. आधुनिकोत्तर स्त्रीवादी सिद्धांताला मान्यता देणाऱ्या विचारवंत नुसार आधुनिकोत्तर सिद्धांतात काही प्रमुख वैशिष्ट्यांचा समावेश केला जातो.

१. सर्व सामान्यपणे असे स्पष्ट केले जाते की, मानवी अनुभव व मानवी प्रगती यांचे स्पष्टीकरण प्रबोधनाच्या पार्श्वभूमीवर शपथ पूर्वक पूर्ण करण्याची क्रिया म्हणजे या आधुनिकोत्तर स्त्रीवादाचे पहिले वैशिष्ट्य आहे.

२. बुद्धिप्रामाण्यवादी स्वयं कार्य हे सार्वभौम कायद्यानुसार चालते हे आधुनिकोत्तर स्त्रीवादी सिद्धांताचे दुसरे वैशिष्ट्ये होय.

३. आधुनिकोत्तर स्त्रीवादी विचारवंत, विज्ञान याचे तटस्थ पद्धतीने अध्ययन करून सार्वभौमिक फायद्याचे निष्कर्ष काढतात या विचाराचा उपहास करतात, ते या सिद्धांताचे तिसरे वैशिष्ट होय.

४. भाषा हे पारदर्शकता असणारे माध्यम असून त्याद्वारे वास्तवतेचे प्रतिनिधित्व केले जाते भाषा, वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे डावपेच आखणारा घटक नाही हे सिद्धांताचे चौथे वैशिट्य होय.

५. यात कोण कोणत्या विषयाचा समावेश करावा या बाबत स्त्रीवादी आधुनिकोत्तर विचारवंत मतभेद असून त्यातून सत्य, ज्ञान आणि अधिकार यांचा संघर्ष होण्याची शक्त्यता असते व त्यावर अनेक कारणांनी मात करता येते. हे या सिद्धांताचे पाचवे वैशिट्य होय.

६. कोणतेही सत्य हे तटस्थ असल्याचे दिसत नाही. तसेच या सत्यामध्ये विनाशा शिवाय स्वातंत्र्याकडे वाटचाल करण्याची क्षमता नाही व अधिकार नाही हे सिद्धांताचे सहावे वैशिट्य होय.

**महाराष्ट्रातील स्त्रीवादी विचारधारा: Feminist ideology in Maharashtra**

स्त्रीवादी विचारधारेमध्ये ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, डॉ.सुमती क्षेत्रमाडे, डॉ.आम्वेट गेल, कुसमावती देशपांडे, सानिका, अंबिका सरकार, छाया दातार, उर्मिला पवार, शर्मिला रेगे, गौरी देशपांडे, विद्या बाळ, कमला भसीन यांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

**शर्मिला रेगे:**

यांनी भारतीय समाजाच्या संदर्भात लैंगिक अभ्यासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. ज्याला आजवर फक्त पितृसत्ता म्हटले जात होते, ज्या स्त्रीवादात जातीला बाजूला सारले जात होते. तेथे शर्मिला रेगे यांनी पितृसत्ता आणि जात यांच्यात परस्पर शोषणाचे प्रकार कसे निर्माण होतात यावर संशोधन केले, ज्यामुळे भारतीय समाजशास्त्र आणि महिलांच्या अभ्यासाला नवी दिशा मिळाली. त्यांनी Writing Caste Writing Gender: Narrating Dalit Women's Testimonios, Narrating Dalit Women's Testimonios, अगेंस्ट द मैडनेस ऑफ मनु, दलित महिला साक्षेप, मनूच्या विरोधात, ब्राह्मणी पितृसत्तेवर डॉ.बी.आर. आंबेडकर यांचे लेखन यांसारखी महत्त्वाची पुस्तके लिहिली. त्यांच्या अध्यापनाच्या काळात त्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच योगदान दिले नाही तर दलित मुलांच्या हक्कांसाठीही त्यांनी लढा दिला. शर्मिला रेगे यांनी भारतातील स्त्रीवादाच्या प्रवचनात जात, वर्ग, लिंग, धर्म, लैंगिकता यांना केंद्रस्थानी आणण्याचे काम केले. महिला अभ्यासातील त्यांच्या दलित स्त्रीवादी दृष्टिकोनात, त्या स्पष्टपणे त्यांचे मत व्यक्त करतात आणि शैक्षणिक क्षेत्रात नवीन संज्ञा देखील तयार करतात. सबअल्टर्न दृष्टीकोन केंद्रस्थानी

ठेवून त्या  बोलतात. विवाहपद्धतीत हुंड्यासारखी प्रथा आपल्याला अवगत आहे. शर्मिला रेगे आपल्या दलित स्त्रीवादी भूमिकेत लिहितात, ‘‘डाव्या विचारसरणीच्या महिला संघटनांनी हुंडा हा भांडवलशाहीला पुढे जाण्याचा एक मार्ग म्हणून पाहिले, तर स्वायत्त महिला गटांनी कुटुंबातील पितृसत्ताक नियमांना आव्हान देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हिंसा हुंड्याच्या सध्याच्या प्रथा ब्राह्मणीकरणाच्या प्रक्रियेच्या संदर्भात आणि त्यांचा विवाह पद्धतींवर होणारा परिणाम या संदर्भात पाहिला पाहिजे. ब्राह्मणवादी आदर्शांनी हुंडा विवाहाला प्राधान्य दिले हे चांगले दस्तऐवजीकरण आहे. वस्तुतः ब्रह्मविवाहाच्या वैधतेची वसाहतवादी स्थापना होती ज्याने हुंडा प्रथेला संस्थात्मक आणि विस्तारित केले. ब्राह्मणी जातींनी इतर प्रकारांपेक्षा विवाहाचे ब्राह्मो स्वरूप स्वीकारले आणि अशा प्रकारे ‘हुंडा’ हा एक अनिवार्य विधी म्हणून स्थापित केला. शिवाय, आंतरजातीय आघाड्यांविरुद्ध सामूहिक हिंसेद्वारे अंतःविवाहाचे तत्त्व आणि त्याची सतत बळजबरी आणि हिंसक निरंतरता हे हुंड्याच्या विश्लेषणासाठी महत्त्वाचे आहे. आजही आपण पाहतो की भारतीय स्त्रीवाद सर्व वर्ग, जाती आणि धर्मातील स्त्रियांना एकाच श्रेणीत कसे ठेवतो, ज्यामुळे ज्या स्त्रियांना त्यांच्या विशिष्ट जाती किंवा धर्मामुळे शोषणाचा सामना करावा लागतो, त्यांचे शोषण बाजूला केले जाते. या संपूर्ण परिस्थितीबद्दल शर्मिला रेगे लिहितात, ‘‘१९७० च्या दशकातील अनेक स्त्रिया स्त्रीवादी, गोऱ्या, मध्यमवर्गीय आणि विद्यापीठात शिकलेल्या असल्याने त्यांचा अनुभव ‘स्त्री अनुभव’ म्हणून सार्वत्रिक झाला. त्यामुळे ‘सर्व स्त्रिया दलित  आहेत’ सर्व महिला दलित आहेत’ अशी कोपरखळी विधाने करण्यात आली. स्त्रियांच्या प्रश्नांबाबत डाव्या पक्षांच्या द्विधा मन:स्थितीला स्त्रिया मूलत: इतर स्त्रियांशी जोडल्या गेल्याच्या दाव्याने प्रतिवाद केला गेला; ‘ज्ञानाचा व्यक्तिनिष्ठ अनुभव’ हा स्त्रीत्वाच्या वैश्विक अनुभवाच्या सिद्धांताचा आधार बनला. अशा प्रकारे ‘अनुभव’ हा वैयक्तिक राजकारणाचा आधार बनला तसेच दडपशाहीची व्याख्या करण्याचे एकमेव विश्वसनीय पद्धतशीर साधन बनले. अशा स्थितीतून दलित स्त्रियांचे अनुभव पूर्णपणे अदृश्य होते किंवा त्यांचे केवळ प्रतीकात्मक प्रतिनिधित्व होते. अशाप्रकारे, दलित स्त्रीत्व पुरुषत्व होते आणि स्त्रीत्व हे उच्चवर्णीय होते, ज्यामुळे दलित स्त्रीत्व वगळण्यात आले. शर्मिला यांना २००६ मध्ये विकास अभ्यास संस्था, मद्रास यांनी त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी आणि विकास अभ्यासात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल मालकोल अदिसेसिया पुरस्काराने सन्मानित केले. १३ जुलै २०१३ रोजी वयाच्या ४८ व्या वर्षी कोलन कॅन्सरमुळे पुण्यातील स्थानिक रुग्णालयात त्यांचे निधन झाले. त्या त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये एक उत्कृष्ट शिक्षिका म्हणून ओळखल्या जात होत्या ज्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना नवीन आणि चांगल्या गोष्टी शिकण्यासाठी प्रेरित करण्यासाठी कठोर परिश्रम केले. त्यांच्या  मृत्यूच्या दिवशी, त्यांची  एक विद्यार्थिनी, विद्वान चिट्टीबाबू पडवाला यांनी द हिंदूला सांगितले, ‘‘त्या विद्यार्थी, विद्वान आणि संशोधन सहाय्यकांबद्दल सर्वात सहनशील होत्या जे स्वतःला त्यांच्या अत्यंत आणि कठोर मानकांनुसार वागू शकत नसत. त्यांना ज्ञान पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याबद्दल जितकी काळजी होती तितकीच ते सुधारण्याबद्दल ही होती. या अर्थाने, त्यांच्यासाठी शिक्षणशास्त्र हे राजकारण होते. त्यांचे  विद्यार्थी आणि इतर सहकाऱ्यांनी 'द हिंदू'ला सांगितले होते की त्यांनी ‘अगेन्स्ट मॅडनेस ऑफ मनू’ हे पुस्तक पूर्ण करेपर्यंत त्यांना त्यांच्या आजाराची माहितीही नव्हती आणि त्या म्हणाल्या की आता त्यांनी हे पुस्तक पूर्ण केले आहे म्हणूनच मी  शांतपणे मरू शकते. त्यांच्या ईमेलचा शेवट डॉ. आंबेडकरांच्या शब्दांनी करत असत. आणि ते शब्द असे, ‘‘माझा

शेवटचा सल्ला तुम्हाला शिक्षित करा, आंदोलन करा आणि संघटित करा, स्वतःवर विश्वास ठेवा. ''आमच्या बाजूने न्याय मिळाल्याने, आम्ही आमची लढाई कशी हरू शकतो, हे मला दिसत नाही.''

**ऑम्वेट, गेल:**

प्रसिद्ध भारतीय-अमेरिकन समाजशास्त्रज्ञ, आंतरराष्ट्रीय किर्तीच्या संशोधिका आणि दलित शोषितांच्या प्रेरणास्थान. त्यांनी अनेक चळवळींच्या अभ्यासाला सुरुवात केली; मात्र त्या महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, सांस्कृतिक संघर्षांवरील चळवळी यांचा अभ्यास केला.

१. समाज सुधारनेची चळवळ

२. जाती विरोधी चळवळ

३. स्वतंत्र स्त्रियांची चळवळ आणि

४. कम्युनिस्ट व समाजवादी नेतृत्वाखाली उभी राहिलेली स्त्री चळवळ, ह्या चळवळीच्या यशा अपयशाशी मीमासा डॉ. ऑम्वेट, गेल यांनी केली आहे. त्यांच्या मते, सामाजिक सुधारणेच्या चळवळीत उदारमतवादी स्त्रीवादाची बीजे होती पण हिंदू पुनरुज्जीवनवादाने भरलेल्या सनातनी सुधारणावादाने त्यावर मात केली. ब्राह्मणेतर चळवळ ही एक नवा अभिजनवर्ग उभारण्याच्या धडपडीत हिंदू समाजातील जातीसंस्था आणि लिंगभाव संबंध Gender Relations यांना खरीखुरे पर्याय देऊ शकली नाही. स्वतंत्र स्त्रियांच्या चळवळीतून केवळ अभिजन वर्गातील स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फुटली. तीही उदारमतवादी स्त्रीवादी परंपरेतून गांधीजीमुळे स्त्रिया राष्ट्रवादी चळवळीत अल्या तरी मुलतः स्त्रीवादी प्रश्नांना तेव्हाही वाचा फुटली नाही. डाव्या चळवळीतील यांत्रिक भौतिकवादी मार्क्सवादामुळे समाजवादी स्त्रीवादाचा उदय होऊ शकला नाही. प्रसिद्ध भारतीय-अमेरिकन समाजशास्त्रज्ञ, आंतरराष्ट्रीय किर्तीच्या संशोधिका आणि दलित शोषितांच्या प्रेरणास्थान गेल यांचा जन्म अमेरिकेतील मिनीॲपोलिस येथे मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. शलाका भारत पाटणकर हे त्यांचे सासरकडील नाव. गेल यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण मिनीॲपोलिस येथील कार्लटन महाविद्यालयात झाले; तर मिनीॲपोलिस विद्यापीठातून त्यांनी समाजशास्त्र विषयात एम. ए. ही पदवी संपादन केली. एम. ए. च्या शिक्षणानंतर त्या १९६३ मध्ये सर्वप्रथम भारतात आल्या. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, सांस्कृतिक संघर्षांवरील चळवळी हा त्यांचा मुख्य अभ्यास विषय. या अभ्यासातूनच त्यांनी महात्मा फुले यांच्या चळवळींवर आधारित 'दी कल्चरल रिवोल्ट इन ए कोलोनेल सोसायटी : दी नॉन ब्राह्मण मुव्हमेंट इन वेस्टर्न इंडिया, १८७३ १९३०' वसाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड : पश्चिम भारतातील ब्राह्मणेत्तर चळवळ १८७३ १९३० हा पीएच. डी.साठी प्रबंध लिहून अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कली येथे सादर केला आणि १९७३ मध्ये पीएच. डी. ही पदवी मिळविली. त्यानंतर त्यांनी लिहिलेला प्रबंधसुद्धा पुस्तकरूपाने १९७६ मध्ये प्रकाशित झाला. गेल यांनी आपल्या कामातून जात आणि वर्ग यांतील गुंतागुंतीच्या नात्याची उकल करण्याचा प्रयत्न केला. विशेषतः वसाहतकालीन धोरणांमधून जात कशी पुनरुत्पादित होत होती, यावर त्यांनी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. त्यांचे असे प्रतिपादन होते की, वसाहतिक शिक्षणाने आणि त्यांच्या धोरणांनी ब्राह्मण उच्चभ्रूंना वसाहतिक

नोकरशाहीमध्ये उदयास येणार्या प्रभावी कामांमध्ये प्रवेश करण्यासाठी मदत केली होती. तथापि, ब्राह्मणेत्तर किंवा अस्पृश्यांना अशा प्रकारचे स्थानांतर अनुभवता आले नाही आणि ते सर्वाधिक प्रमाणात परिघावरच राहिले. त्यामुळे जात ही केवळ उतरंडीची व्यवस्था नव्हती, तर ती एक राजकीय प्रक्रिया होती आणि ती तत्कालीन वर्गव्यवस्थेला छेद देत होत्या. यासंदर्भात त्यांनी महात्मा फुले यांच्या चळवळीचे आकलन 'सांस्कृतिक बंड' म्हणून करतात; ज्यामध्ये या वसाहतकालीन जात-वर्गीय व्यवस्थेला धक्के देण्याची क्षमता होती. त्यामुळे महात्मा फुले यांची चळवळ केवळ सुधारणावादी चळवळ नव्हती, असे मत गेल यांनी मांडले. शास्त्रीय दृष्ट्या विचार केल्यास गेल यांनी ऐतिहासिक अभ्यासपद्धत वापरून जातीचा अभ्यास केला होता. भारतातील आधुनिक इतिहासकारांनीदेखील जातीचा अभ्यास करताना पौर्वात्यवादी दृष्टीकोन स्वीकारल्याचे दिसते. ज्यामध्ये जातीचे भौतिकवादी आकलन पुढे येऊ शकले नाही; परंतु गेल यांनी स्वीकारलेल्या ऐतिहासिक पद्धतीमुळे त्यांना जातीचे वर्ग आणि लिंगभाव यांच्यासोबतचे छेदनबिंदू सहजपणे पाहता आले. यातूनच जात व वर्ग यांचे गुंतागुंतीचे नाते विषद करणारा जातीविषयीचा भौतिकवादी दृष्टीकोन त्या विकसित करू शकल्या. गेल या विद्यार्थीदशेपासूनच वेगवेगळ्या चळवळींमध्ये सक्रीय होत्या. अमेरिकेतील साम्राज्यवादी युद्धखोर प्रवृत्तीविरोधातील चळवळीमध्ये त्या अग्रेसर होत्या. तसेच कृष्णवर्णीयांच्या लढ्यात व स्त्रीमुक्ती आंदोलनातही त्यांनी सहभाग घेतला होता. १९७० च्या दशकात महाराष्ट्रातील साम्यवादी चळवळीची प्रमुख शाखा असलेल्या 'लाल निशाण' या पक्षाशी त्यांचा सर्वप्रथम संबंध आला. गेल आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या इंदुताई पाटणकर यांची पहिली भेट याच ठिकाणी झाली. नंतर हळूहळू त्यांचा संबंध अनेक अभ्यासक, नेते, कार्यकर्ते, समाजसुधारक इत्यादींशी येऊ लागला. इंदुताई व गेल यांच्या भेटी अनेक सामाजिक कार्यक्रम व चळवळींत होत होत्या. गेल यांचा दलित, शोषित समाजाप्रती असलेली धडपड व आपुलकी, चळवळीतील सहभाग यांच्या संवादातूनच त्यांची आणि इंदुताई व भारत पाटणकर यांची जवळिक वाढली आणि भारत पाटणकर यांच्याशी गेल या विवाहबद्ध झाल्या. भारतातील अनेक चळवळींच्या बौद्धिक मार्गदर्शक म्हणून आपले योगदान दिले आहे. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील परित्यक्त्या स्त्रियांच्या चळवळींच्या त्या प्रमुख होत्या. त्यांनी दुष्काळ निर्मुलन चळवळ, वांग-मराठवाडी धरणाची निर्मिती, श्रमिक मुक्ती दलाच्या चळवळी अशा शेकडो चळवळींत सहभाग घेऊन शोषित समाजाला न्याय मिळवून दिला. महत्त्वपूर्ण अशी सामाजिक आणि राजकीय स्थित्यंतरे घडवून आणण्यासाठी अशा चळवळी किती मोलाचे काम करू शकतात, याचे महत्त्व त्या जाणत होत्या. सततचा अभ्यास, चिंतन, संशोधन यांतून त्यांनी आधुनिक चळवळींना सैद्धांतिक रूप दिले. त्यांनी वंचित-बहुजनांच्या न्याय हक्कांसाठी सक्रीय योगदान दिले. जात, धर्म, वर्ग, लिंगभाव, पितृसत्ताकपद्धती, जमीन इत्यादींचा स्त्रीशोषणाशी जवळचा संबंध आहे. भारतातील दलित-बहुजन आणि कनिष्ठ जातींतील स्त्रियांना पितृसत्ताक विचारांकडून होणारे अत्याचार सहन करावे लागत असून हिंसा, शोषण व लैंगिकता यांचा आंतरसंबंध त्या स्त्रीयांच्या अत्याचारामागे आहे, असे स्त्रियांच्या अस्तित्वाबद्दल गेल यांनी आपले परखड मत मांडले आहे. जातीअंत, स्त्री मुक्ती, रोजगार हमी योजनेत काम करणाऱ्या स्त्रियांवरील अन्याय इत्यादी व्यवस्थेचा अभ्यास करून या सर्व शोषितांना न्याय मिळवून देण्यासाठी गेल यांनी पुढाकार घेतला. स्त्री-पुरुष विषमता, जातिभेद इत्यादी सामाजिक विषमता दूर व्हाव्यात, यासाठी त्यांनी सत्यशोधक विचारांतून प्रथम स्वत: अभ्यास केला आणि

नंतरच आपले विचार समाजापुढे मांडले. म्हणजेच महात्मा फुले यांची समाजहितासाठीची क्रांतिकारकता किती महत्त्वाची होती, ते त्यांनी आपल्या अभ्यासातून व्यक्त केले आहे. त्याच बरोबर गेल यांनी मार्क्सवाद, बुद्धाचे तत्त्वज्ञान, संत साहित्य इत्यादींची मांडणी करून आजच्या घडीला गौतम बुद्ध, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांचे विचार संपविण्याचे षडयंत्र सुरू असून तसे करणे थांबले पाहिजे आणि अभ्यासपूर्ण संशोधनातून नवीन विचारांची मांडणी झाली पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. गेल यांनी भारत व विदेशांतील अनेक विद्यापीठे आणि शिक्षण संस्थांमध्ये अध्यापन केले आहे. त्यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ; समाजशास्त्र विषयाची प्रपाठक आणि त्यानंतर डॉ. आंबेडकर अभ्यागत प्राध्यापक, निस्वास, ओडिशा; नेहरू मेमोरियल म्युझियम आणि लायब्ररी, नवी दिल्ली; इंडियन इन्स्टिट्युट ऑफ ॲडव्हान्स स्टडी, शिमला; नार्डिक इन्स्टिट्युट ऑफ एशियन स्टडिज, कोपनहेगन; डॉ. बी. आर. आंबेडकर अभ्यागत प्राध्यापक, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नू), नवी दिल्ली इत्यादींचा समावेश आहे.

**ताराबाई शिंदे :**

ताराबाई शिंदे यांचा स्त्री-पुरूष तुलना ग्रंथ १८८२ मध्ये प्रसिद्ध झाला. आज आपण ज्या व्यवस्थेला पुरुषप्रधान व्यवस्था म्हणतो त्यावर  सत्यशोधक दृष्टीने पहिला हल्ला करण्याचे श्रेय ताराबाई शिंदे यांना देण्यात येते. स्त्रीभ्रूण हत्येच्या निमिताने स्त्रियांच्या चारीत्र्याचा पंचनामा करणाऱ्या पुरुषांना त्यांनी रोखठोक प्रश्न विचारले आहेत्त आणि जे दुर्गुण स्त्रियांचे म्हणून सांगितले जातात त्यामुळे सर्व  पुरुष वर्ग स्वत:च कसा ग्रासला गेला आहे हे त्यांनी मोठ्या तिखटपणे दाखवून दिले. हिंदू पुरुषसत्ताक समाजाच्या पुरुष प्रधान वैचारिक धाटणीचे सांगोपांग विश्लेषण ताराबाई शिदे यांनीच प्रथमत:मांडले. भारतातील पहिली स्त्रीवादी साहित्य समीक्षक असण्याचा हि बहुमान त्यांचाकडेच जातो. मुक्तमाला,मंजुघोषा या सारख्या तत्कालीन साहित्याच्या अश्याबाद्दल नेमके प्रश्न त्यांनी उभे केले. ताराबाईनी पुरुषप्रधानतेमुळे निर्माण होणाऱ्या  साचेबंद स्त्री परीमावर हल्ला चढविला.

**पंडिता रमाबाई :**

त्याच बरोबर पंडिता रमाबाई चे कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे रमाबाईंनी चुकीच्या रूढींना झुगारून देण्याचेच ठरवले होते. बालविवाह, पुनर्विवाहास बंदी यांसारख्या घातक चालीरीती व दुष्ट रूढींपासून समाजास मुक्त करण्याच्या उद्देशाने त्यांनी प्रथम पुण्यात व नंतर अहमदनगर, सोलापूर, ठाणे, मुंबई, पंढरपूर,बार्शी याठिकाणी आर्य महिला समाजाची स्थापना केली. आपल्या विचारांच्या प्रसारार्थ त्यांनी 'स्त्रीधर्मनीति' हे पुस्तक लिहिले. इ.स. १८८३ साली त्या आर्य महिला समाजाच्या वतीने वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेल्या. १८८६ मध्ये त्या आपल्या स्त्री-शिक्षणविषयक कार्याला मदत मिळवण्यासाठी अमेरिकेस गेल्या. तेथे त्यांनी हिंदू बालविधवांच्या प्रश्नांचा ऊहापोह करणारे 'द हायकास्ट हिंदू वूमन' हे पुस्तक लिहिले. अनेक ठिकाणी व्याख्याने देऊन त्यांनी भारतातील समस्या तेथील लोकांसमोर मांडल्या. भारतातील बालविधवांच्या कार्यात मदत करण्यासाठी काही अमेरिकन लोकांनी बॉस्टन येथे 'रमाबाई असोसिएशन'ची स्थापना केली होती. ११ मार्च, इ.स. १८८९ रोजी त्यांनी मुंबईला विधवांकरिता 'शारदा

सदन' नावाची संस्था काढली. त्यांनी केशवपनाविरुद्धही प्रचार केला व संमती वयाच्या चळवळीसही पाठिंबा दिला. २४ सप्टेंबर, इ.स. १८९८ रोजी केडगाव येथे 'मुक्तिसदना'ची त्यांनी स्थापना केली. इ.स. १८९७ मध्ये मध्य प्रदेशात व इ.स. १९०० मध्ये गुजरातमध्ये पडलेल्या दुष्काळात निराश्रित झालेल्या स्त्रियांना त्यांनी या आश्रमात आश्रय दिला. त्यांनी स्थापन केलेल्या 'प्रीतिसदन'(अपंग व दुबळ्या साठी) 'शारदासदन', 'शांतिसदन' या सदनांमधून गरजू व पीडित स्त्रिया राहत असत. या सदनांत दुर्दैवी स्त्रियांच्या राहण्या-जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी त्यांनी आपल्या आश्रमातील-सदनांतील स्त्रियांना शेती, विणकाम, मुद्रणकाम यांसह शालेय शिक्षणही देण्याचा प्रयत्न केला.

**गौरी देशपांडे :**

गौरी देशपांडे पूर्वाश्रमीच्या कर्वे ख्यातनाम लेखिका आणि कवयित्री होत्या. त्यांनी मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमधून लेखन केले. कथा, कादंबऱ्या, वस्तुनिष्ठ लिखाण, कविता असे सर्वच साहित्यप्रकार त्यांनी हाताळले. अनेक उत्तम सहित्यकृतींचा त्यांनी मराठीतून इंग्रजी आणि इंग्रजीतून मराठीत अनुवाद केला. रिचर्ड बर्टन यांच्या 'अरेबियन नाइट्स'चा त्यांनी केलेला मराठी अनुवाद विशेष लोकप्रिय आहे.११ फेब्रुवारी १९४२ रोजी पुण्यात त्यांचा जन्म झाला. विख्यात मानववंशशास्त्रज्ञ आणि लेखिका इरावती कर्वे या त्यांच्या आई, तर थोर समाजसुधारक महर्षी धोंडो केशव कर्वे हे त्यांचे आजोबा होते. त्यांचे बालपण पुण्यातच गेले. शालेय शिक्षण अहिल्यादेवी शाळेत झाले. त्यानंतर फर्ग्युसन महाविद्यालयातून इंग्रजी साहित्य या विषयात त्यांनी एम.ए. ही पदवी प्राप्त केली. एस. नागराजन यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करीत पुणे विद्यापीठाच्या इंग्रजी विभागातून त्यांनी डॉक्टरेट मिळवली. गौरी देशपांडे यांचे लिखाण मराठीतील उत्कृष्ट स्त्रीवादी लिखाणांपैकी आहे. त्यांच्या लिखाणात वास्तववादी चित्रण असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. त्यांनी '*The position of women in India'* (स्त्रियांचे भारतातील स्थान) या विषयी पत्रक छापले होते. बीटवीन बर्थस् Between Births १९६८, लॉस्ट लव्ह Lost Love १९७० आणि बियाँड द स्लॉटरहाऊस Beyond the Slaughterhouse १९७२ हे त्यांचे तीन कवितासंग्रह इंग्रजीत प्रकाशित झाले. साहित्यातून त्या स्वातंत्र्याविषयीच्या संकल्पना ठामपणे मांडतात. त्यांच्या कवितांमध्येही त्यांच्या या विचारांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. त्यांच्याविषयी 'मिळून सार्याजणी' मासिकाच्या संपादिका गीताली संपादकीय मनोगतात म्हणतात, ''गौरी माणसाच्या देहाकडे स्त्रीदेह आणि पुरुषदेह या वेगळ्या भावनेने न बघता निखळ मानवी देह म्हणून पाहावे, असे सांगते. त्यातूनच तिने स्त्रीच्याच देहाभोवती बांधलेले नैतिकतेचे निकष तोडायला सुरुवात केली आहे.'' त्यांचे लेखन आत्मभान बाळगणाऱ्या, स्वतंत्र अस्तित्व असणाऱ्या, लोकाविषयी असते म्हणजेच त्यांचे स्थान समूह निष्ठतेपेक्षा व्यक्तीनिष्ठ दृष्टिकोनावर भर देते. समाजाचा एकत्रपणे विचार करताना त्या दिसत नाहीत. कारण समाजातील प्रत्येक व्यक्ती वेगळी असते. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असी त्यांची धारणा आहे. एकाने दुसऱ्यासारखे राहण्याचा किंवा जगण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा प्रत्येकाने स्वतंत्र आपले अस्तित्व जपावे या कडे त्यांचा ओढा दिसतो. गौरी देशपांडे यांच्या साहित्याचे हेच वैशिट्य आहे कि,येथेच त्यांचे साहित्य नवीन दिशा शोधते समाजमान्य चाकोरी सोडून स्वतत्र विचार करते. त्यांच्या साहित्या मध्ये मुक्तपण जाणवते. त्या तो ओढून ताणून आणत नाहीत किंवा स्व:तावर लादूनही घेत नाहीत.

मी माझ्या मनाला जे आवडेल, त्याच्या स्वतंत्र मनाने स्वीकार करणार या विचाराच्या त्या आहेत.स्व:ताशी स्वतःच्या मनाशी निभावलेला, जपलेला प्रामाणिकपणा, येथे समाजाच्या नीती, अनीती किंवा बांधिलकीचा संबंध त्यांना मान्य नाही.

**विद्या बाळ:**

विद्या बाळ या स्त्रीवादी कार्यकर्त्या, लेखिका आणि संपादिकाही होत्या. त्यांनी स्त्रीवादी चळवळीत केलेल्या भरीव कामगिरीमुळे त्यांचे स्त्रीवादी चळवळीतील अग्रणी अशा शब्दात सार्थ गौरव करण्यात येतो. स्त्रियांना समृद्ध जीवन जगता यावे, यासाठी पुरुषभान येण्याची आवश्यकता आहे,' असे आग्रही प्रतिपादन बाळ यांनी केले. इतक्यावरच न थांबता त्यांनी आपले म्हणणे प्रत्यक्षात येण्यासाठी आपले आयुष्य वेचले. स्त्रियांना त्यांच्या हक्कांची जाणीव व्हावी यासाठी त्या झटल्या. महिलांच्या हक्कांसाठी झालेल्या चळवळींमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग असे. विद्या बाळ यांचा जन्म १२ जानेवारी १९३७ रोजी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. वयाच्या १८ व्या वर्षी त्यांचे लग्न झाले. त्यांच्या जीवनाचा अर्धाभाग कुटुंबिय आणि मुले यांच्यात रमलेल्या मध्यमवर्गीय गृहिणीप्रमाणेच गेला. मात्र, नंतर त्या समाजवाद व स्त्रीवादाकडे झुकल्या. त्याचे श्रेय त्या 'स्त्री' मासिकाच्या संपादकीय विभागात काम करण्याला देतात. स्त्री हे महिलांसाठीचे पुरोगामी मासिक होते. विद्याताईंनी १९८९ साली 'मिळून सार्याजणी' नावाचे मासिक सुरू केले. ग्रामीण आणि शहरी महिलांमधील दरी सांधणे, हा या मासिकाचा हेतू होता. महिलांच्या अनुभवांना व्यासपीठ मिळावे, यावर या मासिकाचा भर होता. बाळ यांचा लिंगभेदविषयक दृष्टीकोन स्पष्ट होता. त्यांनी अनेकदा असा भेद करण्याचा जाहीर विरोधही केला. १९८१ मध्ये त्यांनी ''नारी समता मंचाची'' स्थापना केली. महिलांवरील हिंसाचारासंबंधीच्या प्रश्नांवर ही संघटना काम करायची. सुरुवातीच्या काळातील काही स्वायत्त संघटनांपैकी ती एक होती. या संघटनेने 'मी एक मंजूश्री' नावाने तरुण स्त्रियांचे हुंडाबळी या विषयावर एक प्रदर्शन भरवले. हे प्रदर्शन पुण्यातील महिला चळवळीतील मैलाचा दगड ठरले.कारण यामुळे प्रतिष्ठित मध्यमवर्गीय कुटुंबांत महिलांबाबत घडणार्या हिंसाचाराला वाचा फुटली. नारी समता मंचाने महिलांसाठी 'बोलत्या व्हा' नावाचे केंद्रदेखील सुरू केले. यामुळे महिलांना समस्या मांडण्यासाठी जागा मिळाली. बाळ यांनी 'ग्रोइंग टुगेदर' या प्रकल्पाचे नेतृत्व केले. या प्रकल्पाद्वारे ग्रामीण महिलांमध्ये अस्मिता जागृतीचे काम केले जाई. बाळ यांनी २००८ साली सत्यरंजन साठे पुरुष संवाद केंद्राची स्थापना केली. पुरुषांनाही मन मोकळे करण्याची गरज ओळखून हे केंद्र सुरू करण्यात आले होते. पुरुषार्थाच्या संकल्पनेपायी जबरदस्तीने कराव्या लागणार्या गोष्टींतून येणारे वैफल्य व त्यांची होणारी कोंडी याविषयी या केंद्राची मदत झाली. 'तेजस्विनी', 'वाळवंटातील वाट', 'जीवन हे असे आहे' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. महिलांना प्रवेश नसलेल्या मंदिरांत प्रवेश मिळावा, यासाठी उच्च न्यायालयात चाललेल्या लढ्यात बाळ यांचा सक्रीय सहभाग होता. जीवनाच्या अखेरच्या काळातही त्या सन्मानपूर्वक मरणाचा हक्क व इच्छामरण या गोष्टींच्या पुरस्कर्त्या होत्या. त्यांनी जनजागृतीसाठी रात्री काढलेली 'प्रकाशफेरी,' एकट्या स्त्रियांसाठी परिषद, विवाह परिषद, कुटुंब नियोजन परिषद, आत्मसन्मान परिषद किंवा विविध पथनाट्य, निदर्शने, परिसंवाद, 'दोस्ती जिंदाबाद', सारखा ॲसिड हल्ल्याविरोधातील जागृतीसाठीचा कार्यक्रम, लिंगभाव समतेसाठी पुरुषभान परिषद आदी

अनेक कार्यक्रम त्यांनी आपल्या संस्थांच्या माध्यमातून घेतले. इतक्यावरच न थांबता त्यांनी आपले कार्य अधिक व्यापक पातळीवर चालावे यासाठी अनेक कार्यकर्त्या तयार केल्या. शहरी आणि ग्रामीण स्त्रियांना जोडण्याच्या उद्देशानेही त्यांनी काम केले. स्त्री सक्षमता आणि पुरुषांना बरोबर घेऊन माणूस म्हणून पुढे जाण्यासाठी त्यांनी केलेली धडपड सुरूच ठेवली.

**बेबी कांबळे आणि उर्मिला पवार:**

दलित स्त्री साहित्यातील बेबी कांबळे आणि उर्मिला पवार यांच्या कार्याची चर्चा येथे करणार आहोत. या दोघांचे दलित चरित्रातील योगदान महत्त्वाचे आणि उल्लेखनीय मानले जाते. बेबी कांबळे आणि उर्मिला पवार यांनी त्यांच्या कामात दलित महिलांना जात आणि लिंग या दोन्ही आधारावर भेदभावाचा कसा सामना करावा लागतो यावर लक्ष केंद्रित केले आहे. उच्चवर्णीय लोकांकडून केल्या जाणाऱ्या अमानवी वागणुकीबद्दल आणि सामाजिक अज्ञानाबद्दल ती स्वतःच्या भाषेत निर्भयपणे आणि स्पष्टपणे लिहितात. त्यानी आपल्या समाजातील दडपशाही वस्तुस्थिती आणि स्पष्टपणे मांडली. या दोघांनीही शालेय वातावरणात शिक्षण घेताना जातीय भेदभाव अनुभवला आणि त्याचा उल्लेख त्यांच्या आत्मचरित्रात केला आहे. विषमतेबद्दल बोलताना उर्मिला पवार यांचे स्वतःचे वैवाहिक जीवनातील पितृसत्ताकतेचे अनुभव, कमी हिंसक दलित-बहुजन संघर्ष आणि समाजातील वास्तव मांडले. १९८६ साली प्रकाशित झालेला बेबी कांबळे यांनी मराठी भाषेत लिहिलेला ‘जिंण आमुच’ हा असाच एक प्रयत्न आहे ज्याने दलित स्त्रियांचे अनुभव आणि संघर्ष यावर प्रकाश टाकून दलित साहित्यात महत्त्वाचे स्थान आहे. ‘जिंण आमुच’ नंतर २००९ मध्ये माया पंडित यांनी ‘द प्रिझन्स वी ब्रोक’ या नावाने इंग्रजीत अनुवादित केले. या कामात बेबी कांबळे यांनी तिच्या भाषेतून आणि तिच्या स्त्रीवादी दृष्टीकोनातून भारतीय समाजात दलित महिलांनी अनुभवलेल्या जाती आणि लिंगभेदाचे चित्र मांडले आहे. त्या सांगतात की, संपूर्ण महार समाजाला उच्चवर्णीयांकडून द्वेषाने आणि हीनतेने कसे पाहिले जाते. महार केवळ दारिद्र्य आणि निराधार जीवन जगत होते असे नाही, तर वृद्ध आणि मुले अनेकदा मेलेली जनावरे खातात. वसाहती काळापूर्वी आणि नंतर दलित स्त्रियांचे जीवन आपल्यासमोर आणण्याचा बेबी प्रयत्न करतात. डॉ.बी.आर.आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या जातीविरोधी चळवळीतून बेबीताईंना प्रेरणा मिळाली. संपूर्ण कामात, बेबी कांबळे यांनी उच्चवर्णीय दलित स्त्री-पुरुषांना अस्पृश्य मानून त्यांच्याशी कसे तुच्छतेने वागले जाते यावर प्रकाश टाकला. वस्तूंची खरेदी-विक्री करताना, हिंदू धर्माचे पावित्र्य राखून त्याची विटंबना करण्यात ते कधीही चुकत नाहीत. गावाच्या सीमेवर राहणाऱ्या त्यांच्या समाजाला भेडसावणारा पितृसत्ता आणि दुराचार ती अचूकपणे समोर आणते. हिंदू समाजापासून बहिष्कृत असूनही, महारांनी हिंदू मूल्ये आणि प्रथा स्वीकारल्या. त्यांनी समाजात प्रचलित असलेल्या हिंदू धर्माच्या या अतार्किक मूल्यांवर आणि प्रथांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आंतरजातीय प्रेमसंबंधांमध्ये जातीयवादाचा सामना करणाऱ्या दलित मुलींचे अनुभव हिंदू धर्मातील अतार्किक प्रथांवर हल्ला त्यांच्या आत्मचरित्रात त्या सांगतात की, समाजातील लोक खूप अंधश्रद्धाळू होते. हिंदू समाजापासून बहिष्कृत असूनही, महारांनी हिंदू मूल्ये आणि प्रथा स्वीकारल्या. त्यांनी समाजात प्रचलित असलेल्या हिंदू धर्माच्या या अतार्किक मूल्यांवर आणि प्रथांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. उदाहरणार्थ, महारांचे गाव सवर्ण हिंदूंच्या

वस्तीपासून दूर होते. हिंदू समाजातील त्यांच्या कनिष्ठ स्थानामुळे, स्त्रियांना हिंदू धर्मात प्रचलित असलेल्या अंधश्रद्धांना सामोरे जावे लागले. समाजातील पुरूषांकडून दलित महिलांना दाखवण्यात येणारा अवहेलना त्या उघड करतात. महार महिलांनी उच्चवर्णीय लोकांसमोर केलेल्या चुकांमुळे, त्यांच्या पुरुषांकडून त्यांचे अनेकदा शारीरिक शोषण झाले. महार स्त्रियांना त्यांच्या वस्तू सवर्ण स्त्रियांना कमी पैशात विकण्यास भाग पाडले जात असे. त्यांच्या शरीराच्या कोणत्याही भागाला स्पर्श होणार नाही याची काळजी घेण्यासाठी व्यवहार करताना कडक नियम पाळले जात होते. बेबी सांगतात की, महार स्त्रिया नवविवाहित ब्राह्मण स्त्रियांचे मलमूत्र वाहून नेत असत कारण ब्राह्मण स्त्रियांना शौचास घराबाहेर पडण्याची परवानगी नव्हती. दलित पुरुषाकडून ही त्यांच्या जोडीदाकडून  होणारे शोषण आणि शारीरिक छळाचे सर्वात वाईट प्रकार त्या समोर आणतात.

### १.३.३ जात, वर्ग आणि धर्माच्या दृष्टीने लैंगिक असमानतेचा आकृतिबंध

भारताच्या सामाजिक भारतीय राजकीय बाबतीत आपणास फार मोठी वर्गीय जातीय धार्मिक शैक्षणिक विषमता आढळून येत होती. साधारणता स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये भारतात सामाजिक विषमता प्रचंड होती पण या विषमतेमध्ये समाजातील महत्त्वपूर्ण घटक म्हणून स्त्री-पुरुष व्यक्तीचा विचार केला जातो तेव्हा स्त्रीची परिस्थिती ही चूलमूल पर्यंत मर्यादित होती. स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने  समतेने राहण्याचा आचार विचाराचा अधिकार नव्हता. तसेच तिला शिक्षण घेण्याचा मत मांडण्याचे सामाजिक स्वातंत्र्य प्राप्त नव्हते. तिला इथल्या समाजाने बुद्धीहीन समजून गौण, कनिष्ठ दर्जाचे स्थान दिले होते. परंतु ब्रिटिश शासन कालखंडामध्ये यामध्ये बदल व्हायला सुरुवात झाली महात्मा फुले छत्रपती शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर, या थोर विचारवंतांची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरली. हिंदू कोड बिल विधेयक आणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीला स्वातंत्र, समता, बंधुता, अधिकार, उदारमतवाद, राजकीय, स्वातंत्र्य बहाल करण्यासाठीचा लढा उभारला परंतु हिंदू कोड लागू करण्या पाठीमागे त्यांना फारसे यश आले नाही. सरकारने त्यांचें विधेयक संसदेत मंजूर केले नाही परिणामी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या विधीमंत्री पदाचा राजीनामा दिला. स्त्रीच्यांच्या हक्कासाठी बनवण्यात आलेला हिंदू कोड बिल कायदा कालांतराने भारत सरकारने लागू केला त्यासाठी बराच अवधी गेला. भारतातील सर्व जाती-धर्मातील स्त्रियांना जाचक रुढी आणि परंपरांपासून सुटका मिळावी यासाठी हा मसुदा लिहिला. आंबेडकरांनी ४ वर्षे, १ महिना आणि २६ दिवस यावर काम करून हे हिंदू कोड बिल तयार केले होते. हे बिल इ.स. १९४७ पासून ते फेब्रुवारी १९४९ रोजी संसदेत मांडले. हा मसुदा सात वेगवेगळ्या घटकांशी निगडित कायद्याचे कलमात रूपांतर करू पाहत होता. स्वतंत्र भारताचे कायदे मंत्री म्हणून त्यांनी हिंदू कोड बिलावर वर सुमारे ३ वर्ष काम केले. त्यांना वाटत होते की जाति व्यवस्थेमध्ये स्त्रियांना कमी लेखले जात आहे त्यासाठी हिंदू कोड बिल असे बनवले पाहिजे ज्यामुळे देशातील सर्व स्त्रियांना समान अधिकार प्राप्त होतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना काही विशेष वर्ग किंवा विशेष जातीच्या स्त्रियांना त्याचा फायदा होईल याची चिंता नव्हती. त्यांना सर्व जाती आणि वर्गाच्या स्त्रियांच्या अधिकारांचे संरक्षण करायचे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते की देशाच्या विकासासाठी देशाच्या सर्व वर्गातील लोकांना समानतेचा अधिकार भेटला पाहिजे. स्वतंत्र भारतातले पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४८ मध्ये संविधान सभेत ''हिंदू कोड बिल''चा

मसुदा प्रस्तुत केला. त्यांनी आपल्या बिलामध्ये स्त्रियांना घटस्फोट देण्याचे अधिकार त्याचबरोबर विधवा आणि मुलींना संपत्तीमध्ये अधिकार असावा असा प्रस्ताव ठेवला होता. यामध्ये ज्यांनी आपले मृत्यूपत्र बनवले नसेल, त्या व्यक्तीच्या संपत्तीमध्ये हिंदू स्त्री आणि पुरुषांना प्राप्त होणारी संपत्तीत कायद्याने वाटणी झाली पाहिजे असा प्रस्ताव सादर केला. या कायद्यानुसार मयत झालेल्यांच्या सर्व मुलगे आणि मुलींना समान वाटणीचे अधिकार देण्यात येतात. या बिलामध्ये आठ अधिनियम बनवले आहेत. हिंदू विवाह अधिनियम, विशेष विवाह अधिनियम, दत्तक घेणे, दत्तकग्रहण अल्पायु - संरक्षता अधिनीयम, हिंदू वारसदार अधिनियम, दुर्बल आणि साधनहीन कुटुंबातील सदस्य यांना भरन-पोषण अधिनियम, अप्राप्तवय संरक्षण सम्बन्धी अधिनियम, वारसदार अधिनियम, हिंदू विधवाला पुनर्विवाह अधिकार अधिनियम. जात धर्म व त्यातील अनिष्ट प्रथा स्त्रीला निव्वळ गुलाम बनवण्याच्या प्रथा, परंपरा याद्वारे तिची होणारे शोषण, सामाजिक आर्थिक लैंगिक शोषण यामुळे स्त्रीचे हे पुरुषाच्या दृष्टीने निव्वळ मादीरूप, वस्तुरूप ठरले होते, सतीची प्रथा, बालविवाह, जरठ कुमारी विवाह, केशवपण, विधवा विवाह प्रतिबंध, स्त्री शिक्षणाला विरोध अशा पद्धतीच्या चुकीच्या प्रथांना ती बळी पडत होती. या प्रकारामुळे इथल्या समाज सुधारकांनी उदारमतवादी विचारवंतांनी या प्रखर विचार मांडण्यास सुरुवात केली. काही सुधारकांनी विचार त्याचबरोबर प्रत्यक्ष कृतीतून स्त्रीत्वासाठी तिला पुरुषाप्रमाणे मानसन्मान, अधिकार, स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता देण्यासाठी पुढाकार केला. यामध्ये अनेक सुधारकांची नावे घेता येतील राजा राममोहन रॉय, गोपाळ हरी देशमुख, आगरकर, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ.बी.आर.आंबेडकर, ताराबाई शिंदे यातून स्त्री-पुरुष समानता स्वातंत्र्य हक्क स्त्रविकासासाठी प्रयत्न केले गेले. राजा राम मोहन राय यांनी सतीविरुद्ध सुधारणा चळवळ उभी केली व त्यांच्या प्रयत्नामुळे मध्ये सती बंदीचा कायदा १९२९ साली झाला. १९४८ मध्ये स्त्री शिक्षणाचे प्रणेते महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलीसाठी पहिली शाळा सुरू करून स्त्री शिक्षणाची सुरुवात केली. आगरकरांनी सुधारक वर्तमानपत्र सुरू केले यामध्ये विविध लेख स्त्री उद्धार याविषयक लिहिले गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील चातुर्वर्ण पद्धती, जाती विषमता, धार्मिक अनिष्ट रूढी या पद्धती यामध्ये बंदिस्त झालेल्या स्त्री जीवनात मुक्त करण्याचे काम भारतीय संविधानामार्फत केले. यामध्ये स्त्री पुरुष समानता, स्वातंत्र्य, सर्व अधिकार, मतदाना अधिकार असे पातळीवरचे अधिकार स्त्रियांना घटनात्मक पातळीवर मिळवून दिले त्यासाठी त्यांनी स्त्रीमुक्तीचे महान कार्य केले. त्यांचीही स्त्रीमुक्ती समाजातील सर्व जाती धर्म वर्गातील स्त्रियांसाठी होती हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्यांचे लेखन पुरुषप्रधान संस्कृतीला फार मोठा धक्का होता. त्यानंतर अनेक सुधारक विचारवंतांनी मांडलेले विचार, केलेले कार्य हे भारतातील स्त्रियांच्या प्रगतीच्या दृष्टीने पुढचे पाऊल ठरले. जीवनाच्या सर्व क्षेत्रात, श्रमिकांसह लिंग/वर्ग/जातीच्या अत्याचाराला सामोरे जावे लागते ही मान्यता वाढत आहे. वर्ग आधारित असमानता मूल्य आधारित श्रम सिद्धांतांचा वापर करून स्पष्ट केली जाऊ शकते, त्याच बरोबर जात-आधारित समाजात, सार्वजनिक श्रम देखील कलंक आणि अपमानाचे प्रतिनिधित्व करतात (जॉन २०१३). याचे कारण असे की, अशा समाजातील व्यक्तीचा दर्जा तो/ती करत असलेल्या कामाच्या स्वरूपाशी निगडीत असतो. जातिव्यवस्थेच्या वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे ती व्यवसायावर आधारित आहे, ज्यामध्ये बौद्धिक श्रम उच्च जातींद्वारे केले जात होते, तर खालच्या जातींना त्यांच्या कामाच्या स्वरूपाद्वारे जातीला चिन्हांकित केले गेले

होते-. महिलांवरील हिंसाचाराबद्दल निषेध, जागरूकता मोहिमा आणि वादविवाद हे भारतातील महिला चळवळीमध्ये केंद्रस्थानी राहिले आहेत, ज्यात लैंगिक हिंसाचाराचा समावेश आहे. ज्याचा महिलांना खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही क्षेत्रात सामना करावा लागतो. जर वेगवेगळ्या सामाजिक ठिकाणी (जात, वर्ग, धर्म आणि इतर) महिलांना लैंगिक हिंसाचाराचा सामना करावा लागतो. भारतातील महिलांवरील हिंसाचाराचे मूळ पुरुषसत्ताक व्यवस्थेत खोलवर रुजलेले आहे जे वर्ग, धर्म आणि जात यासारख्या विषमतेच्या इतर अक्षांना छेदते. महिलांवरील हिंसाचार ही जात, वर्ग आणि लिंग श्रेणीच्या तळाशी असलेल्या महिलांच्या स्थानामुळे गुंतागुंतीची आहे. जातीचा प्रश्न आणि महिलांचे प्रश्न एकमेकांशी जोडलेले आहेत. स्त्रीवाद्यांनी अत्यंत स्तरीकृत, पितृसत्ताक, जातिप्रधान, वर्गविहीन समाजातील जात आणि लिंग यांच्या गुंतागुंतीच्या कार्याचा उलगडा करण्यात बराच वेळ घालवला आहे. सत्तेच्या आणि असमानतेच्या या धुरा एकमेकांच्या हातात हात घालून काम करत असल्याने, एकमेकांशिवाय एकाचे कार्य समजून घेणे पुरेसे नाही. हे विशेषतः जात आणि लिंगाच्या बाबतीत आहे, जेथे दोन अक्ष पूर्णपणे एकमेकांवर अवलंबून आहेत. पितृसत्ताक दडपशाहीच्या सामायिक अनुभवाने स्त्रिया एकत्र आल्या, तरीही त्या वर्ग, जात, धर्म इत्यादींच्या आधारे विभागल्या गेल्या आहेत. थोडक्यात सांगायचे झाल्यास महिलांना त्यांच्या आधारित दुय्यमच लेखले जाते किंबहुना जात धर्म, वंश, पंथ या ठिकाणी त्यांची कुचंबनाच होते. पितृसत्ताक पद्धतीमध्ये वर्ग श्रेणीमध्ये त्या अत्यंत दुय्यमच मानल्या जातात त्यांनी  नेहमीच पुरुष बंधनात रहाव्यात यासाठी त्यांना देवीची ही उपमा दिली जाते. अनिष्ट धार्मिक बंधने लादून त्यांना नेहमी पुरुषी नियंत्रणात ठेवले जाते. संपत्तीच्या अधिकारापासून हक्कापासून वंचित ठेवण्याचा अधिकाधिक प्रयत्न केला जातो. मी जगामध्ये स्त्रीचा होणारे दुय्यमत्व ही एक सामान्य बाब समजली जाते. उच्च जातीतील महिलांचा पुनर्विवाह करणे धर्माच्या आधारित वर्ज्य मानला जातो. परंतु त्याच्या विरुद्ध दिशेला बघितले तर निम्न जातीचा स्त्रीचा विवाह मान्य केला जातो. जात वर्ग लिंग याबाबत तार्किकतेने विचार केल्यास असे दिसून येते की ही व्यवस्था पुरुषी वर्चस्वाद टिकवून ठेवणारी असून मानवतेच्या तत्वाला ठेच पोचवते. म्हणून समाजसुधारकांनी केलेल्या सुधारक योजना या स्त्रियांसाठी कल्याणकारी ठरल्या हे निश्चितच मानावे लागेल.

## १.४ सरावासाठीचे प्रश्न

अ) खालील प्रश्नांची एका वाक्यत उत्तरे लिहा.

१. हिंदू कोड बिल कोणी लिहिले?

२. लिंगभाव लेखापरीक्षण केव्हा मंजूर करण्यात आले.

३. **Second Sex** या ग्रंथाचे  लेखक कोण?

४. **The Dialectics of sex** या ग्रंथाचे लेखक कोण?

५. ''ए व्हिन्डिकेशन ऑफ द राइट्स ऑफ विमेन'' या ग्रंथाचे लेखक कोण?

६. ''द व्हाइस ऑफ विमेन''हे दैनिक काढले कोणी काढले?

७. "The origin of the family private property and state" या ग्रंथाचे लेखक कोण?

८. एंजल्स ने त्याच्या The origin of the family private property and state या ग्रंथा मधून कोणता संदेश दिला आहे?

९. ''अगेंस्ट द मैडनेस ऑफ मनु हे पुस्तक कोणी लिहिले'' ?

१०. "Writing Caste Writing Gender: Narrating Dalit Women's Testimonios" हे पुस्तक कोणी लिहिले ?

११. दी नॉन ब्राह्मण मुव्हमेंट इन वेस्टर्न इंडिया हे पुस्तक कोणी लिहिले ?

१२. ''शारदा सदन'' ही संस्था कोणी सुरु केली?

१३. The position of women in India' हे पुस्तक कोणी लिहिले?

१४. महाराष्ट्रातील स्त्रीवादी महिला विचारक कोणत्या ?

१५. १९८९ साली 'मिळून सार्याजणी' नावाचे मासिक कोणी सुरू केले.

१६. आपल्या लिखाणात भांडवलशाही समाजात होणारी जुलूम, जबरदस्ती, अन्याय, शोषण, गुलामी थांबवण्यासाठी सर्व शोषित घटकांनी एकत्र येऊन लढा करण्याची व क्रांती करण्याची आवश्यकता कोणी स्पष्ट केली.

## १.५ सरावासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

२. २००५.

३. (Simone de Beauvoir) सिमोन द बुव्हा.

४. शुलामिथ फायर स्टोन.

५. मेरी वुलस्टोनक्राफ्ट

६. पॅरिसमधील स्त्रीवादी महिलांनी.

७. एंजल्स.

८. या पुस्तकात असे स्पष्ट केले की, कुटुंबात पुरुष भांडवलदाराचे व स्त्री ही श्रमिकांचे प्रतिनिधित्व करते असा संदेश दिला गेला आहे.

९. शर्मिला रेगे

१०. शर्मिला रेगे

११. डॉ. गेल ऑम्वेट.

१२. रमाबाई नी

१३. गौरी देशपांडे.

१४. ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, डॉ.सुमती क्षेत्रमाडे, डॉ.आम्व्हेट गेल, कुसमावती देशपांडे, सानिका, अंबिका सरकार, छाया दातार, उर्मिला पवार, शर्मिला रेगे, गौरी देशपांड, विद्या बाळ, यांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

१५. विद्या बाळ.

१६. कार्ल मार्क्स, एंजल्स

(ब) खालील प्रश्नांची विस्तृतपणे उत्तरे लिहा.

१. लिंग, लिंगभाव, पितृसत्ताक पद्धती, लिंगभाव भूमिका, लिंगभावाचे लेखापरीक्षण या संकल्पनाचे सविस्तर स्पष्टीकरण द्या.

२. उदारमतवादी, जहालवादी, समाजवादी सिद्धांत स्पष्ट करा

३. जात, वर्ग आणि धर्माच्या दृष्टीने लैंगिक असमानतेच्या आकृतीबंधाची चर्चा करा.

क) टिपा लिहा

१. पितृसत्ताक पद्धती

२. लिंगभावाचे लेखापरीक्षण

३. उदारमतवादी स्त्रीवाद

४. लिंगभावाचे लेखापरीक्षण फायदे

## १.६ सारांश:

भारताच्या सामाजिक आर्थिक राजकीय बाबतीत आपणास फार मोठी वर्गीय, जातीय, धार्मिक शैक्षणिक विषमता आढळून येत होती. ही विषमता उत्तरोत्तर कमी होत गेली याचा उल्लेख आपण उपरोक्त प्रकरणांमध्ये केला आहे. भारतीय समाजामध्ये स्त्रीला तिची विचार मांडण्याचे स्वातंत्र्य नव्हते किंबहुना तिला बुद्धीहीन समजून गौण दर्जा दिला गेला. तिला स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, मानवतावाद यापासून वंचित ठेवले गेले. जात, धर्म, वंश त्यातील अनिष्ट प्रथा परंपरा याचे गुलाम बनवले गेले व तिचे वर्षानुवर्षे शोषण केले गेले. सती प्रथा, बालविवाह, जरठ कुमारी विवाह, केशव पण, विधवा विवाहस प्रतिबंध, अशा अनेक चुकीच्या प्रथांना ती बळी गेल्याची आपल्याला दिसून येते. थोर विचारवंतांनी व सुधारकांनी यावर उपाय योजले आणि त्यासाठी अथक प्रयत्न करून या प्रथा बंद केल्या व स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. समाजसुधारक उभे आयुष्य स्त्री उन्नतीसाठी व तिच्या हक्कासाठी लढत राहिले. उपरोक्त प्रकरणात आपण मूलभूत संकल्पना लिंगभाव भूमिका, लिंग, पितृसत्ताक पद्धती, लिंगभावाचे लेखापारीक्षण, उदारमतवादी, जहालवादी, समाजवादी दृष्टीकोन अभ्यासले त्याच बरोबर वैज्ञानिक पद्धतीने जात, वर्ग आणि धर्माच्या दृष्टीने लैंगिक असमानतेचा संवरचनात्मक दृष्टीकोन हि अभ्यासला त्याच बरोबर महाराष्ट्रातील स्त्रीवादीविचार प्रणालीतील महत्व पूर्ण अभ्यासक यांची थोडक्यात चर्चा केली आणि त्यांचे विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


- Bhasin, Kamala (1998). *What is Patriarchy?* New Delhi: Kali for Women. ISBN 8185107734.
- Geetha, V (2009). *Patriarchy*. Kolkata: Stree. p. 5. ISBN 8185604460.
- Lerner, Gerda (1988). *The creation of Patriarchy*. United Kingdom: Oxford University press. ISBN 9780195051858.
- Papanek, Hanna (1979). "Family status production: The "work" and "non-work" of women". *Signs*. vol. 4, No.4: 775– 781 – JSTOR .
- Deshmukh-Ranadive, Joy (2002). *Spaces for Power: Women's Work in South and South East Asia*. New Delhi: Rainbow Publishers Ltd. ISBN 8186962565.
- Geeta V: Gender, Calcutta: Stree, 2002 Geeta V: Patriarchy, Calcutta: Stree,2007
- Ghadially, Rehana Women in Indian Society, Sage, New Delhi Omvedt, Gail:
- Neera Desai and Usha Thakkar: Rege, Sharmila: B. Ratna Kumari and K. Mary Sujatha: Rajesh Gill: Inter Action International Labour Organisation UNICEF Caste, Class and Women's Liberation in India, Bulletin of Concerned Asian Scholars. Women and Society in India, NBT, 2004.
- Writing Caste/ Writing Gender: Narrating Dalit Women's Testimonies, New Delhi: Zubaan, an imprint of Kali for Women. (2006) Gender Awareness and Gender Audit, Uday Publishing House, 2014
- Gender, Culture and Honour: Gender Audit of Punjab and Haryana, Rawat Publication- 2019 "The Gender Audit Handbook: A tool for organisational self-assessment and transformation" 2010.


❑❑❑

## घटक २
## लिंगभाव लेखापरीक्षण कसे करावे
(How to Conduct Gender Audit)

**अनुक्रमणिका**


२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.३.१ लिंगभाव लेखापरीक्षणाचा इतिहास, उद्दिष्टे व गरज

२.३.२ लिंगभाव लेखापरीक्षण करण्यासाठीचे टप्पे- नियोजन, लिंगभाव लेखापरीक्षण प्रक्रिया, मसुदा अहवाल आणि अंतिम अहवाल

२.३.३ लिंगभाव लेखापरीक्षकाची भूमिका आणि यादी

२.३.४ लिंगभाव लेखापरीक्षण: भारतातील खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्र

२.४ सारांश

२.५ स्मरणार्थ संज्ञा

३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## २.१ उद्दिष्टे:

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास-

१. लिंगभाव लेखापरीक्षणाचे उद्दिष्टे आणि गरज समजुन घेता येतील.

२. विविध क्षेत्रांतील लिंगभाव लेखापरीक्षण करण्याचे कौशल्ये वाढवता येतील.

३. लिंगभाव लेखापरीक्षणाच्या प्रक्रियेतील विविध टप्पे समजुन घेता येतील.

## २.२ प्रास्ताविक

अलिकडच्या दशकांमध्ये, लैंगिक समानतेच्या महत्त्वाला जगभरात अभूतपूर्व मान्यता मिळाली आहे. संस्था, धोरणे आणि कार्यक्रमांमध्ये लैंगिक प्रतिसादाचे मूल्यांकन आणि वाढ करण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षण हे एक महत्त्वाचे साधन म्हणून उदयास आले आहे. विविध संस्था लिंगभाव समानतेचे महत्त्व

अधिकाधिक ओळखत असल्याने, लिंगभाव प्रतिसादाचे मूल्यांकन वर्धित करण्यासाठी प्रभावी साधनांची आवश्यकता महत्वपूर्ण बनते. लिंगभाव लेखापरीक्षण हे असेच एक साधन आहे, जे धोरणे, पद्धती आणि संस्थात्मक संस्कृतीमध्ये लिंगभाव विचार कसे समाकलित केले जातात याचे लेखापरीक्षण करण्यासाठी व्यवस्थाबद्ध दृष्टीकोन देते. या प्रकरणाचे उद्दिष्ट आहे की लिंगभाव लेखापरीक्षणाची गरज समजून घेणे, या महत्त्वपूर्ण प्रक्रियेची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्ये विकसित करणे व लिंगभाव लेखापरीक्षणाच्या प्रक्रियेतील विविध टप्पे समजुन घेऊन लिंगभाव सर्वसमावेशक मार्गदर्शन प्रदान करणे.

लिंगभाव लेखापरीक्षण आयोजित करताना लिंगभाव समानतेवर संस्थेच्या प्रभावाची सखोल तपासणी करण्यासाठी अनेक पायऱ्यांचा समावेश होतो. ही प्रक्रिया केवळ लिंगभाव दरी आणि असमानतेचे परीक्षण करत नाही तर सुधारणा आणि नाविन्यपूर्ण संधी देखील अधोरेखित करते. या घटकात, आपण लिंगभाव लेखापरीक्षण करण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यांची रूपरेषा आणि उद्देश परिभाषित करण्यापासून माहितीचे संकलन आणि विश्लेषण करण्यापर्यंतचा अभ्यास करणार आहोत. या प्रकरणाच्या शेवटी, संस्थांमध्ये लैंगिक समानतेची सखोल बांधिलकी वाढवून, प्रभावीपणे लिंगभाव लेखापरीक्षण कसे करावे हे स्पष्टपणे समजुन घेता येईल. तसेच लिंगभाव लेखापरीक्षण हे अर्थपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी आणि अधिक न्याय्य भविष्याला चालना देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण संसाधन म्हणून कसे काम करते ते समजण्यास मदत होईल.

## २.३ विषय विवेचन

प्रास्ताविकात नमूद केल्याप्रमाणे या घटकात लिंगभाव लेखापरीक्षणाची प्रक्रिया कशी पार पाडली जाते हे अभ्यासणार आहात, विवेचनाच्या दृष्टीने या घटकाचे एकूण ४ विभाग पाडलेले आहेत. पहिल्या घटकात लिंगभाव लेखापरीक्षणाचा इतिहास, उद्दिष्टे व लिंगभाव लेखापरीक्षणाची गरज स्पष्ट करण्यात आली आहे. दुसऱ्या विभगात लिंगभाव लेखापरीक्षणाच्या प्रक्रियेचे टप्पे स्पष्ट करण्यात आले आहेत. तिसऱ्या विभगात लिंगभाव लेखापरीक्षकांची भूमिका व लिंगभाव लेखापरीक्षणाची सूची स्पष्ट केलेली आहेत तर शेवटच्या चौथ्या विभागात भारतातील खाजगी आणि सरकारी क्षेत्रातील लिंगभाव लेखापरीक्षणाचे विवेचन करण्यात आले आहे.

### २.३.१ लिंगभाव लेखापरीक्षणाचा इतिहास, उद्दिष्टे व गरज

### (History, Objective and need of Gender Audit)

या घटकात तुम्ही लिंगभाव लेखापरीक्षणाचा इतिहास, उद्दिष्टे व गरज अभ्यासणार आहात. लिंगभाव लेखापरीक्षणाची सुरवात कशी झाली, त्याचा इतिहास किंवा पार्श्वभूमी काय आहे. लिंगभाव लेखापरीक्षणाची उद्दिष्टे कोणती? आणि लिंगभाव लेखापरीक्षणाची आजच्या काळातील गरज आपण बघणार आहोत.

#### २.३.१.१ लिंगभाव लेखापरीक्षणाचा इतिहास (History of Gender Audit)

अतिप्राचीन काळी भारतीय स्त्रीचे स्थान उच्च दर्जाचे होते. भारतीय समाजाचा अभ्यास करतांना असे दिसते की, समाजातला स्त्रीविषयक दृष्टिकोन जसा बदलत गेला, त्यानुसार स्त्रीच्या दर्जात अनेक बदल

घडून आले. भारतीय परंपरेत कालखंडानुसार स्त्रीच्या दर्जात परिवर्तन झालेले दिसते. लिंगभाव लेखापरीक्षणाचा इतिहास हा लिंगभाव समानतेची विकसित होणारी समज आणि असमानता दूर करण्यासाठी विकसित केलेली यंत्रणा प्रतिबिंबित करतो. समाजशास्त्रात, लिंगभाव लेखापरीक्षण म्हणजे संस्था, धोरणे, सामाजिक प्रणाली किंवा सांस्कृतिक पद्धतींमध्ये विशिष्ट संदर्भात लिंगभाव संबंध, भूमिका आणि असमानता यांचे मूल्यांकन आणि विश्लेषण करण्याची प्रक्रिया. यामध्ये लैंगिक असमानता शोधणे, या असमानतेची मूळ कारणे समजून घेणे आणि लिंगभाव समानता प्राप्त करण्यासाठी उपाययोजना प्रस्तावित करणे समाविष्ट आहे. इतिहासातील पुढील काही मुख्य घडामोडींचा आढावा घेऊन आपण लिंगभाव लेखापरीक्षणाचा इतिहास समजून घेऊ शकतो.

**प्रारंभिक पाया (Early Foundations)**

लिंगभाव संदर्भातील विचार २० व्या शतकाच्या सुरुवातीस स्त्रीवादी चळवळी आणि सुरुवातीच्या सामाजिक सिद्धांतकारांनी प्रभावित केले. मेरी वॉलस्टोनक्राफ्ट (१७९२) सारख्या व्यक्तींनी महिलांच्या हक्कांसाठी आवाज उठविला आणि पारंपारिक लिंगभाव भूमिकांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सुरुवातीच्या काळात लिंगभाव-संबंधित समाजशास्त्रीय विश्लेषण बहुतेकदा कुटुंबातील महिलांच्या भूमिका आणि सार्वजनिक आणि आर्थिक जीवनातून त्यांना वगळण्याभोवती फिरत होते, ज्यामुळे लिंगभाव भूमिका आणि मानदंडांच्या सामाजिक बांधणीकडे लक्ष वेधले गेले. १९६० आणि १९७० च्या स्त्रीवादी चळवळींनी रोजगार, शिक्षण आणि राजकीय प्रतिनिधित्व यासह जीवनाच्या विविध पैलूंमध्ये स्त्रियांना भेडसावणारी व्यापक असमानता अधोरेखित केली होती. तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी सुद्धा या मुद्द्यांना मान्यता देण्याची मागणी केली, ज्यामुळे लैंगिक समानतेबद्दल प्रारंभिक चर्चेला सुरुवात झाली. याच दरम्यान पाश्चात्य जगात स्त्रीवादी चळवळ आणि स्त्रीवादाची दुसरी लाट उद्भवली, समाजशास्त्रीय अभ्यासात सामाजिक श्रेणी म्हणून लिंगभावावर तीव्रपणे लक्ष केंद्रित करण्यात आले. सिमोन द बोउआर, Simone de Beauvoir बेट्टी फ्रीडन आणि गेर्डालर्नर सारख्या विद्वानांनी महिलांची सामाजिक स्थिती आणि लिंगभाव-आधारित अत्याचार समजून घेण्यात योगदान दिले. तसेच समाजशास्त्रातील लिंगभाव अभ्यासामध्ये संस्था (उदा. कुटुंब, शिक्षण, कामाची जागा) लैंगिक असमानता कशी कायम ठेवतात याचे परीक्षण होऊ लागले. या कालावधीने आंतरविभाजनालाही जन्म दिला, १९८० च्या दशकात किम्बर्ले क्रेनशॉ यांनी मांडलेल्या आंतरविभाजनाच्या (Intersectionality) कल्पनेंतर्गत लिंगभाव, वंश, वर्ग आणि इतर सामाजिक श्रेणींच्या परस्परसंबंधांवर जोर देण्यात आला. आणि यामुळेच कामाच्या ठिकाणी समानता, प्रजनन अधिकार आणि महिलांसाठी कायदेशीर संरक्षण यावर लक्ष केंद्रित केले गेले आणि लिंगभाव लेखापरीक्षणाची गरज स्पष्ट करण्यात आली. तसेच या कालावधीत संयुक्त राष्ट्रांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये समानतेच्या फ्रेमवर्कचे औपचारिकीकरण आणि लिंगभाव मुख्य प्रवाहात आणणे यांसारख्या संकल्पना देखील सादर केल्या गेल्या. संयुक्त राष्ट्रांनी लिंगभाव समस्यांना औपचारिकपणे संबोधित करण्यास सुरुवात केल्यामुळे आंतरराष्ट्रीय जागरूकता वाढली व १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित करण्यात आले. १९७५ मध्ये मेक्सिको शहर येथे महिलांवरील पहिली आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती, या परिषदेने महिलांच्या हक्कांवरील जागतिक

चर्चेत एक महत्त्वाचे वळण घेतले. लैंगिक समस्या आंतरराष्ट्रीय विकासासाठी केंद्रस्थानी बनल्या, ज्यांनी समानतेच्या दिशेने प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षणाच्या रूपरेषेवर प्रभाव टाकला. १९८० च्या दशकात, स्त्रीवादी विद्वान आणि कार्यकर्त्यांनी लिंगभाव आणि विकास (Gender and Development i.e. GAD) दृष्टीकोन विकसित केला, केवळ महिलांच्या कल्याणासाठीच नव्हे तर समाजातील लैंगिक संबंधांच्या परिवर्तनावर याद्वारे भर दिला गेला. १९व्या आणि २०व्या शतकातील व्यापक स्त्रीवादी चळवळींमधून लैंगिक भूमिका आणि असमानता तपासल्या गेल्या. महिलांचे हक्क आणि लैंगिक समानता हे केंद्रीय मुद्दे बनल्यामुळे, विद्वान आणि कार्यकर्त्यांनी असमानता समजून घेण्यासाठी अधिक संरचित आणि डेटा-चालित दृष्टीकोन अंगीकरण्यास सुरुवात केली. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात ते २०व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात, लिंगभाव लेखापरीक्षण औपचारिकरित्या केले गेले नाहीत परंतु ते लिंगभाव समानतेच्या व्यापक चळवळीचा भाग होते. स्त्रियांना भेडसावणाऱ्या असमानता अधोरेखित करण्यासाठीच्या प्रयत्नांना ''लिंगभाव लेखापरीक्षण'' म्हणून संबोधले गेले नसले तरीही १८६९ मध्ये स्थापित 'राष्ट्रीय महिला मताधिकार संघ' (Women's Suffrage Association) आणि १९०४ मध्ये स्थापन झालेली 'आंतरराष्ट्रीय महिला मताधिकार आघाडी' (International Women's Suffrage Alliance) सारख्या कार्यकर्त्यांनी आणि संस्थांनी लिंगभाव आधारित संशोधन केले.

**एक औपचारिक साधन म्हणून लिंगभाव लेखापरीक्षण (Gender Audit as a Formal Tool)**

एक औपचारिक साधन म्हणून लिंगभाव लेखापरीक्षणाची संकल्पना १९८० च्या दशकात शोधली जाऊ शकते. या कालावधीत, विशेषतः पुरुष आणि महिलांवर विकास कार्यक्रमांच्या प्रभावाचे मूल्यांकन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय विकास मंडळांमध्ये लिंगभाव विश्लेषण साधने विकसित केली जात होती. नैरोबीमध्ये १९८५ ला युनायटेड नेशन्सच्या तिसऱ्या जागतिक महिला परिषदने लिंगभाव-संवेदनशील धोरणे आणि कृतींची गरज ओळखण्यात महत्त्वपूर्ण प्रगती केली. यामुळे लिंगभाव लेखापरीक्षणाचा पाया रचण्यात मदत झाली, कारण आंतरराष्ट्रीय समुदायाने हे ओळखले की लैंगिक असमानता ही केवळ एक सामाजिक समस्या नाही तर विकासाच्या परिणामांसाठी एक गंभीर चिंता देखील आहे. १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात बऱ्याच देशांनी त्यांच्या विकासाच्या अजेंड्यांमध्ये लैंगिक दृष्टीकोनांचा समावेश केला. गैर-सरकारी संस्था, जागतिक बँक आणि युरोपियन युनियन सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी त्यांच्या प्रकल्पांच्या माध्यमातून लैंगिक असमानतेचे निराकरण किती प्रभावीपणे केले याचे मूल्यांकन करण्यासाठी लिंगभाव मूल्यमापनाला महत्व दिले गेले.

**जागतिक फ्रेमवर्क (Global Framework)**

१९८० मध्ये Convention on the Elimination of All Forms of Discrimination Against Women (CEDAW) महिलांवरील सर्व प्रकारच्या भेदभावाच्या निर्मूलनावरील अधिवेशनाचा अवलंब केल्याने लैंगिक समानतेला चालना देण्यासाठी कायदेशीर चौकट निश्चित केली गेली. भेदभाव दूर करण्यासाठी आणि महिलांच्या हक्कांना चालना देण्यासाठी सरकारने सक्रिय उपाययोजना करण्याच्या गरजेवर जोर देण्यात आला. विद्वान आणि अभ्यासकांनी विविध लिंगभाव धोरणे आणि पद्धतींच्या प्रभावाचे मूल्यांकन

करण्यासाठी लिंगभाव विश्लेषण फ्रेमवर्क विकसित करण्यास सुरुवात केली. १९९० च्या दशकापर्यंत, लिंगभाव लेखापरीक्षण हे आंतरराष्ट्रीय विकास आणि शासनामध्ये अधिक व्यापकपणे ओळखले जाणारे साधन बनले होते. संस्थांनी त्यांच्या धोरण-निर्धारण आणि प्रकल्प मूल्यमापनांमध्ये लिंगभाव विश्लेषण औपचारिकपणे एकत्रित करण्यास सुरुवात केली. याच दरम्यान राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना १९९२ मध्ये वैधानिक संस्था म्हणून करण्यात आली. बीजिंगमध्ये १९९५ ला झालेली महिलांवरील चौथी जागतिक परिषद निर्णायक होती, ज्यामुळे लैंगिक समानतेसाठी एक व्यापक आराखडा तयार झाला. लिंगभाव समानतेच्या जागतिक अजेंडासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण वळण ठरली. बीजिंग घोषणा आणि कृतीसाठी प्लॅटफॉर्म हा महिला सक्षमीकरणाचा एक अजेंडा होता जो आता लैंगिक समानतेवरील प्रमुख जागतिक धोरण दस्तऐवज मानला जातो. विसाव्या शतकाच्या शेवटच्या तिमाहीत युनायटेड नेशन्सने आयोजित केलेल्या महिलांवरील चार जागतिक परिषदा जागतिक अजेंडाच्या केंद्रस्थानी लैंगिक समानतेचे कारण आणण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरल्या.

महिलांच्या प्रगतीसाठी प्रभावी कृती योजनेसह परिषदांनी आंतरराष्ट्रीय समुदायाला समान उद्दिष्टांच्या मागे एकत्र केले. युएन डिव्हिजन फॉर वुमनने आपल्या चार जागतिक परिषदांच्या पुनरावलोकनात म्हटले आहे की, ''बीजिंगमध्ये घडलेले मूलभूत परिवर्तन म्हणजे समाजाची संपूर्ण रचना, स्त्रियांकडून लिंगभाव संकल्पनेकडे लक्ष केंद्रित करण्याची गरज ओळखून त्यामधील स्त्री आणि पुरुष यांच्यातील सर्व संबंधांचे पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक आहे, केवळ समाजाच्या आणि त्याच्या संस्थांच्या अशा मूलभूत पुनर्रचनेद्वारेच स्त्रियांना जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये पुरुषांबरोबर समान भागीदार म्हणून त्यांचे योग्य स्थान घेण्यास पूर्णपणे सक्षम केले जाऊ शकते''. लिंगभाव समानता वचनबद्धतेचे पालन सुनिश्चित करणे आणि संघटनात्मक परिणामकारकता वाढवणे यासाठी सरकारी, स्वयंसेवी संस्था आणि खाजगी क्षेत्रात लिंगभाव लेखापरीक्षण वाढत्या प्रमाणात स्वीकारले जाऊ लागले.

#MeToo चळवळ आणि इतर जागतिक लैंगिक समानता चळवळींनी लिंगभाव लेखापरीक्षणाच्या संभाषणाचे पुनरुज्जीवन करून, संस्थांना अधिक ठोस कृती करण्यास भाग पाडले आहे. १९९० च्या दशकाच्या मध्यात जागतिक बँक आणि स्वीडिश इंटरनॅशनल डेव्हलपमेंट कोऑपरेशन एजन्सी Swedish International Development Cooperation Agency (SIDA) सारख्या देणगीदार संस्थांनी विकसनशील देशांमध्ये निधी पुरवल्या जाणाऱ्या प्रकल्पांसाठी लिंगभाव लेखापरीक्षणाची आवश्यकता सुरू केली. या लेखापरीक्षणांनी लिंगभाव भूमिका आणि संबंध प्रकल्पाच्या परिणामांवर कसा परिणाम करू शकतात हे लक्षात घेऊन प्रकल्पाची उद्दिष्टे पुरुष आणि स्त्रिया या दोघांच्या गरजा पूर्ण करत आहेत की नाही याचे मूल्यांकन करण्यात मदत केली.

**लिंगभाव लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि संस्थात्मक वापर (Expanding Scope and Organizational Use)**

विकास आणि आंतरराष्ट्रीय सहाय्य क्षेत्रांच्या पलीकडे सरकारी संस्था, कॉर्पोरेशन आणि गैर-सरकारी संस्था (एनजीओ) यासारख्या व्यापक संस्थात्मक क्षेत्रांत लिंगभाव लेखापरीक्षणाची संकल्पना विस्तारत

राहिली. २००० च्या संयुक्त राष्ट्रसंघाने दिलेल्या सहस्रक विकासाची ध्येये (Millenium Development Goals) स्पष्टपणे लिंगभाव मूल्यमापनावर लक्ष केंद्रित करत नसले तरी, MDGs क्र. ३ हे लिंगभाव समानतेला प्रोत्साहन देऊन स्त्रियांचे सशक्तीकरण करणे यावर केंद्रित असल्याने लिंगभाव मूल्यमापनाला या लक्ष्यांच्या दिशेने प्रगतीचे निरीक्षण करण्यासाठी अधिक केंद्रस्थानी बनवले गेले. अधिक औपचारिक लिंगभाव लेखापरीक्षणाची साधने आणि पद्धतींची निर्मिती देखील झाली, जी सार्वजनिक आरोग्यापासून ते व्यवसायापर्यंत विविध क्षेत्रांसाठी तयार केली गेली होती. गैर सरकारी संस्थांनी, विशेषत: मानवी हक्क आणि महिला सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित करणाऱ्या संस्थांनी लैंगिक समानतेच्या अंतर्गत पद्धतींचे मूल्यांकन आणि सुधारणा करण्याचा मार्ग म्हणून लिंगभाव लेखापरीक्षणाचा अवलंब केला. अनेक प्रगतीशील कॉर्पोरेशन्स, विशेषत: युरोपमध्ये कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (Corporate Social Responsibility) धोरणांचा भाग म्हणून त्यांचे कार्यबल, नेतृत्व आणि वेतन संरचनांमध्ये लैंगिक संतुलनाचे मूल्यांकन करण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षणाच्या वापरास सुरुवात झाली.

**लिंगभाव लेखापरीक्षण लिंगभाव मुख्यप्रवाहासाठीचे साधन**

**(Gender Audit as a Tool for Gender Mainstreaming)**

लिंगभाव प्रतिनिधित्व, वेतन समानता आणि समावेशाबाबत पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाच्या वाढत्या मागण्यांना प्रतिसाद म्हणून २०१० च्या दशकात विविध क्षेत्रांमध्ये लैंगिक समानतेच्या क्षेत्रात वाढत्या स्वारस्याचा काळ होता व लिंगभाव लेखापरीक्षण हे स्त्रीवादी संघटना आणि धोरण सुधारणांसाठी समर्थन करणाऱ्या तज्ञमंडळासाठी आवश्यक साधन बनले. संयुक्त राष्ट्रांसह आंतरराष्ट्रीय संस्थांनी, शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) सारख्या जागतिक उपक्रमांच्या यशावर लक्ष ठेवण्यासाठी लिंगभाव-प्रतिसादात्मक अर्थसंकल्प आणि लिंगभाव लेखापरीक्षणाची आवश्यकता बळकट केली. लिंगभाव लेखापरीक्षण आयोजित करण्यासाठी साधने देखील अधिक अत्याधुनिक बनवली, ज्यामध्ये परिमाणात्मक आणि गुणात्मक दोन्ही माहिती गोळा करण्याच्या पद्धती समाविष्ट करण्यात आल्या आणि केवळ लिंगभाव समानतेवरच नव्हे तर लिंगभाव न्यायावर सुद्धा लक्ष केंद्रित करण्यात आले. खाजगी क्षेत्रात, विविधता, समानता आणि समावेशन सुधारण्यासाठी व्यापक प्रयत्नांचा एक भाग म्हणून लिंगभाव लेखापरीक्षणासाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले गेले. महामंडळांनी कामगारांना कामावर घेण्याच्या पद्धतींपासून ते नेतृत्व विविधता आणि लैंगिक वेतनातील तफावतींपर्यंत सर्व गोष्टींचे मूल्यांकन करण्यासाठी अंतर्गत लिंगभाव लेखापरीक्षण करण्यास सुरुवात केली. यूएस आणि युरोपमधील प्रमुख कंपन्यांनी लैंगिक समानता अहवाल जारी करण्यास सुरुवात केली, जे त्यांच्या लिंगभाव लेखापरीक्षण आणि पारदर्शक उत्तरदायित्वाची वचनबद्धता प्रतिबिंबित करतात. जागतिक स्त्रीवादी चळवळींच्या उदयाने लिंगभाव लेखापरीक्षणाची गरज आणखी वाढवली, विशेषत: कार्यस्थळे, सरकारे आणि मीडिया संस्थांमधील असमानता आणि छळवणूक यावर प्रकाश टाकला. या चळवळींनी विविध संस्थांमधील लिंगभाव पद्धतींचे अधिक व्यवस्थाबद्ध लेखापरीक्षण करण्याची मागणसुद्धा केली.

जागतिक संस्था आणि राष्ट्रीय सरकारांपासून ते विद्यापीठे, आरोग्य सेवा प्रणाली आणि कॉर्पोरेशन्सपर्यंत लैंगिक समानता सुनिश्चित करण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षण हे महत्वाचे साधन म्हणून विकसित होण्याची शक्यता दर्शविली जात आहे. सरकारे आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी पर्यावरणीय स्थिरता आणि हवामान बदल प्रकल्पांमध्ये लिंगभाव लेखापरीक्षण समाकलित केले, ज्यामध्ये पर्यावरणीय धोरणांचे लिंगभाव आधारित प्रभाव वाढत्या प्रमाणात ओळखले जाऊ शकतात. याव्यतिरिक्त, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन आणि एआय तंत्रज्ञान जसजसे पुढे जात आहे त्यामुळे, पायरीगणिक पक्षपात, तंत्रज्ञानाची संधी आणि डिजिटल लिंगभाव असमानता यासारख्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षण स्वीकारले जाण्याची शक्यता आहे.

लिंगभाव लेखापरीक्षणाचा इतिहास तळागाळापासून लिंगभाव समानतेला चालना देण्यासाठी औपचारिक साधनांपर्यंतचा प्रगतीशील प्रवास दर्शवतो. जसजसा समाज विकसित होत आहे, तसतसे लिंगभाव लेखापरीक्षण पद्धती आणि अनुप्रयोग देखील विविध क्षेत्रांमध्ये सर्वसमावेशक आणि न्याय्य वातावरणास प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक बनत आहेत. विकास आणि अनुकूलन द्वारे, लैंगिक समानतेकडे बदल घडवून आणण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षण ही एक प्रमुख यंत्रणा म्हणून कार्य करतांना दिसते.

### २.३.१.२ लिंगभाव लेखापरीक्षणाची उद्दिष्टे (Objectives of Gender Audit)

लिंगभाव लेखापरीक्षणाची संकल्पना आणि त्याची उद्दिष्टे हे मुख्यत्वे ''लिंगभाव आणि विकास'' (Gender and Development) क्षेत्राला दिले जाते, जे १९८० आणि १९९० च्या दशकात विकास पद्धती आणि धोरणांमध्ये लैंगिक दृष्टीकोन समाकलित करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून उदयास आले होते. लिंगभाव लेखापरीक्षण आणि त्यांची उद्दिष्टे यांचा पहिला औपचारिक परिचय अनेकदा संयुक्त राष्ट्र (United Nations), जागतिक बँक आणि स्वयंसेवी विकास संस्थांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांद्वारे प्रोत्साहन दिलेल्या लिंगभाव मुख्य प्रवाहातील उपक्रमांशी जोडला जातो. लिंगभाव लेखापरीक्षण ची उद्दिष्टे तयार करण्यासाठी सर्वत्र श्रेय दिलेली एकही विशिष्ट व्यक्ती नसताना, अनेक प्रमुख संस्था आणि विद्वानांनी कार्यपद्धती तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

UNIFEM (United Nations Development Fund for Women) ही १९९० च्या दशकात लिंगभाव लेखापरीक्षणाची साधने आणि मार्गदर्शक तत्त्वे विकसित करण्यासाठी अग्रणी संस्थांपैकी एक होती. लिंगभाव आणि विकास नेटवर्क (Gender And Development Network), हे यूनायटेड किंगडम स्थित एनजीओ नेटवर्क, लिंगभाव लेखापरीक्षणाचेप्रमुख प्रवर्तक असून, ते विकास धोरणे आणि पद्धतींमध्ये लिंगभाव एकत्रीकरणाचे मूल्यांकन करण्यासाठी साधने आणि आराखडा प्रदान करते. १९९० च्या दशकात, जागतिक बँकेने त्यांच्या विकास प्रकल्पांमध्ये लिंगभाव विचार कसे समाकलित केले जात आहेत याचे मूल्यांकन करण्यासाठी त्यांच्या कार्यक्रमांचे लिंगभाव लेखापरीक्षण करण्यास सुरुवात केली. जागतिक बँकेने लिंगभाव लेखापरीक्षणासाठी एक फ्रेमवर्क प्रकाशित केले आणि लिंगभाव समानतेवर प्रकल्पाच्या प्रभावाचे मूल्यांकन करणे, असमानता ओळखणे आणि विकास कार्यक्रमात लिंगभावाचा अधिक समावेश करण्यासाठी

शिफारसी करणे यासारखी प्रमुख उद्दिष्टे ओळखली. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रीवादी विद्वान आणि विकास अभ्यासक नाइला कबीर, अमर्त्य सेन आणि केरन ग्रोन यांनी देखील विकास कार्यक्रमांमध्ये लैंगिक समानता सुनिश्चित करण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षणाची व्याख्या करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. लिंगभाव विश्लेषण आणि महिला सक्षमीकरणावरील त्यांच्या कार्याने लेखापरीक्षण पद्धतीचा पाया घातला. २००० च्या दशकाच्या सुरुवातीस, युरोपियन युनियनने विकास सहकार्यामध्ये लिंगभाव मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्याच्या व्यापक धोरणाचा भाग म्हणून लिंगभाव मूल्यमापना पद्धतींचा अवलंब केला. लिंगभाव लेखापरीक्षणासाठी औपचारिक मार्गदर्शक तत्त्वे आणि उद्दिष्टे एका व्यक्तीने परिभाषित केलेली नाहीत परंतु लिंगभाव मुख्य प्रवाहात आणण्याच्या चळवळीचा एक भाग म्हणून आंतरराष्ट्रीय संस्था, विकास संस्था आणि स्त्रीवादी विद्वानांनी परस्पर सहकार्याने लिंगभाव लेखापरीक्षण विकसित केले. या संस्था आणि विचारवंतांच्या कार्याने आज विविध क्षेत्रे आणि संस्थांमध्ये लैंगिक समानतेचे मूल्यांकन करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या लिंगभाव लेखापरीक्षण फ्रेमवर्कच्या विकासात योगदान दिसते. लिंगभाव लेखापरीक्षणाची काही प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### १. लिंगभाव समानता आणि समतेचे मूल्यांकन (To assess Gender Equality and Equity)

भारतीय समाजात आपण बघतो स्त्रीयांचा दर्जा दुय्यम, कनिष्ठ प्रतीचा होता. स्त्री व पुरुष यांची शारीरिक व मानसिक भिन्नता जरी जीवशास्त्रीय स्वरूपाची असली तरी सामाजिक स्तरावर तिला या लिंगभेदावर आधारित वागणूक मिळू लागली. स्त्री-पुरुष असमानता हा मूळ मुद्दा धरून तिला सर्वच क्षेत्रात कनिष्ठ दर्जा प्राप्त झाला. परंतु हे दुय्यम स्थान अन्यायी विषमतेवर आधारित असल्याने याविरुद्ध स्त्रीत्वाचे दुय्यम स्थान नाकारून माणूस म्हणून समाजात स्थान मिळवुन देण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी स्त्रियांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य केले. स्त्रियांवरील अन्याय-अत्याचार दूर करून समता प्रस्थापित करण्यासाठी महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, न्यायमूर्ती रानडे इत्यादींची विचारधारा महत्वपूर्ण ठरली, त्यांच्या विचारातून भारतीय स्त्री शतकानूशतके दुर्लक्षित होती. भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीला कधीही समतेचे स्थान मिळालेले नाही, आजही विसाव्या शतकात स्त्रियांचा समानता आणि समतेचा लढा सुरू असल्याचा आपणांस दिसतो. जरी आपण आधुनिकतेकडे वाटचाल करत असलो, किंवा तांत्रिक दृष्ट्या प्रगतीच्या मार्गावर असलो, तरीसुद्धा आर्थिक, सामाजिक राजकीय क्षेत्रांत स्त्रियांना समान दर्जा किंवा समतेचे स्थान मिळालेले दिसून येत नाही. खऱ्या अर्थाने, स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पारित केलेले हिंदू कोड बिल लागू झाल्यानंतर स्त्रीच्या दर्जात परिवर्तन घडून आलेले आपणांस दिसून येते. कायदा सुव्यवस्था, संविधानात्मक कायद्यांची कडक अमलबजावणी तसेच जागतिक स्तरावरील स्त्रियांच्या हक्कांसाठी आयोजित केल्या जाणाऱ्या परिषदा यामुळे स्त्रियांच्या दर्जात सुधारणा झालेली आपण पाहतो. या सर्व गोष्टींचा विचार केल्यास असे लक्षात येते की, लिंगभाव समानता आणि समतेचे मूल्यांकन हे लिंगभाव लेखपरीक्षणाचे महत्वाचे उद्दिष्ट ठरते. एखाद्या संस्थेच्या धोरण पद्धतींमध्ये लिंगभाव विचार किती प्रमाणात समाविष्ट केले जातात व लैंगिक समानता किंवा समतेतील दरी ओळखून संस्था कशा पद्धतीने लिंगभाव गटांच्या गरजा पूर्ण करतात याचे मूल्यांकन या उद्दिष्टांतर्गत केले जाते.

## २. लिंगभाव प्रभावाविषयी जाणून घेणे (To understand the gendered impact)

लिंगभाव हे केवळ एक जैविक वैशिष्ट्य नाही तर सांस्कृतिक मानदंड आहे संस्थात्मक पद्धती यांद्वारे आकारास आलेली एक सामाजिक रचना आहे. भारतीय संदर्भात, पारंपरिक सांस्कृतिक नियम, सामाजिक संरचना, आर्थिक विषमता आणि विकसित होत असलेल्या कायदेशीर चौकटींच्या गुंतागुंतीच्या परस्परसंवादामुळे लिंगभावा वर प्रभाव पडताना दिसून येतो. लैंगिक समानतेमध्ये प्रगती असूनही शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा आणि कौटुंबिक जीवन यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये लैंगिक प्रभाव कायम दडलेले आढळतात, ज्यांना पितृसत्ताक मूल्यांद्वारे आकार दिला जातो. भारतात, शैक्षणिक यशप्राप्ती आणि करिअरच्या संधींमध्ये लिंगभाव प्रभाव दिसून येतो. विशेषतः ग्रामीण भागात मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिल्या जाणाऱ्या सामाजिक निकषांमुळे मुलींना शिक्षणात अडथळे येतात. शहरी भागात सुद्धा मुलींना त्यांच्या आवडीच्या शिक्षण क्षेत्रात प्रवेश घेण्यावर मर्यादा असतात तर मुलांना उच्च वेतन असणाऱ्या क्षेत्रांत प्रवेश घेण्यास प्रोत्साहित केले जाते. याव्यतिरिक्त, आरोग्याच्या बाबतीतही लिंगभावनिहाय प्रभाव स्पष्ट केले जाऊ शकतात जिथे स्त्रियांना सांस्कृतिक पद्धती, सामाजिक नियमने आणि प्रजनन आरोग्य सेवांमध्ये सोयी नसल्यामुळे आव्हानांचा सामना करावा लागतो.

ग्रामीण भागात, स्त्री भ्रूणहत्या, कमी वयात विवाह, आणि मातृत्वाच्या काळजीसाठी मर्यादित संधी हे लिंगभाव-आधारित पूर्वाग्रह दर्शवतात ज्यामुळे स्त्रियांच्या जीवनाचे अवमूल्यन होत असते. तसेच स्त्रियांच्या आरोग्याबाबतचे निर्णय कुटुंबातील पुरुष सदस्य घेतांना दिसतात. मानसिक आरोग्याच्या समस्या देखील लिंगभाव प्रभाव दर्शवितात, सामाजिक दबावांमुळे स्त्रियांना नैराश्य आणि चिंतेचे प्रमाण जास्त असते, तर पुरुषांना भावनिक संयम दाखवावा या अपेक्षेमुळे मानसिक मदत घेण्यापासून परावृत्त केले जाते. भारतात स्त्रियांवर कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक छळ, महिला तस्करी आणि सन्मान-आधारित हिंसा यांमध्ये लैंगिक प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. विशेषत: उपेक्षित समुदायातील (दलित, आदिवासी आणि खालच्या जातीतील) महिलांना हिंसाचार आणि भेदभावाचा सामना करावा लागतो. महिलांचा राजकीय सहभाग वाढवण्यासाठी भारताने महिलांसाठी कायदेशीर संरक्षण, जसे की कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक छळ आणि बालविवाह विरुद्ध कायदे, तसेच स्थानिक सरकारी संस्थांमध्ये आरक्षण देऊन सुधारण्यात लक्षणीय प्रगती केली असूनही या कायद्यांच्या अंमलबजावणीच्या बाबतीत लिंगभावनिहाय प्रभाव अजूनही अस्तित्वात आहे. या विषमतेचे निराकरण करण्यासाठी संघटनात्मक धोरणे आणि सेवा वेगवेगळ्या लिंगभावांवर कसा प्रभाव पाडतात याचे विश्लेषण करणे. तसेच पुरुष, स्त्रिया, नॉन-बायनरी लोकांवर किंवा विविध लिंगभाव असलेल्या लोकांवर, विशेषत: संसाधनांमध्ये संधी, निर्णय घेण्याच्या आणि परिणामांच्या बाबतीत भिन्न प्रभाव आहेत का ते तपासण्यासाठी सदर उद्दिष्ट महत्वाचे आहे.

## ३. संरचनात्मक असमानता जाणून घेणे (To Identify Structural Inequalities)

भारतीय समाजाच्या संदर्भात, लिंगभाव आधारित असमानता सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रणालींमध्ये खोलवर रुजलेली दिसते, ज्याचे मूळ भारतीय पितृसत्ताक पद्धती आणि पारंपरिक लिंगभाव

भूमिकांमध्ये आढळते. समाजामध्ये जीवन जगत असतांना लिंगभेदामुळे स्त्रियांना विषमतेची वागणूक देण्यात येते. स्त्रीची शारीरिक रचना, मानसिक जडणघडण यास अनुसरून अनेक अविवेकी, पक्षपाती कायदे, अनिष्ट प्रथा, संकेत रूढ झाले. थोडक्यात, लिंगभेदामुळे स्त्रियांना सर्वच पातळीवर पुरुषांप्रमाणे सन्मान, समान दर्जा, आदर प्राप्त झालेला नाही, स्त्रियांचे अधिकार डावलण्यात आले आणि यामुळेच लिंगभावात संरचनात्मक असमानता आढळून येते. ग्रामीण भागात बालविवाह, हुंडा पद्धतीमुळे स्त्रियांची स्वायत्तता आणि आर्थिक स्थिती कमकुवत होत असलेली आपण बघतो. तर जाती आधारित भेदभाव स्त्रियांना अधिक उपेक्षित बनवून अनेक स्तरांवर अत्याचार सहन करण्यास भाग पाडतो. राजकीयदृष्ट्या विचार केल्यास स्थानिक प्रशासनात स्त्रियांना आरक्षण देणारे कायदे असूनही राजकीय सत्तेच्या उच्च स्तरावर महिलांचे प्रतिनिधित्व कमी असल्याचे आढळते. शिवाय, लिंगभाव आधारित हिंसा, कौटुंबिक हिंसाचार आणि लैंगिक छळ व्यापक असूनही स्त्रियांना सामाजिक अडथळे न्याय मिळवण्यापासून वंचित ठेवतात. म्हणूनच लिंगभाव असमानता टिकवून ठेवणारे संरचनात्मक घटक अभ्यासण्याचे उद्दिष्ट महत्वाचे ठरते.

**४. लिंगभाव-समावेशक पद्धतींचा प्रचार करणे- (To Promote Gender-Inclusive Practices)**

लिंगभाव असमानता दूर करणे, समानतेला चालना देणे आणि उपेक्षित गटांसाठी सुधारणा करणे या उद्देशाने विविध धोरणे, कायदे आणि कार्यक्रमांद्वारे लिंगभवाव समावेशकता वाढविण्यात भारताने लक्षणीय प्रगती केली आहे. यामध्ये स्त्रियांसाठी कायदेशीर सुधारणा, स्त्रियांचे आर्थिक सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्यसेवा आणि स्त्रियांच्या राजकीय सहभागा इत्यादि समाविष्ट आहेत, ज्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या वंचित महिला आणि लैंगिक अल्पसंख्याकांची संरचनात्मक असमानता दूर करण्याचा प्रयत्न होता. भारतीय कायदा व्यवस्थेने महिला आणि लैंगिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक कायदे अमलात आणले. भारतीय संविधान लिंगभाव समावेशकता आणि लिंगभाव समतेसाठी मजबूत पाया प्रदान करते, विशेषत: कलम १५ द्वारे, जे लिंगभाव आधारीत भेदभाव प्रतिबंधित करते आणि कलम १४ कायद्यासमोर समानतेची हमी देते. अत्याचाराचा सामना करणाऱ्या महिलांसाठी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५, कायदेशीर आधार प्रदान करतो, महिलांसाठी सुरक्षित कामाचे वातावरण सुनिश्चित करण्यासाठी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, बंदी आणि निवारण) कायदा २०१३. तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) कायदा २०१९ हा देखील एक ऐतिहासिक कायदा आहे ज्याचा उद्देश तृतीयपंथी लोकांच्या हक्कांचे संरक्षण करणे, त्यांच्या लिंगभाव ओळखीची कायदेशीर मान्यता, आरोग्यसेवा, शिक्षण आणि रोजगारातील संधी सुनिश्चित करणे. आर्थिक आणि मालमत्तेच्या अधिकारांच्या बाबतीत, प्रमुख सुधारणा म्हणून हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) कायदा २००५ हा मुलींना वडिलोपार्जित मालमत्तेत समान वारसा हक्क प्रदान करण्यासाठी अमलात आणला गेला. याव्यतिरिक्त, मातृत्व लाभ (सुधारणा) कायदा २०१७ ने पगारी प्रसूती रजा १२ आठवड्यांवरून २६ आठवड्यांपर्यंत वाढवली, ज्यामुळे सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रातील महिला कामगारांना याचा लाभ झाला. पण या कायदेशीर चौकटी असूनही, तळागाळातील सांस्कृतिक पद्धतींमध्ये अनेकदा कायद्यांचे उल्लंघन होत असते. ''बेटी बचाओ बेटी पढाओ'' या उपक्रमाद्वारे कमी होत असलेले लिंग-गुणोत्तर वाढविणे आणि मुलींच्या

शिक्षणाला चालना देण्याचा उद्देश होता. स्त्रीभ्रूणहत्या, बालविवाह आणि शाळांमधील मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी विशिष्ट कृतींसह जनजागृती मोहिमेची जोड दिली गेली. त्याचप्रमाणे मुलींसाठी बचत योजना म्हणून सुकन्या समृद्धी योजना, पालकांना मुलींच्या भविष्यातील शिक्षण आणि कल्याणासाठी गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करते. पारंपारिक स्वयंपाक पद्धतींशी संबंधित आरोग्य धोके कमी करून महिलांना शिक्षण आणि उत्पन्न वाढवणाऱ्या क्रियाकलापांमध्ये अधिक वेळ घालविण्यास सक्षम करण्यासाठी प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, याव्यतिरिक्त, स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी महिला ई-हाट ऑनलाइन व्यासपीठ महिला उद्योजकांना आर्थिक स्वातंत्र्य सुलभ करते, महिलांना त्यांची उत्पादने आणि सेवांचा प्रचार करण्यासाठी जागा प्रदान करते.

नॅशनल स्किल डेव्हलपमेंट मिशनने तंत्रज्ञान, उत्पादन आणि सेवांसह विविध क्षेत्रांमध्ये महिलांना व्यावसायिक कौशल्यांसह सुसज्ज करण्यासाठी योजना सुरू केल्या आहेत. या उपक्रमांचे उद्दिष्ट औपचारिक कार्यबलामध्ये महिलांचा सहभाग वाढवणे आहे.कौशल्य विकासाच्या उद्देशाने महिला लक्ष्यकेंद्रित प्रधानमंत्री कौशल विकास योजना स्त्रियांना रोजगारक्षमता सुधारण्यासाठी विविध क्षेत्रात प्रशिक्षण प्रदान करते. राष्ट्रीय आरोग्य अभियान (National Health Mission) माता आणि बाल आरोग्य सुधारणे, प्रजनन आरोग्य सेवा, माता आणि बालमृत्यू दर कमी करणे यावर लक्ष केंद्रित करते. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना महिलांचा आर्थिक भार कमी करून आरोग्यसेवा पुरविण्यासाठी आरोग्य विमा उपलब्ध करून देते. शैक्षणिक स्तरावरील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी मुलींना दर्जेदार शिक्षणाची संधी सुनिश्चित करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान आणि राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान यांसारखे उपक्रम, उपेक्षित समाजातील मुलींना उच्च शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी शिष्यवृत्ती देणे. राजकारणातील महिलांचे प्रतिनिधित्वासाठी स्थानिक पातळीवर आरक्षण धोरणे लागू करण्यात आली.

७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीने पंचायतींमध्ये (स्थानिक संस्था) महिलांसाठी ३३% आरक्षण अनिवार्य केले, ज्यामुळे स्त्रियांना गाव, जिल्हा आणि राज्य शासनात निर्णय घेण्याची भूमिका घेता येईल. राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर महिलांचे प्रतिनिधित्व कमी असताना, या धोरणांद्वारे तळागाळातील महिलांसाठी राजकीय नेतृत्व आणि नागरी सहभागासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले गेले. भारताने लिंगभाव समावेशकतेच्या दिशेने लक्षणीय प्रगती केली असली तरीही कायदे, धोरणे आणि उपक्रमांची अंमलबजावणी, सामाजिक दृष्टीकोन आणि लिंगभाव निकषांच्या संदर्भात आव्हाने कायम आहेत. बालविवाह, हुंडा आणि जाती-आधारित लैंगिक विषमता यासारख्या भेदभावपूर्ण प्रथा अजूनही काही विशिष्ट प्रदेशांमध्ये दिसून येतात ज्यामुळे खरी लैंगिक समानता प्राप्त करणे कठीण होते. कायदेशीर सुधारणा आणि धोरणात्मक तरतुदी असूनही, महिला नेतृत्वाच्या भूमिकेत, लैंगिक अल्पसंख्याकांची सामाजिक स्वीकृती, तसेच त्यांचे संरक्षण करणाऱ्या कायद्यांची पूर्ण अंमलबजावणी यासाठी सतत प्रयत्न आणि सांस्कृतिक दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. लिंगभाव-समावेशक पद्धतींचा प्रचार करणे या उद्दिष्टांतर्गत उल्लेख करण्यात आलेली धोरणे, कार्यक्रम पद्धतीत लिंगभाव-समावेशकता बदलांची शिफारस करणे आणि ते सर्व लिंगभावांच्या गरजा पूर्ण करतात याची खात्री करणे महत्वाचे ठरते.

## ५. लिंगभाव-संबंधित उद्दिष्टे आणि प्रगती (Gender-Goals and Progress)

आज महिला अनेक क्षेत्रात प्रगती करत आहेत. अगदी कृषी क्षेत्रापासून अंतराळ क्षेत्रापर्यंत महिला आपलं कर्तृत्व सिद्ध करत आहेत, पण दुसरीकडे ग्रामीण भागात आणि निमशहरी भागातील महिलांना रोज अनेक समस्यांचा सामना करावा लागतोय. अशा परिस्थितीत महिलांचे सक्षमीकरण आणि सबलीकरणासाठी सरकारमार्फत अनेक योजना राबवल्या जातात. लैंगिक समानता हा केवळ मूलभूत मानवी हक्क नाही तर शांततापूर्ण, समृद्ध आणि शाश्वत जगासाठी आवश्यक पाया आहे. गेल्या काही दशकांमध्ये प्रगती झालेली असूनही २०३० पर्यंत जग लिंगभाव समानता साध्य करण्याच्या मार्गावर नाही. स्त्रिया आणि मुली जगाच्या निम्म्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करतात आणि त्यामुळे त्यांच्या प्रतिनिधित्वासाठी क्षमताही निम्म्या आहेत. तथापि, लैंगिक असमानता सर्वत्र असल्यामुळे सामाजिक प्रगती खुंटतांना दिसते. श्रमिक बाजारपेठेतील महिला अजूनही जागतिक स्तरावर पुरुषांपेक्षा सरासरी २३ टक्के कमी कमावतात आणि पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया बिनपगारी घरगुती आणि काळजीच्या कामात सुमारे तिप्पट तास जास्त घालवतात. लैंगिक हिंसा आणि शोषण, घरगुती कामाची असमान विभागणी आणि सार्वजनिक कार्यालयातील भेदभाव, हे सर्व लिंगभाव समानतेतील मोठे अडथळे आहेत. शाश्वत विकास ध्येय ५ साध्य करण्यासाठीचे अडथळे दूर करण्यासाठी राजकीय नेतृत्व, गुंतवणूक आणि सर्वसमावेशक धोरणात्मक सुधारणा आवश्यक आहे. लैंगिक समानता वाढवण्याच्या आंतरराष्ट्रीय वचनबद्धतेमुळे काही क्षेत्रांमध्ये सुधारणा झालेल्या आपण बघतो, परंतु प्रत्येक स्त्री आणि मुलीला पूर्ण लैंगिक समानता लाभेल आणि जिथे त्यांच्या सक्षमीकरणातील सर्व कायदेशीर, सामाजिक आणि आर्थिक अडथळे दूर झालेले नाहीत. जगभरात, जवळजवळ निम्म्या विवाहित महिलांना त्यांच्या लैंगिक आणि प्रजनन आरोग्य अधिकारांवर निर्णय घेण्याची मुभा नसते. १५-४९ वर्षे वयोगटातील ३५ टक्के महिलांनी शारीरिक आणि लैंगिक हिंसाचा अनुभव घेत असल्याचे समोर आले आहे. या हिंसाचारामुळे केवळ महिला आणि मुलींनाच वैयक्तिक इजा होत नाही तर हे त्यांच्या जीवनाची गुणवत्ता कमी करते आणि समाजात त्यांच्या सक्रिय सहभागास बाधा आणते.

लैंगिक समानता हा मूलभूत मानवी हक्क आहे. दारिद्र्य कमी करण्यापासून ते मुली आणि मुलांचे आरोग्य, शिक्षण, संरक्षण आणि कल्याण यांना चालना देण्यापर्यंत, निरोगी समाजाच्या सर्व क्षेत्रांसाठी लैंगिक समानता वाढवणे महत्त्वपूर्ण आहे. राष्ट्रीय स्तरावर, भारताची धोरणे आणि उपक्रम जसे महिला सक्षमीकरणासाठीचे राष्ट्रीय धोरण आणि बेटी बचाओ बेटी पढाओ कार्यक्रम, महिलांचे हक्क, शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक सहभागाला प्रोत्साहन हे जागतिक लिंगभाव समानतेच्या उद्दिष्टांना समर्थन देतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर, बीजिंग प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शन आणि कन्व्हेन्शन ऑन द एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्म्स ऑफ डिसक्रिमीनेशन अगेन्स्ट वुमन (CEDAW) यांसारख्या देशाच्या लिंगभाव-संबंधित धोरणांचे मार्गदर्शन करणाऱ्या फ्रेमवर्कसाठी सुद्धा भारतात पाऊले उचलली गेली आहेत. एखाद्या संस्था किंवा सरकारद्वारा कार्यक्रमाद्वारे निर्धारित केलेल्या लैंगिक समानतेच्या उद्दिष्टांच्या दिशेने प्रगतीचे मूल्यांकन करून, ती उद्दिष्टे राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय फ्रेमवर्कसह संयोजित असल्याची तपासणी या उद्दिष्टांतर्गत केली जाते.

## ६. संस्थात्मक संस्कृतीत लिंगभाव संवेदनशीलता वाढवणे (Increase Gender Sensitivity in Organizational Culture)

लिंगभाव संवेदनशीलता म्हणजे लिंगभाव असमानतेबद्दल जागरूकता वाढवणे, लिंगभाव पूर्वाग्रहांना आव्हान देणे आणि सर्व लिंगभावच्या लोकांसाठी आदर वाढवणे. लिंगभाव-आधारित भेदभाव आणि हिंसेला कारणीभूत असलेल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक घटकांबद्दल व्यक्तींना अधिक जागरूक करणे हा लिंगभाव संवेदनशीलतेचा उद्देश आहे. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे, जम्मू-काश्मीर पासून ते कन्याकुमारी पर्यंत भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक व जातीय विविधता आपल्याला दिसते आणि म्हणूनच विविधतेत एकता ही संकल्पना भारतीय संदर्भात वापरली जाते. भारतीय कायदाव्यवस्थेने स्त्रियांसाठी केलेले कायदे, राजकीय प्रतिनिधित्वासाठी आरक्षण, स्त्रियांना समान हक्क प्राप्त करून देण्यासाठी केलेल्या घटनात्मक तरतुदी, शैक्षणिक सुविधा, आर्थिक तरतुदी, अशा अनेक गोष्टींचा आढावा घेतल्यास लक्षात येते की आजही स्त्रियांमध्ये त्यांच्यासाठी असलेल्या या सुविधांबद्दल जागरुकता नसते, ग्रामीण भागात तर ही परिस्थिती अजून भयावह आहे. या परिस्थितीसाठी पुरुषप्रधान संस्कृती आणि समाजात स्त्रियांना दिले गेलेले दुय्यम स्थान कारणीभूत आहे.

समाजशास्त्रीयदृष्ट्या संघटनात्मक संस्कृतीत वाढत्या लिंगभाव संवेदनशीलतेसाठी कामाच्या ठिकाणी लिंगभाव भूमिका आणि वर्तनांना आकार देणाऱ्या सामाजिक संरचना आणि नियमांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. सामाजिक आणि संस्थात्मक प्रणालींमध्ये अंतर्भूत असलेली पितृसत्ताक मूल्ये, सत्तेच्या पद्धती आणि लिंगभाव पूर्वग्रहांमुळे लैंगिक असमानता नेहमीच आढळून येते. याचा सामना करण्यासाठी, संस्थांनी पारंपारिक लिंगभाव मानदंडांना आव्हान देणारी, सर्वसमावेशकतेला प्रोत्साहन देणारी आणि विविध दृष्टीकोनांना प्रोत्साहन देणारी धोरणे आणि पद्धती अवलंबिणे गरजेचे आहे. याव्यतिरिक्त, नियमित प्रशिक्षण, संवाद आणि मार्गदर्शन कार्यक्रमांद्वारे लिंगभाव समस्या उघडपणे चर्चिल्या गेल्या पाहिजे. कालांतराने, हे प्रयत्न अधिक न्याय्य संस्थात्मक संस्कृतीत योगदान देतात जिथे सर्व लिंगभाव असलेल्या व्यक्तींना सहभागी होण्यासाठी आणि त्यांची भरभराट होण्यासाठी सक्षमता वाढते, लिंगभाव भूमिकांबद्दल सामाजिक अपेक्षा बदलणे आणि समावेशक सामाजिक वातावरण तयार करण्यासाठी हे उद्दिष्ट लिंगभाव गतीमानतेची समज वाढवून लैंगिक समानता आणि समवेशनाला चालना देणारी संस्कृती वाढविण्यावर भर देते.

## ७. धोरण विकासासाठी माहिती प्रदान करणे– To Provide Data for Policy Development

स्त्री पुरुष असमानता नष्ट करणासाठी व लैंगिक समानता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने भारतामध्ये २००५ पासून आर्थिक अंदाजपत्रकात महिलाकेंद्रित किंवा लिंगभाव समानतेला अनुसरून अंदाजपत्रक तयार केले जाते. २००५ पासून अंदाजपत्रक तयार करतांना प्रामुख्याने शासनाच्या प्रत्येक खात्यामध्ये महिलांशी निगडीत काही रक्कमेची तरतूद त्यांचा विकास व सक्षमीकरण हा मुद्दा समोर ठेऊन केली जाते. अंदाजपत्रकातील काही भागामध्ये महिला विकासासाठी ३०% पासून ते १००% पर्यंत रक्कमेची तरतूद ठेवली जाते. एकंदरीतच महिलांचा विकास, स्त्री-पुरुष विषमता कमी करण्यासाठी लिंगभाव अंदाजपत्रकामध्ये

आर्थिक तरतुदी केल्या जातात. तसेच भारताने ११ व्या पंचवार्षिक योजनेचा भाग म्हणूनही लिंगभाव लेखापरीक्षण सुरू करण्यात आले. केंद्र आणि राज्य स्तरावरील प्रत्येक मंत्रालय आणि विभागाने परिणाम मूल्यांकनासाठी एक व्यवस्थाबद्ध आणि सर्वसमावेशक लेखापरीक्षण यंत्रणा स्थापन करावी, असे या योजनेत नमूद करण्यात आले. महिला आणि बाल विकास मंत्रालयाने (MWCD) लिंगभाव तफावत दूर करण्यासाठी आणि सेवा वितरण यंत्रणा मजबूत करण्यासाठी विद्यमान कार्यक्रमांचे लिंगभाव लेखापरीक्षण सुरू केले. लिंगभाव लेखापरीक्षणामध्ये धोरणे, कार्यक्रम आणि संस्थात्मक पद्धतींचे लिंगभाव समानतेवर होणारे परिणाम समजून घेण्यासाठी आणि लिंगभाव विषयक विचारांचा निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत समावेश असल्याचे मूल्यांकन करणे समाविष्ट असते.

भारतीय समाजात, जेथे विविध क्षेत्रांमध्ये लैंगिक असमानता आहे, त्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षणाची माहिती अनेक मार्गांनी महत्वाची आहे. ज्यामध्ये १. लिंगभाव दरी ओळखणे- शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय तसेच सेवा क्षेत्रांतील पुरुष आणि स्त्रियांतील असमानता, तसेच त्यांना उपलब्ध होणाऱ्या संधींच्या विश्लेषणाची माहिती लिंगभाव लेखापरीक्षणाद्वारे मिळत असते. उदा- शिक्षणातील पायाभूत सुविधा, सांस्कृतिक अडथळे किंवा सुरक्षिततेच्या समस्यांमुळे मुलींच्या शिक्षणात कुठे अडथळे येतात हे लिंगभाव लेखापरीक्षण दाखवू शकते. वैद्यकीय सुविधा, माता आरोग्य किंवा पोषणातील फरक निर्देशित केला जातो. लैंगिक पगारातील तफावत किंवा विशिष्ट क्षेत्रांमध्ये महिलांच्या रोजगारातील अडथळे लिंगभाव लेखापरीक्षणाचा अहवालाद्वारे दर्शविला जातो. लिंगभाव-विशिष्ट माहितीचे विश्लेषण करून, धोरणकर्ते वेगवेगळ्या लिंगभाव असणाऱ्या व्यक्तींना भेडसावणाऱ्या अनन्य गरजा आणि आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नवीन धोरणनिर्मिती करू शकतात. याद्वारे अर्थसंकल्पीय निर्णयांमध्ये लैंगिक समानता कशी समाकलित केली जाऊ शकते याबद्दल लिंगभाव लेखापरीक्षण सरकारला सूचित करू शकतात. लिंगभाव लेखापरीक्षणामधील अंतर्दृष्टी सर्वसमावेशक पायाभूत सुविधा तयार करण्यात मदत करू शकते, जसे की सुरक्षित सार्वजनिक वाहतूक, महिलांसाठी सुलभ स्वच्छता सुविधा किंवा कर्मचाऱ्यांमध्ये महिलांच्या सहभागास समर्थन देणाऱ्या बालसंगोपन सुविधा.

लिंगभाव लेखापरीक्षण माहिती संस्थांना लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या भूमिकेसाठी जबाबदार असण्यास मदत करते. सरकारी किंवा संस्थात्मक धोरणे आंतरराष्ट्रीय वचनबद्धतेशी जुळतात की नाही याचे मूल्यमापन करण्यासाठी याचा वापर केला जाऊ शकतो, जसे संयुक्त राष्ट्र शाश्वत विकास उद्दिष्टे, विशेषतः लैंगिक समानतेवर SDG ५. भारतात, कायदेशीर प्रणाली अनेकदा पारंपारिक लिंगभाव पूर्वग्रह दर्शवते. लिंगभाव लेखापरीक्षण हे वारसा, विवाह किंवा मालमत्तेच्या अधिकारांशी संबंधित लिंगभाव असमानता कायम ठेवणाऱ्या कायद्यांमधील बदलांसाठी समर्थन करण्यासाठी माहिती-आधारित पुरावे प्रदान करू शकतात. माहिती विद्यमान कायद्यांच्या अंमलबजावणीतील अंतर अधोरेखित करून त्याची अंमलबजावणी सुधारण्यास मदत करू शकते. लिंगभाव लेखापरीक्षण आधारभूत माहिती तयार करते जिचा चा वापर कालांतराने लिंगभाव-केंद्रित धोरणांच्या परिणामकारकतेचा मागोवा घेण्यासाठी केला जाऊ शकतो. उदा. सरकार, व्यवसाय किंवा सामुदायिक संस्थांमध्ये निर्णय घेण्याच्या भूमिकांमध्ये महिलांच्या सहभागाचा

मागोवा घेणे. विशिष्ट आरोग्य धोरणाच्या हस्तक्षेपानंतर महिलांच्या आरोग्याचे परिणाम सुधारले आहेत की नाही याचे निरीक्षण करणे. ही माहिती धोरणकर्त्यांना लिंगभाव समानता उपक्रम अपेक्षित परिणाम देत आहे का किंवा नवीन धोरणे स्वीकारण्याची गरज आहे का याचे मूल्यांकन करण्यात मदत करते. आणि म्हणूनच हे उद्दिष्ट लिंगभाव समानतेवर केंद्रित धोरण किंवा धोरणांच्या विकासासाठी लिंगभाव-विशिष्ट माहितीचे संकलन आणि विश्लेषण करण्यावर भर देते. आणि लेखापरीक्षण निष्कर्षांवर आधारित लिंगभाव-प्रतिसाद देणारी धोरणे आणि पद्धतींचा अवलंब करण्यात मदत करते.

### ८. लिंगभाव मुख्यप्रवाहासाठी समर्थन देणे- To Promote Gender Mainstreaming

Gender Mainstreaming लिंगभाव मुख्यप्रवाहात आणणे हे प्रत्येक स्तरावरील धोरणे, कार्यक्रम आणि प्रकल्पांमध्ये लैंगिक समानता समाकलित करण्याच्या प्रक्रियेचा आणि दृष्टिकोनांचा संच आहे. लिंगभाव मुख्यप्रवाहाचे उद्दिष्ट आहे की महिला आणि पुरुषांना समान लाभ आणि समता उपलब्ध आहेत हे सुनिश्चित करणे. एकूणच भारतीय समाजव्यवस्था किंवा इतरत्र देशातही स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जागतिक व राष्ट्रीय स्तरावर प्रयत्न केले गेले. स्त्रियांसाठी जागतिक स्तरावर परिषदा, परिसंवाद आयोजित करण्यात येतात. परंतु असे असूनही आजही स्त्रियांच्या समस्या संपलेल्या नाहीत.

भारतीय परिस्थितीचा विचार केल्यास स्त्रियांसाठी अनेक संविधानिक तरतुदी केल्या गेल्या, स्थानिक स्वराज्य संस्था, शिक्षण, नोकऱ्यांमध्ये आरक्षण, कायदेविषयक तरतुदी असल्याचे आपणास आढळते. या तरतुदींचे फलस्वरूप महणून स्त्रियांचा शिक्षण, आर्थिक, राजकीय आणि नोकरीच्या क्षेत्रातील टक्का वाढलेला दिसतो. तरीही स्त्री-पुरुष तुलना केल्यास स्त्रियांचे प्रमाण फारच कमी आहे. आणि म्हणूनच सर्वच क्षेत्रातील स्त्रियांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने लिंगभाव मुख्यप्रवाहात येणे महत्वाचे ठरते. यास कारण असे की महिला आणि पुरुषांच्या गरजा, परिस्थिती आणि राहणीमान भिन्न आहेत. या फरकांमध्ये संसाधने, शक्ती, मानवी हक्क आणि संस्थांमध्ये असमान संधी समाविष्ट असल्यामुळे लिंगभाव मुख्यप्रवाहात या तफावतींना संबोधित करणे आणि लैंगिक असमानता कमी करणे आवश्यक आहे. एखाद्या संस्थेच्या प्रत्येक स्तरावर लिंगभाव विचारात घेतला जातो का? तसेच संस्थेच्या निर्णय घेण्याच्या आणि धोरण अंमलबाजवणीच्या पातळीवर लिंगभाव मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे समर्थन दर्शविण्यासाठी हे उद्दिष्ट विचारात घेतले जाते.

### ९. सहभाग आणि सक्षमीकरणाला चालना

लिंगभाव लेखापरीक्षणाचे शेवटचे आणि महत्वाचे उद्दिष्ट आहे ते म्हणजे सहभाग आणि सक्षमीकरणाला चालना देणे. लिंगभाव लेखापरीक्षणाच्या या उद्दिष्टाद्वारे हे सुनिश्चित केले जाते की, संस्थेच्या कोणत्याही निर्णय प्रक्रियेत, नेतृत्वात किंवा प्रशासनाच्या कुठल्याही क्षेत्रात महिला आणि इतर लिंगभाव गटांच्या सहभागाचे मूल्यांकन करणे. असंघटित क्षेत्रांतील स्त्री-पुरुष असमानता, वेतन श्रेणीतील फरक, महिला कामगारांसाठी उपलब्ध सुविधा, कामाचे वाढीव तास, अशा एक ना अनेक गोष्टींची पाहणी करून, त्यावर उपाययोजना सुचविल्या जातात आणि संघटित वा असंघटित क्षेत्रातील स्त्रियांचा आणि इतर लैंगिक अल्पसंख्यांक गटांचा सहभाग वाढविण्याचे प्रयत्न केले जातात. महिला किंवा इतर लिंगभाव

अल्पसंख्यांक व्यक्तींना सक्षम करण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षण अहवालद्वारे धोरणनिर्मिती केली जाते. आणि यासाठी सहभाग आणि सक्षमीकरण हे उद्दिष्ट महत्वाचे आहे.

लिंगभाव लेखापरीक्षणाची ही उद्दिष्टे कोणत्याही संस्थेमध्ये किंवा एखाद्या प्रकल्पामार्फत लिंगभाव समस्या समजून घेण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वसमावेशक आणि पुराव्यावर आधारित दृष्टीकोन प्रदान करतात आणि अधिक समावेशक व न्याय्य परिणामांमध्ये योगदान देतात.

### २.३.१.३ लिंगभाव लेखापरीक्षणाची गरज (Need of Gender Audit)

आजच्या काळात विविध क्षेत्रातील कार्य, धोरणे आणि एकूणच परिणामकारकतेवर लैंगिक असमानतेचा व्यापक प्रभाव जाणून घेण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षणाची गरज अधिकाधिक अत्यावश्यक बनली आहे. लिंगभाव लेखापरीक्षण हे लिंगभाव-गतीशीलता निर्णय घेण्यावर, संसाधनांचे वाटप आणि परिणामांवर कसा प्रभाव पाडते याचे व्यवस्थाबद्ध मूल्यांकन प्रदान करते, ज्यामुळे संस्थांना असमानता आणि वंचिततेची क्षेत्रे ओळखण्यास सक्षम करते. लिंगभाव-संवेदनशील पद्धतींचे लेखापरीक्षण करून आणि त्यात अंतर्भूत पूर्वाग्रह किंवा अडथळे जाणून घेऊन, लिंगभाव लेखापरीक्षण सर्वसमावेशनास प्रोत्साहन, लिंगभाव समानता उद्दिष्टे साध्य करण्यास समर्थन आणि संस्थात्मक कामगिरी वाढवते. शिवाय, कायदेशीर चौकटीचे पालन सुनिश्चित करून वाजवी आणि न्याय्य संधींची उपलब्धता निर्माणास, व्यापक सांस्कृतिक आणि सामाजिक बदल घडवून आणण्यास मदत, विविधता आणि सामाजिक जबाबदारीसाठी संस्थांना महत्त्वपूर्ण साधन म्हणून उपयोगी पडते. लिंगभाव लेखापरीक्षण करण्याचा तर्क आहे की ते आर्थिक समस्यांबद्दल महिलांची जागरूकता वाढवते. खाली अधोरेखित केलेल्या मुद्द्यांद्वारे आपण लिंगभाव लेखापरीक्षणाची गरज स्पष्ट करू शकतो.

**१. लिंगभाव समानता आणि समावेशनाला प्रोत्साहन**

लिंगभाव अंतर ओळखून लिंगभाव लेखापरीक्षण संस्था किंवा धोरणांमध्ये लिंगभाव असमानता कुठे आहे हे निर्धारित करण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षण मदत करते. यामध्ये लिंगभाव आधारित संसाधने, निर्णय घेण्याच्या भूमिकांमध्ये असमान संधी समाविष्ट असते. सर्व लोकांसाठी समान प्रवेश आणि सहभागास प्रतिबंध केला जातो अशा ठिकाणी संस्था लिंगभाव गतिशीलतेचे लेखापरीक्षण करून पूर्वाग्रह, भेदभावपूर्ण पद्धती किंवा प्रणालीगत अडथळे उघड करू शकतात, ज्यामुळे अधिक समावेशी संरचना निर्माण होते. व्यवसायी, सरकारी आणि आंतरराष्ट्रीय संस्थांसह अनेक संस्थांनी विशिष्ट लैंगिक समानता लक्ष्ये (उदा. लैंगिक समानतेवरील शाश्वत विकास लक्ष्य क्र. ५) साध्य करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. या प्रयत्नांच्या प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षण हे एक महत्त्वाचे साधन आहे.

**२. संघटनात्मक परिणामकारकता वाढवणे**

विविध संस्था त्यांच्या धोरणांमध्ये आणि प्रक्रियांमध्ये लैंगिक दृष्टीकोन समाविष्ट करतात, जे समस्यांचे उत्तम प्रकारे निराकरण करण्यास सहाय्यक ठरतात आणि त्यामुळे त्यांना अधिक संतुलित आणि सुधारित

निर्णय घेण्याचा फायदा होतो. लिंगभाव लेखापरीक्षण, संस्थांमधील कामगारांमध्ये उत्पादकता आणि व्यस्तता वाढवते. संशोधन दर्शविते की, लिंगभाव समानतेला प्राधान्य देणाऱ्या संस्थांमध्ये कर्मचारी मनोबल चांगले असते आणि कामगार अधिक व्यस्त असतात. लिंगभाव लेखापरीक्षणामुळे कामाच्या ठिकाणी लिंगभाव-समावेशक अडथळे ओळखता येऊ शकतात बऱ्याच संस्थांमध्ये, लिंगाभावानुसार पदानुक्रम आणि असमतोल कायम राहतो ज्यामुळे निर्णयक्षमता, भविष्य प्रगती आणि कार्यक्षेत्र संस्कृती प्रभावित होते. लिंगभाव लेखापरीक्षण हे असंतुलन ओळखून संबंधांची पुनर्रचना करण्यासाठी धोरणे सूचित करू शकते.

**३. कायदेशीर आणि नैतिक अनुपालन सुनिश्चित करणे.**

प्रत्येक देश, संस्था, संघटनांनी लैंगिक समानता कायदे आणि धोरणांचे पालन करणे अपेक्षित आहे. बऱ्याच देशांमध्ये कार्यक्षेत्र, शिक्षण किंवा सरकारी संस्थांमध्ये लैंगिक समानता कायदे किंवा लैंगिक समानता संबंधित विशिष्ट आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या आदेशांचे पालन संस्थांच्या मार्फत केले जात आहे किंवा नाही हे लिंगभाव लेखापरीक्षणाद्वारे सुनिश्चित केले जाते. लिंगभाव-आधारित भेदभाव मग तो स्पष्ट किंवा सूक्ष्म असेल, ज्यामुळे संस्थांना कायदेशीर आव्हानांना किंवा प्रतिष्ठेची हानी होण्यापूर्वी सुधारात्मक उपाययोजना करण्याची परवानगी लिंगभाव लेखापरीक्षणाद्वारे मिळत असते.

**४. धोरण आणि कार्यक्रम सुधारणे**

धोरणे किंवा कार्यक्रम तयार करणाऱ्या संस्थांसाठी (उदा. विकास सहाय्य, सार्वजनिक आरोग्य उपक्रम किंवा कॉर्पोरेट विविधता कार्यक्रम), लिंगभाव लेखापरीक्षण हे लिंगभाव-संवेदनशील असल्याची खात्री करण्यात मदत करते. लिंगभाव लेखापरीक्षणामध्ये मूल्यांकन केले जाते की विद्यमान कार्यक्रम वेगवेगळ्या लिंगभाव गटांच्या, विशेषत: उपेक्षित राहिलेल्या विशिष्ट गटांच्या गरजा पूर्ण करत आहे. तसेच लिंगभाव लेखापरीक्षण हे लिंगभाव-विशिष्ट उपक्रमांच्या प्रभावाचे परीक्षण आणि लेखापरीक्षण करण्यासाठी, लिंगभाव-आधारित हिंसा कमी करण्यासाठी, महिलांचा आर्थिक सहभाग सुधारण्यासाठी अपेक्षित परिणाम साध्य करत आहेत याची खात्री करण्यासाठी एक महत्त्वाचे साधन म्हणून काम करते.

**५. सामाजिक आणि सांस्कृतिक बदलाला चालना देणे**

लिंगभाव नियमांना आव्हान देऊन लिंगभाव लेखापरीक्षण केवळ धोरणे आणि संरचना पाहत नाही; तर लैंगिक असमानता ठेवणाऱ्या अंतर्निहित सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांचे देखील परीक्षण करते. या घटकांना आव्हान देऊन, समाजात लिंगभाव समानतेला प्रोत्साहन देणारे व्यापक सांस्कृतिक बदल घडवून आणले जाऊ शकतात. तसेच अनेक उपेक्षित गटांना सशक्त करून, लिंगभाव लेखापरीक्षण विविध लिंगभाव (विशेषत: स्त्रिया, LGBTQ+ व्यक्ती आणि लिंगभाव-अनुरूप नसलेले लोक) असमानतेचा वेगळ्या पद्धतीने कसा अनुभव घेतात हे समजून घेण्यावर लक्ष केंद्रित करण्यावर भर देते. लिंगभाव लेखापरीक्षण हे संस्थांना वर उल्लेख केलेल्या गटांना सक्षम करण्यासाठी आणि त्यांचे सीमांतीकरण कमी करण्यासाठी लक्ष्यित धोरणे तयार करण्यास मदत करते.

### ६. धोरणात्मक-संस्थात्मक बदल घडविणे

लिंगभाव-समानता प्रस्थापित करून लिंगभाव लेखापरीक्षण अहवाला मार्फत संस्थांना धोरणात्मक बदल, संरचनात्मक सुधारणा आणि लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने नवीन उपक्रमांसाठी विशिष्ट शिफारसी दिल्या जातात. यामध्ये नियुक्त करण्याच्या पद्धतींमध्ये सुधारणा करणे, मार्गदर्शक कार्यक्रमांची स्थापना करणे किंवा समान कामासाठी समान वेतन सुनिश्चित करणे यांचा समावेश असतो. लिंगभाव समानता उद्दिष्टांचे मूल्यांकन आणि पूर्तता लिंगभाव लेखापरीक्षण द्वारे केली जाते याची खात्री करण्यासाठी लिंगभाव निरीक्षण प्रणाली किंवा लैंगिक समानता समित्यांची स्थापन करण्याची शिफारस देखील लिंगभाव लेखापरीक्षण केली जाते.

### ७. शाश्वतता आणि सामाजिक जबाबदारीचे समर्थन करणे

कॉर्पोरेट आणि व्यवसायांसाठी सुधारित कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR), लिंगभाव लेखापरीक्षण आयोजित करणे व्यापक कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या उद्दिष्टांशी संरेखित होते. शाश्वत व्यवसाय पद्धतींचा मुख्य आधारस्तंभ म्हणून लैंगिक समानता वाढत्या प्रमाणात पाहिली जात आहे आणि ज्या संस्था लिंगभाव अंतर दूर करण्यात अयशस्वी ठरतात त्यांना प्रतिष्ठेच्या जोखमीचा सामना करावा लागू शकतो किंवा प्रतिभा आणि गुंतवणूक आकर्षित करण्यात ते अयशस्वी होऊ शकतात.

लैंगिक असमानता ही सर्व क्षेत्रे आणि संस्थांमध्ये एक व्यापक समस्या आहे या वाढत्या दरीमुळे लिंगभाव लेखापरीक्षणाची गरज निर्माण झाली आहे. लिंगभाव लेखापरीक्षण संस्थांना त्यांच्या पद्धती, धोरणे आणि संस्कृती लैंगिक समानतेला प्रोत्साहन देते याची खात्री करून या असमानता ओळखण्यात आणि त्यांचे निराकरण करण्यात मदत करते. असे केल्याने, ते उत्तम संस्थात्मक कार्यप्रदर्शन, कायदेशीर मानकांचे वर्धित अनुपालन आणि व्यापक सामाजिक न्याय आणि स्थिरता उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योगदान प्रदान करते. लिंगभाव लेखापरीक्षण हे अडथळे ओळखण्यासाठी, सर्वसमावेशकतेला चालना देण्यासाठी आणि अधिक न्याय्य समाजाकडे पद्धतशीर बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक साधन आहे.

### स्वयंअध्ययनासाठी प्रश्न- क्रमांक १

अ) बहुपर्यायी प्रश्न

१) खालीलपैकी कोणते वर्ष हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित करण्यात आले?

अ) १९७० ब) १९७२ क) १९७५ ड) १९८०

२) १९८५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची तिसरी जागतिक महिला परिषद कुठे पार पडली?

अ) नैरोबी ब) मेक्सिको क) इटली ड) इंग्लंड

३) कोणत्या वर्षी राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना वैधानिक संस्था म्हणून करण्यात आली.

अ) १९९० ब) १९९५ क) १९९२ ड) १९९८

४) लिंगभाव लेखापरीक्षणाची गरज काय दर्शविते?

अ) धोरण आणि कार्यक्रम सुधारणे ब) लैंगिक समानता आणि समवेशनाला प्रोत्साहन

क) सामाजिक आणि सांस्कृतिक बदलास चालना ड) वरीलपैकी सर्व

५) खालीलपैकी कोणते लिंगभाव लेखापरीक्षणाचेउद्दिष्ट नाही?

अ) लिंगभाव-समावेशक पद्धतींचा प्रचार ब) लैंगिक समानता आणि समतेचे मूल्यांकन

क) लिंगभाव मुख्यप्रवाहास समर्थन ड) लिंगभाव अंतर वाढविणे

## २.३.२ लिंगभाव लेखापरीक्षण करण्यासाठीचे टप्पे- नियोजन, लिंगभाव लेखापरीक्षण प्रक्रिया, मसुदा अहवाल आणि अंतिम अहवाल

## (Steps for preparing Gender Audit: Planning, Carrying Out, Draft Report and Final Report)

### लिंगभाव लेखापरीक्षण पूर्वतयारी

लिंगभाव लेखापरीक्षण सारख्या सर्वसमावेशक संस्थात्मक मुल्यांकनासाठी सर्वप्रथम तुम्हाला लेखापरीक्षण का करायचे आहे? आणि त्याचा संस्थेला काय फायदा होईल? हे सांगण्यासाठी एक विचारपूर्वक धोरण, त्याबरोबरच संस्था ही लिंगभाव लेखापरीक्षण प्रक्रिया पार पाडण्यासाठी तयार आहे की नाही?, त्यानंतर लिंगभाव लेखापरीक्षण करण्यासाठी तर्क, उद्देश आणि फायदे संप्रेषित करण्यासाठी योजना आणि संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांना लिंगभाव लेखापरीक्षणाची पूर्वकल्पना देणे आवश्यक आहे. लिंगभाव लेखापरीक्षण करण्यासाठी वरिष्ठ व्यवस्थापनाकडून पाठिंबा मिळवणे सुद्धा तेवढेच महत्वाचे आहे. कारण वरिष्ठ व्यवस्थापनाच्या समर्थनाशिवाय लेखापरीक्षण प्रक्रिया यशस्वी होण्याची शक्यता नसते. कोणत्याही संस्थेचे वरिष्ठ नेते लेखापरीक्षण प्रक्रियेत सर्व कर्मचाऱ्यांच्या सहभागास प्रोत्साहन देतात आणि हे सुनिश्चित करतात की लिंगभाव कृती योजनेच्या सतत पाठपुराव्यासह लेखापरीक्षण प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यासाठी त्यांचे संघटनात्मक समर्थन आहे. लिंगभाव लेखापरीक्षणाचे उद्दिष्टे, हेतू आणि प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वरिष्ठ व्यवस्थापनाचा पाठिंबा असल्यास कर्मचाऱ्यांची भीती, प्रतिकार आणि साशंकता दूर होण्यास मदत होते. लेखापरीक्षण प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्याचे समन्वय साधण्यासाठी आणि इतर तपशीलांवर देखरेख करण्यासाठी संस्थेतील किमान एका व्यक्तीकडे अधिकार असणे आवश्यक आहे. ही व्यक्ती लिंगभाव अधिकारी किंवा संस्थेचा लिंगभाव केंद्रबिंदू म्हणून काम करते. लेखापरीक्षण प्रक्रियेच्या सर्व स्तरावर प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्या प्रक्रिया व्यवस्थित पार पाडण्यासाठी संस्थेच्या विस्तृत प्रतिनिधिक नमून्याचे प्रतिनिधित्व करणारा लिंगभाव समूह देखील आवश्यक आहे. लिंगभाव लेखापरीक्षण आणि त्याचे सतत पाठपुरावा करण्यासाठी लिंगभाव समूह किंवा लिंगभाव अधिकारी यांना वरिष्ठ व्यवस्थापाकडून विशेष अधिकार दिले जातात. लिंगभाव लेखापरीक्षणाची तयारी करण्यासाठी खालील तीन गोष्टी आवश्यक आहेत- संघटनात्मक तयारीचे

मूल्यांकन, वरिष्ठ व्यवस्थापनाचे समर्थन आणि संप्रेषण धोरणाचा विकासत. लिंगभाव लेखापरीक्षण करण्यासाठीच्या महत्वाच्या टप्प्यांचे सविस्तर विश्लेषण पुढीलप्रमाणे:

### अ. नियोजन (Planning)

संपूर्ण लेखापरीक्षण प्रक्रियेची सुरुवात करण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षणाचे नियोजन करणे ही सुरुवातीची पायरी आहे. यामध्ये लेखापरीक्षण ची व्याप्ती आणि उद्दिष्टे परिभाषित करणे, कार्यपद्धतीची रचना करणे आणि लेखापरीक्षण पार पाडण्यासाठी आवश्यक धोरण आणि संसाधनांची मांडणी करणे समाविष्ट असते. योग्य नियोजनाद्वारे हे सुनिश्चित केले जाते की लेखापरीक्षण संस्थात्मक उद्दिष्टांशी सबंधित तसेच सर्वसमावेशक आहे आणि कृती करण्यायोग्य अंतर्दृष्टी प्रदान करण्यास सक्षम आहे. नियोजन टप्प्यात समाविष्ट असलेल्या प्रमुख क्रियाकल्पाचे सविस्तर विश्लेषण आपण खालीलप्रमाणे करू शकतो.

### १. लिंगभाव लेखापरीक्षणाचा हेतु आणि उद्दिष्टे परिभाषित करणे.

नियोजनाची पहिली पायरी म्हणजे लेखापरीक्षणाचा उद्देश स्पष्ट नमूद करणे अपेक्षित असते. कारण हे उद्देश संपूर्ण प्रक्रियेला मार्गदर्शन करेल आणि डेटा संकलन, विश्लेषण आणि शिफारसींवर लक्ष केंद्रित करण्यात मदत करेल. यामध्ये लेखापरीक्षणाच्या उद्देशात- लिंगभाव लेखापरीक्षण का केले जात आहे? ते अधोरेखित करणे महत्वाचे ठरते. वेतन, प्रतिनिधित्व, करिअर प्रगती किंवा संधी यांमधील लिंगभाव अंतर ओळखणे. लिंगभाव-संवेदनशील संस्थात्मक धोरणे आणि पद्धती कशा आहेत याचे मूल्यांकन करणे. लिंगभाव-विशिष्ट कार्यक्रम किंवा हस्तक्षेपांचा प्रभाव मोजणे. लेखापरीक्षणाची विशिष्ट उद्दिष्टे परिभाषित करणे. यामध्ये भर्ती, वेतन, पदोन्नती किंवा प्रशिक्षण यासारख्या क्षेत्रांमध्ये लैंगिक समानतेचे मूल्यांकन करणे समाविष्ट असते. लिंगभाव गतिशीलता समजून घेण्यासाठी संस्थात्मक संस्कृतीचे मूल्यांकन करणे (उदा. कामाच्या ठिकाणी वर्तन, निर्णय घेण्याची प्रक्रिया). सर्व लिंगभावांसाठी समान संधी रोखणारे अडथळे तपासणे, लैंगिक समानता धोरणे आणि पद्धती सुधारण्यासाठी शिफारसी तयार करणे ई. गोष्टी परिभाषित केल्या जातात.

### २. लिंगभाव लेखापरीक्षणाची व्याप्ती निश्चित करणे

एखाद्या संस्थेचे, कार्यक्रमाचे किंवा धोरणाचे कोणते पैलू तपासले जातील याची व्याप्ती परिभाषित करून, लेखापरीक्षण केंद्रित आणि व्यवस्थाबद्ध होण्यासाठी मर्यादा स्पष्ट करणे. लेखापरीक्षणामध्ये संस्थेचे कोणते क्षेत्र समाविष्ट केले जाईल ते ठरविणे. केंद्रित क्षेत्रांच्या काही उदाहरणांमध्ये पुढील काही तपशील समाविष्ट असतात. जसे- १. कार्यबल रचना: विविध विभाग, भूमिका आणि नेतृत्व स्तरांवर लिंगभाव विभाजन. २. वेतन आणि फायदे: लिंगभाव वेतन तफावत, पालक रजा, आरोग्य लाभ, किंवा लवचिक काम व्यवस्था यांसारख्या लाभांमध्ये संधी. ३. भर्ती आणि नियुक्ती पद्धती: नोकरीचे वर्णन, भरती मोहीम आणि निवड प्रक्रियेसह नियुक्ती प्रक्रियेत लिंगभाव प्रतिनिधित्व. ४. पदोन्नती आणि करिअरची प्रगती:

करिअरची प्रगती, मार्गदर्शन, किंवा नेतृत्व भूमिकांमध्ये संधी मध्ये लैंगिक असमानता. ५. संस्थात्मक संस्कृती: लिंगभाव मानदंड, कार्यस्थळ संस्कृती पद्धतींमध्ये अंतर्भूत केलेले रूढीवादी पूर्वाग्रह किंवा धोरणे ६. कार्यक्रम किंवा प्रकल्पांचा प्रभाव: लेखापरीक्षण कार्यक्रम-विशिष्ट असल्यास (उदा. विकास कार्यक्रम), कार्यक्रमाचा विविध लिंगभाव गटांवर (उदा. महिला, पुरुष आणि लैंगिक अल्पसंख्याक) कसा प्रभाव पडतो याचे मूल्यांकन करणे. संस्था अनेक ठिकाणी (राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर) कार्यरत असल्यास, लेखापरीक्षण जागतिक असेल किंवा विशिष्ट प्रदेश किंवा कार्यालयावर केंद्रित असेल हे निर्धारित करणे.

### ३. लिंगभाव लेखापरीक्षण संघ निवड करणे.

लिंगभाव लेखापरीक्षणाची गुणवत्ता आणि यश सुनिश्चित करण्यासाठी लेखापरीक्षण संघ महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. हा संघ वैविध्यपूर्ण व सुसज्ज असावा लागतो आणि संघातील प्रत्येक सदस्याकडे लैंगिक गतिशीलतेचे प्रभावीपणे विश्लेषण करण्यासाठी आवश्यक कौशल्ये असावी लागतात. अंतर्गत कार्यसंघ हा संस्थेतील मुख्य कार्यसंघ आहे, जसे की मानव संसाधन कर्मचारी व लैंगिक समानता तज्ज्ञ. संघाच्या कार्यात लेखापरीक्षण प्रक्रिया, कालावधी आणि संसाधनांची देखरेख या प्रमुख भूमिका समाविष्ट असतात. लिंगभाव विशेषज्ञ लेखापरीक्षणाच्या आराखडयामध्ये अंतर्दृष्टी आणि निष्कर्षांचे स्पष्टीकरण देतात. माहिती लिंगभावनुसार विभाजित केली आहे हे सुनिश्चित करून माहिती विश्लेषक संख्यात्मक माहिती संकलन आणि विश्लेषण हाताळतात. मानव संसाधन किंवा धोरण विशेषज्ञ लिंगभाव समानतेवर प्रभाव टाकू शकणाऱ्या संस्थात्मक संरचना, धोरणे आणि पद्धतींमध्ये कौशल्ये प्रदान करतात. विशेष कौशल्याची आवश्यकता असल्यास बाह्य लिंगभाव सल्लागार किंवा लेखा परीक्षक लिंगभाव समानता लेखापरीक्षण, सांख्यिकीय विश्लेषण किंवा संस्थात्मक संस्कृती मूल्यांकनाची कामे करतात. मुख्य भागधारकांचे समर्थन सुनिश्चित करण्यासाठी आणि लेखापरीक्षण प्रक्रिया संस्थात्मक उद्दिष्टांशी जुळलेली आहे याची खात्री करण्यासाठी सुरुवातीपासूनच लेखापरीक्षण प्रक्रियेत सहभागी केले जाते. तसेच या नियोजनात नेतृत्व, मानव संसाधन, लिंगभाव अधिवक्ता आणि संघ प्रतिनिधींचा समावेश असणे आवश्यक असते.

### ४. लेखापरीक्षण पद्धत विकसित करणे

लेखापरीक्षण प्रक्रिया पारदर्शक असावी आणि विश्वासार्ह अंतर्दृष्टी प्रदान करू शकेल याची खात्री करण्यासाठी लेखापरीक्षण पद्धतीची रचना करणे आवश्यक आहे. यामध्ये माहिती संकलनासाठी पद्धती निवडणे, माहितीचे विश्लेषण पद्धत ठरवणे आणि वापरण्यात येणारी साधने निर्दिष्ट करणे समाविष्ट असते. संख्यात्मक आणि गुणात्मक डेटा एकत्रित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती निवडणे. परिमाणात्मक पद्धतींमध्ये सर्वेक्षण, माहिती विश्लेषण आणि दस्तऐवज आढावा यांचा समावेश होतो आणि गुणात्मक पद्धतींमध्ये मुलाखती, केंद्रितगट, निरीक्षण संशोधन इत्यादींचा समावेश होतो. लिंगभाव-संबंधित समस्यांना परिभाषित करण्यासाठी लेखापरीक्षणात खालील प्रश्ने समाविष्ट असणे आवश्यक आहे.

- संस्थेच्या सर्व स्तरांवर महिला आणि पुरुषांचे समान प्रतिनिधित्व आहे का?
- समान कामासाठी वेतन दर समान आहेत, किंवा लिंगभाव आधारित वेतन अंतर आहे?

- भरती, नियुक्ती किंवा पदोन्नतीच्या निर्णयांमध्ये लिंगभेद आहेत का?
- संघटनात्मक धोरणे (उदा. पालकांची रजा, लवचिक कामकाज) वेगवेगळ्या लिंगभाव असलेल्या कर्मचाऱ्यांवर कसा प्रभाव पाडतात?
- लिंगभाव संबंधी संघटनात्मक तरतुदी काय आहेत आणि समानतेसाठी रूढी किंवा अडथळे आहेत का?

कार्यपद्धती नैतिक मानकांचे पालन करते याची खात्री करणे. यामध्ये विशेषत: भेदभाव किंवा छळ यासारख्या संवेदनशील विषयांसाठी गोपनीयतेची खात्री करणे समाविष्ट आहे जे सर्व सहभागींना खात्री देते की त्यांचे प्रतिसाद गोपनीय असतील, सर्व सहभागींना लेखापरीक्षणाचा उद्देश माहित असणे आवश्यक आहे आणि सहभागी होण्यापूर्वी त्यांची संमती घेणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण पद्धतीमध्ये अप्रस्तुत लिंगभाव गटांचा समावेश असावा.

**५. वेळ आणि अंदाजपत्रक निश्चित करणे.**

लेखापरीक्षण पूर्ण करण्यासाठी टाइमलाइन स्थापित करणे, ज्यात पुढील महत्त्वाचे टप्पे समाविष्ट असतात जसे की: डेटा संकलन कालावधी (उदा. सर्वेक्षण, मुलाखती आणि दस्तऐवज पुनरावलोकनासाठी ४ ते ६ आठवडे). विश्लेषण टप्पा (उदा. परिमाणवाचक आणि गुणात्मक दोन्ही डेटाचे विश्लेषण करण्यासाठी २ ते ४ आठवडे). लेखापरीक्षण अहवालाचा मसुदा तयार करणे आणि त्याचे पुनरावलोकन (उदा. पुनरावृत्तीसाठी वेळेसह मसुदा तयार करण्यासाठी २ ते ३ आठवडे). याव्यतिरिक्त, लेखापरीक्षणासाठी निधी वाटप ज्यामध्ये बाह्य सल्लागार किंवा लेखापरीक्षकांसाठी शुल्क माहिती संकलन आणि विश्लेषणासाठी आवश्यक साधने किंवा सॉफ्टवेअर हे समाविष्ट असते. तसेच, सर्वेक्षण, केंद्रित गट किंवा मुलाखतींशी संबंधित खर्च (उदा. सहभागींना प्रोत्साहन, ठिकाण भाड्याने देणे). कर्मचारी वेळ, छपाई किंवा संप्रेषणासह इ. प्रशासकीय खर्च सुद्धा समाविष्ट केला जातो.

**६. भागधारकांशी संवाद साधणे आणि संलग्नित करणे.**

संपूर्ण लेखापरीक्षण प्रक्रियेत भागधारकांशी प्रभावी संवाद महत्वाचा असतो. लेखापरीक्षणाची व्याप्ती, उद्दिष्टे आणि कार्यपद्धती स्पष्ट करण्यासाठी वरिष्ठ नेतृत्वासोबत प्रारंभिक बैठक आयोजित केली जाते. भागधारकांना प्रगतीबद्दल अद्ययावत माहिती देण्यासाठी आणि प्राथमिक निष्कर्ष अहवाल तयार केला जातो. कारण ह्यामुळे विश्वास आणि संपूर्ण प्रक्रियेदरम्यान सरेखन सुनिश्चित करण्यात मदत होते. लेखापरीक्षणाच्या विविध टप्प्यांवर त्यांचे मार्गदर्शन देण्यास भागधारकांसाठी मार्ग निश्चित केला जातो.

**७. प्रसार आणि पाठपुरावा करण्यासाठी नियोजन करणे**

विश्लेषण पूर्ण झाल्यावर शेवटी लिंगभाव लेखापरीक्षणाचे निष्कर्ष कसे सादर केले जातील ते ठरविणे, जसे की औपचारिक अहवाल, नेतृत्वासाठी सादरीकरण किंवा सार्वजनिक सारांश (उदा. वार्षिक अहवाल). लेखापरीक्षणाचे निष्कर्ष आणि शिफारशींवर आधारित तपशीलवार कृती आराखडा तयार करण्यासाठी योजना

तयार करणे. लेखापरीक्षणाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी यंत्रणा निश्चित करणे.

लिंगभाव लेखापरीक्षण प्रभावी, सर्वसमावेशक आणि संस्थेच्या उद्दिष्टांशी जुळलेले आहे याची खात्री करण्यासाठी काळजीपूर्वक नियोजन करणे आवश्यक आहे. हा टप्पा लेखापरीक्षणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आणि लैंगिक समानता सुधारण्यासाठी कृती करण्यायोग्य अंतर्दृष्टी विकसित करण्यासाठी पाया निश्चित करतो.

**ब. लिंगभाव लेखापरीक्षण प्रक्रिया (Carrying Out)**

लिंगभाव लेखापरीक्षण प्रक्रिया हा एक महत्त्वाचा टप्पा आहे ज्यामध्ये माहिती संकलित केली जाते, माहितीचे विश्लेषण केले जाते आणि विवध संस्था, कार्यक्रम किंवा धोरणामध्ये लैंगिक असमानता, पूर्वाग्रह आणि क्षेत्रे ओळखण्यासाठी मूल्यांकन केले जाते. या टप्प्यासाठी काळजीपूर्वक नियोजन, भागधारक प्रतिबद्धता, विविध गुणात्मक आणि परिमाणात्मक पद्धतींचा वापर आवश्यक आहे. या चरणात सामील असलेल्या प्रमुख क्रियाकलापांचे सविस्तर विश्लेषण आपण खालीलप्रमाणे करू शकतो.

**१. माहितीचे संकलन**

लिंगभाव लेखापरीक्षण प्रक्रियेसाठी माहिती संकलन हा पहिला आणि सर्वात महत्वाचा भाग आहे. यामध्ये लिंगभाव गतिशीलतेची संपूर्ण स्थिती स्पष्ट होण्यासाठी परिमाणवाचक आणि गुणात्मक माहिती एकत्रित करणे महत्वाचे ठरते.

**अ. परिमाणवाचक माहिती संकलन–** परिमाणात्मक माहिती लिंगभाव अंतर, प्रवाह आणि नमुने मोजता येण्याजोगा माहिती प्रदान करते. यामध्ये संस्थेच्या विविध स्तरांवरील लिंगभाव प्रतिनिधित्वावरील डेटाचा समावेश असू शकतो (उदा. एकूण कार्यबल रचना, नेतृत्व भूमिका, मंडळ सदस्यत्व). व्यवस्थापन पदांवर पुरुष आणि महिलांची टक्केवारी, वरिष्ठ नेतृत्वातील लिंगभाव विघटन, विविध विभागांमधील लिंगभाव विविधता. त्याचप्रमाणे पगार वितरण, वेतनातील तफावत आणि लिंगाभावानुसार भरपाईची माहिती. ही माहिती कोणत्याही लिंगभाव-आधारित वेतन असमानता ओळखण्यात मदत करू शकते. समान भूमिकांसाठी पगारातील लिंगभाव-आधारित तफावत, विभाग किंवा स्तरांवरील वेतनातील तफावत इ. प्रगतीच्या संधींमध्ये लिंगभाव असमानता अस्तित्वात आहे का हे पाहण्यासाठी जाहिराती आणि करिअर प्रगती माहितीचे विश्लेषण सुद्धा महत्वाचे आहे. गेल्या वर्षभरात पुरुषांच्या टक्केवारीच्या एकूण किती महिलांना बढती मिळाली आणि लिंगाभावानुसार पदोन्नतीचा दर किती आहे? नियुक्ती प्रक्रियेत लैंगिक पूर्वाग्रह आहेत का? किंवा महिला आणि पुरुषांना नोकरीच्या संधींमध्ये समान प्रवेश आहे का? हे पाहण्यासाठी भरती, निवड आणि नियुक्ती माहितीचे पुनरावलोकन केले जाते. नोकरीच्या जाहिरातींमधील विविधता आणि भरती पद्धती सर्वसमावेशक आहेत का? कोणतेही लिंगभाव नमुने ओळखण्यासाठी अनुपस्थिती, पालक रजा आणि आजारी रजा यावरील माहितीचे परीक्षण केले जाते.

**ब. गुणात्मक माहिती संकलन–** गुणात्मक माहिती व्यक्तींच्या जीवनातील अनुभव आणि संस्थात्मक संस्कृतीबद्दल सखोल अंतर्दृष्टी प्रदान करतो. लपलेले पूर्वाग्रह आणि व्यक्तिपरक अडथळे उघड करण्यासाठी गुणात्मक माहिती संकलन आवश्यक असते. लैंगिक समानता, कार्यक्षेत्र संस्कृती आणि छळ वा भेदभाव यांसारख्या लिंगभावविषयक समस्यांबद्दल कर्मचाऱ्यांच्या धारणा आणि अनुभव एकत्रित करण्यासाठी सर्वेक्षणे आरखडे तयार करुन माहिती संकलित केली जाते. लैंगिक समानता आणि लैंगिक समस्या कशा प्रकट होतात याविषयी मत जाणून घेण्यासाठी कर्मचारी, नेते किंवा मुख्य भागधारक यांच्याशी प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या जातात. कारण मुलाखती सखोल प्रतिसाद आणि बारकावे समजून घेण्यास मदत करतात. लिंगभाव–संबंधित विषयांवर चर्चा करण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या विविध गटांसोबत 'केंद्रित गत चर्चा' आयोजित करून लिंगभाव लेखापरीक्षण सहभागींना अनुभव आणि कल्पना सामायिक करण्यासाठी व्यासपीठ प्रदान करते. स्त्रिया, पुरुष आणि डत्रह्नढट+ कर्मचाऱ्यांसाठी लिंगभावाशी संबंधित त्यांची आव्हाने, अडथळे आणि अनुभव शोधण्यासाठी स्वतंत्र केंद्रित गट तयार केले जातात. काही उदाहरणांमध्ये, सभा, संघ सहकार्य किंवा अनौपचारिक लिंगभाव गतिशीलता समजून घेण्यासाठी निरीक्षण केले जाते. लिंगभावाचे प्रतिनिधित्व आणि ते संबोधित कसे केले जाते याचे मूल्यांकन करण्यासाठी अंतर्गत आणि बाह्य दस्तऐवजांचे पुनरावलोकन केले जाते, जसे की धोरणे, अहवाल, प्रशिक्षण साहित्य आणि संस्थात्मक संप्रेषणे. यामध्ये कामाचे वर्णन, प्रचारात्मक साहित्य आणि अंतर्गत संप्रेषणांमध्ये वापरलेली भाषा पाहणे हेदेखील समाविष्ट असू शकते.

## २. भागधारकांचा सहभाग

लिंगभाव लेखापरीक्षण विविध दृष्टीकोनांना प्रतिबिंबित करते व लिंगभाव समस्या ओळखुन आणि त्यांचे निराकरण करण्यात मुख्य गट गुंतलेले आहेत त्यांची खात्री करण्यासाठी संपूर्ण लेखापरीक्षण प्रक्रियेमध्ये भागधारकांना समाविष्ट केले जाते. लिंगभाव समानतेबद्दलची त्यांची मते जाणून घेण्यासाठी आणि लेखापरीक्षणासाठी त्यांचे समर्थन मिळविण्यासाठी वरिष्ठ व्यवस्थापन आणि विभाग प्रमुखांशी संपर्क साधणे महत्वाचे ठरते. लेखापरीक्षण शिफारशी प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी नेत्यांनी देखील प्रक्रियेचा भाग बनले पाहिजे. कारण त्यांचे अनुभव समजून घेण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या वेग–वेगळ्या गटांना, लिंगभाव माहिती संकलनाच्या गटांमध्ये सामील केले जाते. पूर्वाग्रह, वेतन समानता आणि छळ यांसारख्या समस्यांचे निराकरण कसे करावे याबद्दल तांत्रिक सल्ल्यासाठी लिंगभाव तज्ञांचा सल्ला घेतला जातो की नाही हे तपासणे. माहिती संकलन पद्धती योग्य आणि सर्वसमावेशक आहेत याची खात्री करण्यासाठी अभिप्राय घेतला जातो. कर्मचाऱ्यांना त्यांचे अनुभव किंवा लेखापरीक्षण प्रक्रियेबद्दलच्या चिंता अज्ञातपणे सामायिक करण्याची संधी प्रदान करण्यासाठीची माहिती गोळा केली जाते.

## ३. माहितीचे विश्लेषण

माहिती संकलित केल्यानंतरच्या पुढील पायरीत लिंगभाव असमानता, पूर्वाग्रह आणि सुधारणेच्या संधीचे विश्लेषण केले जाते. यामध्ये प्रथमतः माहितीचे परिमाणात्मक विश्लेषण केले जाते– नुकसान भरपाई किंवा प्रतिनिधित्वाच्या प्रवेशामध्ये कोणतेही नमुने किंवा असमानता ओळखण्यासाठी लिंगभावानुसार (उदा.

पुरुष, महिला, नॉन–बायनरी, ट्रान्सजेंडर व्यक्ती) सर्व गोळा केलेली माहिती एकत्र करण्यासाठी सांख्यिकीय पद्धतींचा वापर केला जातो. विभागांमध्ये महिलांचे कमी प्रतिनिधित्व, वेतनातील तफावत किंवा असमान पदोन्नतीचे परस्परसंबंध शोधण्यासाठी वेगवेगळ्या महितींचा संदर्भ एकत्रित केला जातो. दुसरे म्हणजे, गुणात्मक विश्लेषण– विषयासंबंधी मुलाखती, केंद्रित गट आणि मुक्त सर्वेक्षण प्रतिसाद यांच्यातील गुणात्मक माहितीचे विश्लेषण केले जाते. लैंगिक समानतेचा प्रभावीपणे प्रचार केला जात आहे की नाही हे समजून घेण्यासाठी गुणात्मक अभिप्रायाच्या एकूण प्रतिसादांचे मूल्यांकन करणे. गुणात्मक माहितीचे विश्लेषण लैंगिक असमानतेची मूळ कारणे समजून घेण्यास मदत करते.

**४. लैंगिक अंतर आणि अडथळे ओळखणे**

विश्लेषणाच्या आधारे, लिंगभाव लेखापरीक्षण लिंगभाव आणि अडथळे समजून घेतात. यामध्ये विशिष्ट भूमिका किंवा विभागांमध्ये विशिष्ट लिंगभावांचे कमी किंवा जास्त प्रतिनिधित्व असलेल्या क्षेत्रांची ओळख करून लिंगभाव प्रतिनिधित्व बाबींचा अभ्यास केला जातो. (उदा. नेतृत्वाच्या पदांवर कमी महिला, काळजीवाहू भूमिकांमध्ये पुरुषांचे कमी प्रतिनिधित्व). महिला किंवा लैंगिक अल्पसंख्याकांसाठी प्रशिक्षण, पदोन्नती किंवा करिअर विकासाच्या संधींमध्ये प्रवेश करण्यासाठी अडथळे अधोरेखित करणे. लिंगभाव–पक्षपाती भरती प्रक्रिया किंवा पालकांच्या रजेचा अभाव यासारखी धोरणे किंवा पद्धती अनावधानाने एका लिंगभावाला इतरांपेक्षा कसे अनुकूल करू शकतात ते ओळखणे. अनौपचारिक अडथळे उघड करणे, जसे की कार्यक्षेत्र संस्कृती जिथे लैंगिक विविधता नाही किंवा रूढीवादी गोष्टींना बळकटी देणारे घटकांच्या मार्फत माहितीचे संकलन केले जाते.

**५. दस्तऐवजीकरण**

लेखापरीक्षण पार पाडल्यानंतर, लेखापरीक्षण संघ निष्कर्षांचे दस्तऐवजीकरण स्पष्ट आणि पद्धतशीरपणे करतो. कारण हे दस्तऐवजीकरण पुढील अहवालासाठी मार्गदर्शक ठरेल. यात परिमाणवाचक आणि गुणात्मक अशा दोन्ही पद्धतीत येणारे लैंगिक असमानता आणि अडथळे सादर केले जातात. संस्था किंवा कार्यक्रमात लैंगिक असमानता बघण्यासाठी विद्यमान धोरणे किंवा संरचनात्मक गतिशीलतेशी निष्कर्ष जोडून तपासल जातात. अंतिम शिफारशींमध्ये लैंगिक तफावत दूर केली जाईल याची खात्री करून त्यांचा प्रभाव आणि निकड यावर आधारित श्रेणी जारी केली जाते.

लिंगभाव लेखापरीक्षण ही एक सर्वसमावेशक प्रक्रिया आहे ज्यामध्ये माहिती संकलन, भागधारक प्रतिबद्धता आणि सविस्तर विश्लेषण समाविष्ट असते. लिंगभाव विषमतेची चौकशी करणे, समानतेतील अडथळे ओळखणे आणि लेखापरीक्षण च्या निष्कर्षांसाठी ठोस पुरावा तयार करणे हे महत्त्वाचे आहे. ही प्रक्रिया काळजीपूर्वक अंमलात आणून, संस्था मौल्यवान अंतर्दृष्टी मिळवू शकतात ज्यामुळे लिंगभाव असमानता संबोधित करणे आणि अधिक समावेशी वातावरणाचा प्रचार करण्यासाठी माहिती दिली जाते.

### क. मसुदा अहवाल (Draft Report)

लिंगभाव मूल्यमापनामधील अहवालाच्या मसुद्यामध्ये माहिती संकलन आणि विश्लेषणातून मिळालेले निष्कर्ष सर्वसमावेशक, स्पष्ट आणि कृती करण्यायोग्य दस्तऐवज म्हणून संग्रहित केले जातात. अहवाल हे लिंगभाव लेखापरीक्षणाचे परिणाम वरिष्ठ व्यवस्थापन, कर्मचारी आणि भागधारकांना कळविण्याचे प्रमुख साधन म्हणून काम करते. तसेच मसुदा अहवाल लिंगभाव समानतेच्या मुद्द्यांवर पुरावा-आधारित अंतर्दृष्टी प्रदान करून आणि लैंगिक असमानता दूर करण्यासाठी व्यावहारिक शिफारसी दिल्या जातात. लिंगभाव लेखापरीक्षण अहवालाचा मसुदा पुढील काही मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येऊ शकतो.

**१. मसुदा अहवालाची रचना**

लेखापरीक्षणाचे निष्कर्ष आणि शिफारशी स्पष्टपणे मांडल्या जातील याची खात्री करण्यासाठी मसुदा अहवाल तार्किक आणि सुसंगत पद्धतीने आयोजित केला जातो. लिंगभाव लेखापरीक्षण अहवालाच्या ठराविक रचनेत खालील बाबींचा समावेश केला जातो-

**अ. कार्यकारी सारांश-** लेखापरीक्षणाचे प्रमुख निष्कर्ष आणि शिफारशींचे संक्षिप्त वर्णन प्रदान करणे हा कार्यकारी सारांशाचा उद्देश असतो. वरिष्ठ नेतृत्व आणि इतर भागधारकांसाठी सहज उपलब्ध होईल अशा स्वरूपात अहवाल लिहिला जातो. यात मूल्यमानाची व्याप्ती, उद्दिष्टे आणि कार्यपद्धती यांचे संक्षिप्त वर्णन असते. सर्वात महत्त्वाच्या लैंगिक समानतेच्या समस्यांचा सारांश देण्यासाठी ज्यामध्ये लैंगिक वेतनातील अंतर, नेतृत्व प्रतिनिधित्व किंवा सांस्कृतिक पूर्वाग्रह या समस्यांचे निराकरण करण्यासाठी मुख्य शिफारसी केल्या जातात.

**ब. परिचय-** लिंगभाव लेखापरीक्षणाचा उद्देश आणि व्याप्ती मध्ये लिंगभाव लेखापरीक्षणाच्या उद्दिष्टांचा समावेश असतो उदा. कार्यबल प्रतिनिधित्व, वेतन समानता, संस्थात्मक संस्कृती. लैंगिक समानता उद्दिष्टे, धोरणे आणि कोणतेही संबंधित बाह्य किंवा अंतर्गत घटक (उदा. लिंगभाव लेखापरीक्षण, राष्ट्रीय नियमने किंवा मानके) संस्था किंवा कार्यक्रमाविषयीच्या पार्श्वभूमीची माहिती प्रदान केली जाते. लेखापरीक्षणाची स्पष्टपणे नमूद केलेली उद्दिष्टे म्हणजे वेतनातील लैंगिक असमानतेचे मूल्यांकन, नेतृत्वामध्ये लिंगभाव प्रतिनिधित्वाचे पुनरावलोकन किंवा लिंगभाव-आधारित धोरणांच्या प्रभावाचे मूल्यांकन या सर्व बाबी अधोरेखित करणे.

**क. कार्यपद्धती-** प्रथमत: माहिती गोळा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतींचे वर्णन करण्यात येते. यामध्ये सर्वेक्षण, मुलाखती, केंद्रित समूह चर्चा, दस्तऐवज आढावा आणि परिमाणवाचक माहिती = विश्लेषण यांचा समावेश असतो. दुसरे म्हणजे, सहभागी कसे निवडले गेले आणि लिंगभाव प्रतिनिधित्व कसे सुनिश्चित केले गेले यासाठी निर्दिष्ट केलेल्या नमुना पद्धतींची माहिती. (उदा., विविध स्तरांवरील, विभागातील किंवा क्षेत्रांमधील कर्मचारी). तिसरे म्हणजे कोणते माहिती स्रोत वापरले जातात? जसे की दस्तऐवज, अहवाल किंवा अंतर्गत माहिती ज्याचे लेखापरीक्षणाचा भाग म्हणून पुनरावलोकन केले गेले

(उदा. कर्मचारी रेकॉर्ड, पगार डेटा, भरती अहवाल). गोपनीयता, संमती आणि लिंगभाव-समावेशक भाषेचा वापर यासह मूल्यमानामध्ये घेतलेल्या नैतिक दृष्टिकोनाचा उल्लेख केलेला असतो.

**ड. निष्कर्ष–** अहवालाचा मुख्य आणि महत्वाचा भाग जिथे गोळा केलेल्या माहितीचे सादरीकरण, विश्लेषण आणि अवलोकन केले जाते. निष्कर्ष मुख्य व उप-विभागांमध्ये आयोजित केले जातात जसे कार्यबल रचना, लिंगभाव वेतन अंतर, भर्ती आणि नियुक्ती पद्धती, पदोन्नती आणि करियरची प्रगती, संस्थात्मक संस्कृती आणि लिंगभाव-विशिष्ट धोरणांचा प्रभाव इ.

**इ. विश्लेषण–** निष्कर्षांचे सखोल स्पष्टीकरण विश्लेषणाद्वारे प्रदान करून त्यांना विस्तृत संरचनात्मक, सांस्कृतिक किंवा धोरण-संबंधित घटकांशी जोडले जाते. माहितीच्या आधारे निष्कर्ष काढणे आणि लिंगभाव असमानतेची मूळ कारणे अधोरेखित करणे महत्त्वाचे असते.वंश, वर्ग, अपंगत्व किंवा लैंगिक अभिमुखता यांसारख्या इतर सामाजिक ओळखींशी लिंगभाव कसे जोडले जाते याचे विश्लेषण करण्यासाठी आंतरविभागीय विचार अंतर्भूत असणे आवश्यक असते.

## २. शिफारशी

लेखापरीक्षणाचे निष्कर्ष आणि विश्लेषणावर आधारित लिंगभाव असमानता दूर करण्यासाठी स्पष्ट आणि कृती करण्यायोग्य शिफारसी देणे. बदल आणि नवीन धोरणे सुचवणाऱ्या शिफारसी सुचविणे ज्या लिंगभाव असमानता दूर करण्यात मदत करतील. लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेच्या संरचनेत किंवा प्रक्रियांमध्ये बदल करण्याची शिफारस करणे. ज्यामध्ये निर्णय घेण्याची प्रक्रिया, नेतृत्व संरचना किंवा भरती पद्धतींमधील बदलांचा समावेश असतो. सर्व लिंगभावासाठी कार्यस्थळ संस्कृती अधिक समावेशक आणि सहाय्यक बनवण्यासाठी सूचना देणे. शिफारसी लागू करण्याच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी मार्ग सुचविणे. ज्यामध्ये मुख्य कार्यप्रदर्शन निर्देशक, नियमित पाठपुरावा लेखापरीक्षण करणे किंवा लिंगभाव समानता कार्य पाथक तयार करणे समाविष्ट असते.

## ३. निष्कर्ष

यामध्ये मुख्य निष्कर्ष, विश्लेषण आणि शिफारशींचा सारांश असतो, ज्यामुळे संस्थेतील लैंगिक समानतेला संबोधित करण्याचे महत्त्व अधिक बळकट होते. कर्मचारी समाधान, विविधता आणि वर्धित संस्थात्मक कार्यप्रदर्शन यासारख्या शिफारशींच्या अंमलबजावणीच्या संभाव्य फायद्यांवर प्रकाश टाकून त्यात दूरदृष्टी असणे महत्वाचे असते.

## ४. भागधारक अभिप्राय

मसुदा अहवालाला अंतिम स्वरूप देण्यापूर्वी, अभिप्राय आणि प्रमाणीकरणासाठी मुख्य भागधारकांसोबत (उदा. वरिष्ठ नेतृत्व, मानव संसाधन, विविधता अधिकारी आणि कर्मचारी प्रतिनिधी) मसुदा सामायिक करणे महत्त्वाचे असते. यामुळे अहवाल सर्वसमावेशक, अचूक आणि संस्थेच्या उद्दिष्टांशी संयोजित आहे हे सुनिश्चित केले जाते.

## ५. अहवालाची पडताडणी आणि अंतिम स्वरूप

भागधारकांकडून प्राप्त झालेला अभिप्राय मसुदा अहवालात समाविष्ट करून आवश्यक त्या सुधारणा करणे. अंतिम अहवाल स्पष्ट, संक्षिप्त, सर्व वाचकांसाठी उपलब्ध, भाषा स्पष्ट आणि सर्व भागधारकांसाठी प्रवेशयोग्य असल्याची याची खात्री केली जाते. माहिती सादर करण्यासाठी चार्ट, आलेख आणि सारण्या यांसारख्या दृश्यमान साधणांचा समावेश केला जातो. योग्य शीर्षके, उपशीर्षके आणि सुसंगत मांडणीसह अहवाल सादर केला जातो.

## ड. अंतिम अहवाल (Final Report)

लिंगभाव लेखापरीक्षणातील अंतिम अहवालाची पायरी ही संपूर्ण लेखापरीक्षण प्रक्रियेचा कळस आहे. प्रारंभी मसुदा अहवाल तयार केल्यानंतर आणि भागधारकांच्या अभिप्रायाचा समावेश केल्यानंतर, अंतिम अहवालात निष्कर्ष, विश्लेषण आणि शिफारसी उत्कृष्ट आणि सुलभ स्वरूपात सादर केल्या जातात. हा अहवाल संस्थेमध्ये लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी निर्णय घेणे, धोरणातील बदल आणि भविष्यातील कृतींसाठी आधार म्हणून काम करतो. कोणत्याही संस्थेला लैंगिक समानता पद्धती सुधारण्यात मदत करण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी अंतिम अहवाल सर्वसमावेशक, स्पष्ट आणि कृतीशील असावा लागतो. लिंगभाव लेखापरीक्षण अहवालाला अंतिम स्वरूप देण्याच्या पायऱ्या खालीलप्रमाणे:

**१. पुनरावलोकन आणि भागधारकांचा अभिप्राय–** अहवालाला अंतिम स्वरूप देण्यापूर्वी, संबंधित भागधारकांनी पुरवलेली माहितीचे संपूर्ण पुनरावलोकन प्रक्रिया पार पडल्याची खात्री करणे. माहितीची अचूकता, निष्कर्षांची प्रासंगिकता आणि शिफारसींची व्यवहार्यता सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे.

**२. संस्थात्मक उद्दिष्टे आणि धोरणांसह समायोजन–** अंतिम अहवाल संस्थेच्या व्यापक उद्दिष्टांशी संयोजित असला पाहिजे, निष्कर्ष आणि शिफारसी संस्थेच्या ध्येय आणि मूल्यांशी संलग्न आहेत हे सुनिश्चित करणे.

**३. माहिती सादरीकरण आणि विश्लेषणास अंतिम स्वरूप देणे–** अंतिम अहवालात माहिती आणि विश्लेषण स्पष्ट, संघटित आणि दृष्य पद्धतीने सादर केले पाहिजे व भागधारकांना सहजपणे निष्कर्ष समजून घेण्यास आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मार्गदर्शक ठरेल अशा स्वरूपात असणे आवश्यक आहे.

**४. कृती करण्यायोग्य शिफारसी–** अंतिम अहवालात, संस्थेमध्ये लागू केल्या जाऊ शकतील अशा शिफारशी अग्रक्रमित पायऱ्या म्हणून सादर करणे. तसेच या शिफारशी लेखापरीक्षणाच्या वास्तववादी निष्कर्षांवर आधारित असाव्यात व उपलब्ध संसाधनांवर संलग्नित असाव्या.

**५. अंतिम अहवाल पुनरावलोकन आणि साइन–ऑफ–** अहवालाला अंतिम स्वरूप देण्यापूर्वी आणि व्यापक श्रोत्यांसह सामायिक करण्यापूर्वी तो अंतर्गत पुनरावलोकन आणि साइन–ऑफ प्रक्रियेतून गेला पाहिजे.

**६. अंतिम अहवालाचा प्रसार–** अंतिम अहवालाचे पुनरावलोकन केल्यानंतर आणि त्यावर स्वाक्षरी झाल्यावर, संस्थेतील आणि बाहेरील संबंधित भागधारकांसह प्रसारित केला जातो.

**७. पाठपुरावा आणि देखरेख–** अंतिम अहवाल प्रसारित झाल्यानंतर आणि कृती योजना सुरू झाल्यानंतर, प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी नियमित पाठपुरावा केला जातो.

अंतिम अहवाल हा केवळ लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांचे प्रतिबिंब नाही तर संघटनात्मक बदल घडवून आणणारा एक प्रमुख दस्तऐवज देखील आहे. लैंगिक समानता सुधारण्यासाठी स्पष्ट, कृतीयोग्य पावले सादर करून, अंतिम अहवाल अधिक समावेशक आणि न्याय्य कार्यस्थळाला प्रोत्साहन देण्यासाठी मार्गदर्शक म्हणून काम करतो.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न– क्रमांक २**

अ) बहुपर्यायी प्रश्न

१) लिंगभाव लेखापरीक्षण प्रक्रियेचा पहिला टप्पा कोणता?

अ) मसुदा अहवाल ब) लिंगभाव लेखापरीक्षण पार पाडण्याचा टप्पा

क) नियोजन ड) अंतिम अहवाल

२) माहिती संकलनासाठी कोणत्या पद्धती वापरल्या जातात?

अ) परिमाणवाचक ब) गुणात्मक क) अ व ब दोन्ही ड) फक्त अ

३) लिंगभाव लेखापरीक्षणातील कोणती पायरी ही संपूर्ण लेखापरीक्षण प्रक्रियेचा कळस आहे.

अ) मसुदा अहवाल ब) अंतिम अहवाल क) नियोजन टप्पा ड) यापैकी नाही

४) लिंगभाव लेखापरीक्षण अहवालाला अंतिम स्वरूप देण्यासाठी किती पायऱ्या समाविष्ट आहेत?

अ) पाच ब) आठ क) दहा ड) सात

५) लिंगभाव लेखापरीक्षण प्रक्रिया एकूण किती टप्प्यांत पार पाडली जाते.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

## २.३.३ लिंगभाव लेखापरीक्षकाची भूमिका आणि लिंगभाव पडताळणी सूची/यादी

## (Role and Checklist of Gender Auditors)

लिंगभाव लेखापरीक्षकाची भूमिका बहुआयामी असते आणि त्यामध्ये संस्थेमध्ये लैंगिक समानतेचे मूल्यांकन आणि प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने अनेक प्रमुख जबाबदाऱ्या असतात. त्यांच्या भूमिका आणि कार्यांचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे:

### १. धोरण पुनरावलोकन आणि विश्लेषण

लिंगभाव लेखापरीक्षक लिंगभाव समस्यांचे निराकरण कसे करतात हे निर्धारित करण्यासाठी नियुक्ती, पदोन्नती, वेतन, पालकांची रजा आणि छळ संबंधित संस्थात्मक धोरणे तपासतात. तसेच ते अंतर्निहित पूर्वाग्रहांसाठी धोरणांचे मूल्यांकन करतात.

### २. डेटा संकलन आणि विश्लेषण

लिंगभाव लेखापरीक्षक विविध स्तरांवर (उदा. कर्मचारी, व्यवस्थापन) आणि कार्ये (उदा. नोकरीचे दर, पगारातील असमानता) लिंगभाव प्रतिनिधित्वावर माहिती गोळा करतात. लेखापरीक्षक संस्थेतील लैंगिक गतिमानतेशी संबंधित वैयक्तिक अनुभव एकत्रित करण्यासाठी मुलाखती आणि केंद्रित गट चर्चा देखील घेतात. याव्यतिरिक्त ते नमुने, ट्रेंड आणि असमानता ओळखण्यासाठी डेटाचे विश्लेषण करतात.

### ३. भागधारकांची वचनबद्धता

लेखापरीक्षकांना कर्मचारी, व्यवस्थापन आणि भागधारक यांच्यासोबत कामाच्या ठिकाणी लैंगिक समानता आणि समावेशाना विषयीच्या गरजांना समजून घेणे आवश्यक आहे. लिंगभाव समस्यांबद्दल खुल्या संवादासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे, सर्व समस्या जाणून घेणे, सर्वसमावेशक वातावरण तयार करणे यासाठी लेखापरीक्षकांना चर्चेची सोय करावी लागते.

### ४. अंतर आणि अडथळ्यांचा परिचय करून देणे

लेखापरीक्षक लिंगभाव समानतेला अडथळा आणणारे प्रणालीगत आणि संरचनात्मक अडथळे ओळखतात, जसे की काम करण्याच्या ठिकाणी असलेली संस्कृती, नेतृत्व शैली किंवा निर्णय घेण्याची प्रक्रिया इ. लेखापरीक्षक विशिष्ट लैंगिक ओळख असलेल्या व्यक्तींना गैरसोय होऊ शकते यासाठी विशिष्ट क्षेत्रे ओळखण्याची भूमिका पार पडतात.

### ५. सुधारणेसाठी शिफारसी

लेखापरीक्षकांनी लैंगिक अंतर दूर करण्यासाठी स्पष्ट, व्यावहारिक शिफारशी दिल्या पाहिजे, ज्यामध्ये नियुक्त करण्याच्या पद्धतींमध्ये सुधारणा करणे किंवा मार्गदर्शन कार्यक्रम लागू करणे अंतर्भूत असते. लैंगिक समानतेला प्रोत्साहन देणाऱ्या इतर संस्था किंवा क्षेत्रातील यशस्वी धोरणांचा पुरस्कार करणे.

### ६. क्षमता वाढवणे

लेखापरीक्षक लिंगभाव समस्या, लिंगभाव पूर्वाग्रह आणि समावेशक पद्धतींवर कर्मचारी आणि नेतृत्वासाठी प्रशिक्षण सत्रे वितरीत करणारे कार्यक्रम आयोजित करतात. तसेच, ते जागरुकता उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी मोहिमा आयोजित करतात जिथे कर्मचाऱ्यांना लैंगिक समानता आणि सहयोगीपणाचे महत्त्व शिकवले जाते.

## ७. देखरेख आणि लेखापरीक्षण

लिंगभाव लेखापरीक्षक लिंगभाव समानता उद्दिष्टे साध्य करण्याची प्रगती मोजण्यासाठी प्रमुख कार्यप्रदर्शन निर्देशक स्थापित करण्यासाठी मेट्रिक्स सेट करतात. लेखापरीक्षक चालू लेखापरीक्षणाचे मूल्यांकन करतात आणि अंमलात आणलेल्या बदलांच्या परिणामकारकतेचे मूल्यांकन करण्यासाठी व आवश्यकतेनुसार अतिरिक्त शिफारसी प्रदान करण्यासाठी नियमित पाठपुरावा करतात.

## ८. अहवाल

लेखापरीक्षक सर्व भागधारकांसाठी स्पष्टता आणि सुलभता सुनिश्चित करून निष्कर्ष, विश्लेषण आणि शिफारसी यांचा सारांश देणारे तपशीलवार सर्वसमावेशक अहवाल तयार करतात.

## ९. सल्लागार भूमिका

लेखापरीक्षक लिंगभाव-संबंधित समस्यांवर नेतृत्वाचा विश्वासू सल्लागार म्हणून काम करण्याची भूमिका पार पाडतात व धोरणात्मक निर्णय घेण्यास मार्गदर्शन करतात. लिंगभाव समानता व्यापक संस्थात्मक धोरणे आणि उद्दिष्टांमध्ये समाकलित करण्यासाठी लेखापरीक्षक व्यवस्थापनासोबत काम करतांना दिसून येतात.

## १०. समावेशन संस्कृतीला प्रोत्साहन

लेखापरीक्षकांना संस्थात्मक संस्कृतीचे लेखापरीक्षण करून विविधता आणि समावेशास समर्थन देण्याची भूमिका पार पाडावी लागते. तसेच, त्यांनी लिंगभाव समानतेसाठी एकसंध दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी विभागांमधील सहकार्याला प्रोत्साहन वाढवणे महत्वाचे आहे.

विविधतेला महत्त्व देणाऱ्या आणि समानतेला प्रोत्साहन देणाऱ्या सर्वसमावेशक कार्यस्थळांना प्रोत्साहन देण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षकाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. त्यांचे कार्य संस्थात्मक कार्यप्रदर्शन, सकारात्मक प्रतिष्ठा आणि लैंगिक समानतेशी संबंधित कायदेशीर व नैतिक मानकांचे पालन करण्यास संस्थांना मदत करू शकते. लैंगिक असमानता दूर सर्वसमावेशकतेला प्रोत्साहन देऊन, लिंगभाव लेखापरीक्षक सर्व कर्मचाऱ्यांसाठी अधिक न्याय्य आणि प्रामाणिक कार्यस्थळ तयार करण्यात त्यांचे योगदान महत्वाचे ठरते.

## लिंगभाव लेखापरीक्षणाची यादी/सूची

लिंगभाव लेखापरीक्षण पडताळणी यादी ही लिंगभाव दृष्टीकोनातून संस्थेची धोरणे, पद्धती आणि परिणामांचे व्यवस्थित मूल्यांकन करण्यासाठी वापरले जाणारे साधन आहे. यामध्ये प्रश्न, संकेतक किंवा निकषांचा संच असतो जो संस्था, कार्यक्रम किंवा प्रकल्पातील लैंगिक असमानता, अंतर आणि पूर्वाग्रह तपासण्यासाठी संरचीत केलेलला आहे. यादी संस्थेच्या किंवा उपक्रमाच्या विविध पैलूंचे परीक्षण करण्यात मदत करते, व सुनिश्चित करते की निर्णय घेणे, संसाधन वाटप आणि अंमलबजावणी प्रक्रियांमध्ये लिंगभाव विचार संकलित केले जातात. धोरणे, पद्धती आणि परिणाम सर्व लिंगभावांसाठी विशेषत: स्त्रिया, पुरुष आणि उपेक्षित लिंग गटांना भेडसावणाऱ्या विशिष्ट गरजा आणि आव्हानांसह सर्वसमावेशक आणि न्याय्य

आहेत की नाही याचे मूल्यांकन करण्यासाठी हे एक संरचित चौकट प्रदान करते. तसेच एखाद्या संस्थेच्या धोरणे, पद्धती आणि संस्कृतीच्या विविध पैलूंचे लिंगभाव दृष्टिकोनातून मूल्यांकन करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून काम करते. लिंगभाव लेखापरीक्षण पडताळणी यादी लेखापरीक्षणाच्या विशिष्ट व्याप्ती आणि संस्थेच्या संदर्भावर आधारून बदलली जाऊ शकते.

**लिंगभाव लेखापरीक्षण पडताळणी यादी/सूची**

**I. सामान्य माहिती**

१. प्रशासकीय माहिती :

संस्थेचे नाव :

संपर्क व्यक्ती :

संपर्क :

२. कृपया थोडक्यात संस्थेची पार्श्वभूमी, इतिहास, उद्दिष्टे आणि ध्येये अधोरेखित करा.

**II. मुख्य लिंगभाव समस्या**

१. तुमच्या कार्यक्षेत्रातील प्रमुख लिंगभाव समस्या कोणत्या आहेत?

२. तुम्हाला असे वाटते का तुमच्या कार्यामध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रचार करणे आणि सेन्सॉरशीपशी लढा देणे समाविष्ट आहे, की यात काही लिंगभाव परिमाण आहेत? असल्यास ते कोणते?

३. तुमच्या कार्यामध्ये ज्या प्रमाणात मीडियासोबत काम करणे समाविष्ट आहे, त्या प्रमाणात तुम्ही मुख्य लिंगभाव समस्या कोणत्या मानतात?

**III. लिंगभाव धोरण रचना**

१. संस्थेमध्ये धोरण तयार करण्याची प्रक्रिया काय आहे?

२. महिला आणि पुरुष दोघांचाही सल्ला घेतला जातो का? आणि ते धोरण तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभागी होतात का?

३. लैंगिक समानतेवरील आंतरराष्ट्रीय करार, जसे की Convention on the Elimination of All Forms of Discrimination against Women (CEDAW), तुमच्या संस्थेची धोरणे आणि क्रियाकलाप सूचित करतात?

४. प्रशासकीय मंडळ लिंगभाव मुख्य प्रवाहाला प्राधान्य मानते का?

५. तुमच्या धोरणात्मक संवादात किंवा देणगीदारांशी, विशेषतः SIDA सोबतच्या इतर व्यवहारांमध्ये लिंगभावाचा मुद्दा कधी उद्भवला आहे का? ज्या प्रमाणात ती एक अट आहे, ती कशी

प्रतिबिंबित होते? निधीसाठी ही अट आहे का, आणि जर असेल तर याबद्दल तुमचा काय दृष्टिकोन आहे?

६. तुमच्या संस्थेकडे लैंगिक समानतेसाठी वचनबद्धतेची पुष्टी करणारे लिखित लिंगभाव धोरण आहे का? कृपया एक प्रत देऊ शकाल का?

७. हे धोरण कार्यक्रम आणि प्रकल्पांमध्ये लैंगिक समानतेचे एकत्रीकरण अनिवार्य करते का?

८. कोणत्या प्रक्रियेद्वारे हे विकसित केले गेले? संस्थेतील प्रत्येकाला लिंगभाव धोरणाची मालकी वाटते का?

९. व्यवस्थापन लिंगभाव धोरणाच्या अंमलबजावणीची जबाबदारी घेते का? याचा वारंवार उल्लेख केला जातो का? कुठे आणि कसे?

१०. ज्या प्रमाणात तुमची संस्था जागतिक किंवा प्रादेशिक आहे आणि तिची कार्यालये आहेत, मुख्य कार्यालयात लिंगावर केलेल्या कृती किंवा त्याउलट संपूर्ण संस्थेद्वारे सुसंगत, प्रतिध्वनी आणि सामायिक केल्या जातील याची तुम्ही खात्री कशी करतात?

११. तुमच्या संस्थेकडे स्वतंत्र लिंगभाव धोरण आहे त्या प्रमाणात ते संस्थेतील इतर धोरणे आणि/किंवा पद्धतींना कसे सूचित करते (उदाहरणार्थ तुमचे मानवी संसाधन धोरण, आचारसंहिता आणि संपादकीय धोरणे?) कृपया उदाहरणे द्या.

१२. जर तुमच्या संस्थेकडे लिंगभाव धोरण नसेल, तर तुमच्या संस्थेच्या कार्याचे मार्गदर्शन करणाऱ्या विद्यमान दस्तऐवजांमध्ये लिंगभाव कोणत्या प्रकारे प्रतिबिंबित होते? कृपया उदाहरणे द्या.

१३. संस्थेच्या ध्येय आणि दृष्टीमध्ये लिंगभाव प्रतिबिंबित होते का?

**IV. कार्यक्रम आणि प्रकल्प विश्लेषण**

**अ) कार्यक्रम/प्रकल्प योजना आणि आराखडा**

१. संस्थेचे कार्य काय आहे आणि त्याची रचना कशी आहे? कृपया संबंधित कागदपत्रे प्रदान करा जसे की वार्षिक अहवाल, धोरणात्मक योजना, संस्थात्मक माहिती इ.

२. तुमच्या कार्यक्रमांचे लक्ष्यित लाभार्थी कोण आहेत? हे लिंगभावानुसार वेगळे आहेत का?

३. तुमच्या संस्थेने तुमच्या कामाच्या लिंगभावानुसार परिमाणांवर कोणतेही संशोधन केले आहे का? हे काय दर्शविते आणि यावर कसे कार्य केले गेले?

४. संस्थेच्या कामाचे धोरणात्मक नियोजन करताना लिंगभाव विचारात घेतले जाते का?

५. कार्यक्रम क्षेत्रांच्या निवडीमध्ये लैंगिक समस्या किती प्रमाणात प्रतिबिंबित होतात आणि त्याकडे लक्ष दिले जाते का?

६. तुमच्याकडे कोणतेही लिंगभाव-विशिष्ट कार्यक्रम किंवा प्रकल्प आहेत का (उदा. माध्यमांमध्ये लैंगिक समानतेला प्रोत्साहन देणारा प्रकल्प, लिंगभाव केंद्रित कार्यक्रम, महिलांचे रेडिओ क्लब इ.) कृपया याची उदाहरणे द्या आणि ते कसे आले याचे वर्णन करा.

७. सर्व प्रकल्प/कार्यक्रमांमध्ये लिंगभाव किती प्रमाणात मुख्य प्रवाहात आणले जाते? उदाहरणार्थ, प्रकल्प आणि कार्यक्रमाची उद्दिष्टे, धोरणे, क्रियाकलाप आणि परिणाम लिंगभाव-विशिष्ट पद्धतीने परिभाषित केले आहेत का? कृपया उदाहरणे द्या.

८. तुमच्या कार्यक्रम/प्रकल्प प्रस्ताव मंजुरी प्रक्रियेमध्ये लिंगभाव विषयक प्रश्न किंवा निकष समाविष्ट केले आहेत का?

९. लिंगभाव-संबंधित परिणाम आणि निर्देशक स्पष्टपणे निर्दिष्ट केले आहेत?

**ब) कार्यक्रम/प्रकल्प अंमलबजावणी**

१. कार्यक्रम/प्रकल्पांची अंमलबजावणी योजना महिला आणि पुरुषांना समान लाभाची खात्री देते का? उदाहरणार्थ, तुम्ही प्रशिक्षण देत असल्यास, तुम्ही महिला आणि पुरुषांचा समान सहभाग सुनिश्चित करतात का? याचे निरीक्षण कसे केले जाते? ज्या प्रमाणात लैंगिक अंतर ओळखले जाते ते कसे दूर केले जाते?

२. तुमचा प्रकल्प/कार्यक्रम अंमलबजावणी योजना लिंगभाव पूर्वग्रहाला आव्हान/मजबूत करतात का? कसे?

३. तुमच्या कार्यक्रम/ प्रकल्पांमधील लिंगभाव समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रतिकार ओळखण्याची आणि हाताळण्याची तुमच्या संस्थेची क्षमता आहे का?

**क) समर्थन, दबाव आणि संप्रेषण**

१. समर्थन मोहिमा आणि उपक्रम लिंगभाव दृष्टीकोनातून नियोजित आणि सूचित केल्या जातात का?

२. तुम्ही महिला संस्था, नेटवर्क आणि लिंगभाव तज्ञांच्या कौशल्यांसह भागीदारी करता/तयार करता?

३. तुमच्या संस्थेच्या संप्रेषण आणि माध्यम धोरणांमध्ये लिंगभाव अंतर्भूत केले आहे का?

४. विशेषतः दुर्गम भागातील महिला आणि पुरुषांपर्यंत समान रीतीने माहिती पोहोचेल याची खात्री करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत?

५. तुमच्या संस्थेद्वारे उत्पादित आणि प्रसारित केलेल्या माहिती आणि माहितीच्या सामग्रीवर लिंगभाव विश्लेषण आहे का?

६. तुमच्या चर्चा आणि मोहिमांमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग असावा यासाठी प्रयत्न केले जातात का?

७. तुमच्या संस्थेच्या भागीदार किंवा स्थानिक स्वयंसेवी संस्था ज्यांच्याशी मोहिमा राबवायच्या त्यांच्या निवडीमध्ये लैंगिक समानतेची बांधिलकी हा एक निकष आहे का? कृपया उदाहरणे द्या.

**ड) प्रकाशन**

१. तुम्ही ज्या प्रमाणात प्रकाशने तयार करता त्या प्रमाणात तुम्ही योगदानामध्ये लिंगभाव संतुलन किती प्रमाणात सुनिश्चित करतात?

२. तुम्ही स्त्रिया आणि पुरुषांचे प्रतिमा किती प्रमाणात वापर करतात?

३. लेखांमध्ये इतर लोकांचा उल्लेख असल्यास, स्त्रोतांमध्ये लिंगभाव संतुलन सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे का?

४. लेख/प्रतिमा लिंगभाव पूर्वग्रहाना आव्हान देतात किंवा मजबूत करतात? कृपया उदाहरणे द्या.

५. वापरलेली भाषा लिंगभाव संवेदनशील आहे का? कृपया उदाहरणे द्या.

६. तुमच्या प्रकाशनांमध्ये लिंगभाव-विशिष्ट लेख समाविष्ट आहेत का? कृपया उदाहरणे द्या.

७. इतर लेखांमध्ये लिंगभाव मुख्य प्रवाहात आहे का? कृपया उदाहरणे द्या.

८. तुमची प्रकाशने ज्यांच्यापर्यंत पोहोचतात असा डेटा तुमच्याकडे आहे आणि हे लिंगभावनुसार वेगळे केले गेले आहे का? त्याने काय दाखवले आणि त्यावर कसे वागतात?

९. जे तुमच्या प्रकाशने वापरतात त्यांच्याकडून तुम्ही अभिप्राय कसा मागता? या अभिप्रायाचे लिंगभाव विश्लेषण केले जाते का? ते काय दर्शवते आणि या निष्कर्षांवर कसे कार्य केले जाते?

**ई) देखरेख आणि लेखापरीक्षण**

१. तुमच्या कार्यक्रमांसाठी कोणते लिंगभाव संकेतक विकसित केले गेले आहेत?

२. प्रकल्प आणि कार्यक्रमांसाठी लिंगभाव-विभक्त डेटा गोळा केला जातो का? ते कार्यक्रम/प्रकल्प डिझाइन आणि लेखापरीक्षणाची माहिती देते का?

३. कार्यक्रम/प्रकल्पांच्या लिंगभाव प्रभावाचे परीक्षण आणि लेखापरीक्षण केले जाते का?

४. तुमच्या संस्थेमध्ये प्रोग्रॅमिंग/प्रकल्प नियोजन, अंमलबजावणी आणि लेखापरीक्षणामध्ये लिंगभाव विश्लेषणाचा समावेश करण्यात कोणते अडथळे आहेत?

**V. संघटनात्मक**

**अ) कर्मचारी**

१. कृपया खालील तक्त्याचा वापर करून संस्थेच्या रचनेचा सारांश द्या:

| | स्त्रियांची संख्या | पुरुषांची संख्या | एकूण | स्त्रियांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| मंडळ | | | | |
| व्यवस्थापन | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कर्मचारी | | | | |
| प्रशासकीय | | | | |
| कारकुनी | | | | |
| एकूण | | | | |

✻ मंडळाचे अध्यक्ष किंवा अध्यक्ष महिला आहेत की पुरुष?

✻ मुख्य कार्यकारी अधिकारी/कार्यकारी संचालक/मुख्य व्यवस्थापक स्त्री आहे की पुरुष?

२. वरील आधारावर संस्थेतील मुख्य लिंगभाव अंतर काय आहेत?

३. संस्थेने सर्व स्तरावरील कर्मचाऱ्यांमध्ये अधिक समान लैंगिक संतुलनास प्रोत्साहन देण्यासाठी स्पष्ट उपाययोजना केल्या आहेत का? हे काय आहेत?

४. गेल्या काही वर्षांत काही बदल झाले आहेत का? जर असे असेल तर हे काय होते? हे नैसर्गिक उत्क्रांतीच्या हेतुपुरस्सर धोरणाचा परिणाम आहे का?

५. वरिष्ठ पदांवर महिलांची नियुक्ती किंवा पदोन्नती करण्यासाठी काही सक्रिय धोरणे राबवली जातात का?

**ब) निवड आणि भरती**

१. लिखित समान संधी धोरण आहे का?

२. नोकऱ्यांची जाहिरात कशी केली जाते? महिलांना अर्ज करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात? संभाव्य महिला अर्जदारांची डेटा बँक ठेवली जाते का?

३. मुलाखत पॅनेल लिंगभाव संतुलित आहेत का?

**क) करिअर मार्ग**

१. लिंगभाव दरी कमी करण्यासाठी महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी कोणते विशेष प्रयत्न केले जातात?

२. पदोन्नतीमध्ये लिंगभाव विचारात घेतले जाते का?

**ड) कामाची परिस्थिती आणि वातावरण**

१. तुमच्या संस्थेमध्ये लवचिक कामाची व्यवस्था आहे का?

२. मातृत्व आणि पितृत्व रजा धोरण आहे का?

३. संस्थेकडे बालसंगोपन सुविधा/तरतुदी आहेत का?

४. संस्था लिंगभाव-संवेदनशील वर्तनाचे पालन करते का, उदा. वापरलेल्या भाषेच्या संदर्भात?

५. लैंगिक छळ प्रती बंधासाठी तयार केलेली समिती आहे का?

६. तुम्ही तुमच्या संस्थेला कुटुंब-अनुकूल धोरण मानता का? जर असे असेल तर हे काय आहेत आणि त्यांचा संस्थेच्या कामावर कसा परिणाम झाला आहे?

**इ) लिंगभाव व्यवस्थापन प्रणाली**

१. तुमच्या संस्थेमध्ये लिंगभाव मुख्य प्रवाहात समन्वय साधण्यासाठी एखादी व्यक्ती किंवा समिती जबाबदार आहे का?

२. व्यवस्थापन स्तरावरील कर्मचाऱ्यांसह प्रत्येक कर्मचारी सदस्याने त्यांच्या कामात लिंगभाव विचारात घेणे आवश्यक आहे का?

३. कार्यप्रदर्शन व्यवस्थापन प्रणालीमध्ये लिंगभाव वैशिष्ट्य कसे आहे? हे काम मोलाचे/पुरस्कृत आहे का?

४. कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामात लिंगभाव विचार समाकलित करण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये आणि दृष्टीकोन आहे का?

५. संस्थेमध्ये लैंगिक जागरूकता प्रशिक्षण दिले जाते का? याचे काय परिणाम झाले आहेत?

६. लिंगभाव नियोजन आणि विश्लेषणामध्ये प्रकल्प आणि कार्यक्रम कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण आहे का?

**VI. निष्कर्ष आणि शिफारसी**

१. तुमच्या कामासाठी लिंगभाव किती महत्त्वाचे आहे? या आघाडीवर तुम्ही पुरेसे करत आहात असे तुम्हाला वाटते का?

२. SIDA आणि किंवा इतर भागीदार तुम्हाला मदत करण्यासाठी काय करू शकतात?

३. कृपया ही प्रक्रिया पुढे जाण्यासाठी दोन किंवा तीन प्रमुख शिफारसी द्या.

लिंगभाव लेखापरीक्षण पडताळणी सूची हे संस्थेच्या लैंगिक समानता धोरणे, पद्धती आणि परिणामांचे मूल्यांकन करण्यासाठी आवश्यक साधन आहे. लिंगभाव असमानता जाणून घेऊन ते सुधारण्यासाठी कृती करण्यायोग्य शिफारसी तयार करण्यासाठी सर्वांगीण दृष्टीकोन सुनिश्चित प्रदान करते. पडताळणी सूचीचा नियमित वापर केल्याने संस्थांना लैंगिक समानतेच्या दिशेने त्यांच्या प्रगतीचे निरीक्षण करण्यास आणि लिंगभाव अंतर/असमानता दूर करण्यासाठी ठोस पावले उचलण्यास मदत करते.

**लिंगभाव लेखापरीक्षण पडताळणी सूची चे महत्त्व**

लिंगभाव लेखापरीक्षण पडताळणी सूची संस्थेच्या लैंगिक समानता पद्धती, धोरणे आणि एकूण परिणामांचे मूल्यमापन करून संघटित दृष्टीकोन प्रदान करते. लेखापरीक्षण प्रक्रियेत सातत्य आणि सर्वसमावेशकता सुलभ करण्यासाठ तसेच सर्व क्षेत्रांकडे लक्ष दिले गेले असल्याची खात्री करण्यासाठी

लिंगभाव सूची हे महत्वाचे साधन आहे. संस्थेच्या कार्यप्रणालीतील सर्व क्षेत्रातील लिंगभाव समानता सुनिश्चित करण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षणा पडताळणी सूची वापरली जाते. यामध्ये भरती, वेतन समानता, कार्यक्षेत्र संस्कृती, नेतृत्व प्रतिनिधित्व, छळ आणि भेदभाव यांवरील धोरणे, प्रशिक्षण, करिअर प्रगतीच्या संधी यासारख्या क्षेत्रांचा समावेश आहे. पडताळणी सूचीचे अनुसरण करून, लेखापरीक्षक लिंगभाव समानतेसाठी कोणतीही प्रमुख क्षेत्रे चुकणार नाहीत याची खात्री करतात. लैंगिक समानतेचे मूल्यमापन करण्यासाठी प्रमाणित निकष प्रदान करून व्यक्तिनिष्ठता आणि पूर्वाग्रह कमी करण्यास लिंगभाव लेखापरीक्षणात पडताळणी सूची सहाय्यक ठरते. एक उत्तम लिंगभाव लेखापरीक्षणा पडताळणी सूची संस्थांना त्यांच्या लैंगिक समानतेची मानके ठरविण्यास देखील मदत करते. तपासलेल्या क्षेत्रांचे स्पष्ट, मूर्त पुरावे आणि त्यांचे मूल्यांकन करण्यासाठी वापरलेले निकष प्रदान करून हे दस्तऐवजीकरण अंतर्गत आणि बाह्य भागधारकांना लेखापरीक्षण परिणामांचा अहवाल देण्यासाठी तसेच कालांतराने प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी उपयुक्त ठरत असते. पडताळणी सूचीतील सर्वात महत्त्वपूर्ण भूमिकांपैकी एक म्हणजे संस्थेतील लैंगिक अंतर आणि असमानता ओळखणे मग ते लैंगिक वेतनातील तफावत असो, नेतृत्वामध्ये महिलांचे कमी प्रतिनिधित्व, पक्षपाती भरती पद्धत किंवा लिंगभाव आधारित कार्यक्षेत्र असो, पडताळणी सूची लेखपरीक्षकांना असमानता ओळखण्यास मदत करून लेखापरीक्षण प्रक्रिया अधिक पारदर्शक बनवते.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न– क्रमांक ३**

**अ) बहुपर्यायी प्रश्न**

१) लिंगभाव लेखापरीक्षण यादीतील पाचव्या क्रमांकाचा प्रमुख घटक कोणता आहे?

अ) संघटनात्मक ब) निष्कर्ष आणि शिफारसी

क) कार्यक्रम आणि प्रकल्प विश्लेषण ड) सामान्य माहिती

२) संस्थेची पार्श्वभूमी, इतिहास, उद्दिष्टे आणि ध्येये लिंगभाव लेखापरीक्षण यादीच्या कोणत्या प्रमुख घटकात समाविष्ट करण्यात आली आहेत?

अ) कार्यक्रम आणि प्रकल्प विश्लेषण ब) संघटनात्मक

क) सामान्य माहिती ड) कार्यक्रम आणि प्रकल्प विश्लेषण

३) लिंगभाव लेखापरीक्षकाला कोणकोणत्या भूमिका पार पाडाव्या लागतात?

अ) धोरण पुनरावलोकन आणि विश्लेषण ब) लिंगभावातील अडथळ्यांचा परिचय करून देणे

क) समावेशन संस्कृतीला प्रोत्साहन देणे ड) वरीलपैकी सर्व

४) लिंगभाव लेखापरीक्षण यादीद्वारे कोण माहिती गोळा करतो?

अ) भागधारक ब) लेखापरीक्षक क) संस्था अध्यक्ष ड) यापैकी नाही

५) लिंगभाव लेखापरीक्षण यादीत कार्यक्रम आणि प्रकल्प विश्लेषण कोणत्या क्रमांकावर आहे?

अ) तिसऱ्या ब) पाचव्या क) चौथ्या ड) सहाव्या

### २.३.४ लिंगभाव लेखापरीक्षण: भारतातील खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्र

**(Gender Audit: Private and Public Sectors in India)**

विविध संस्थांमधील लिंगभावाचे विश्लेषण करताना जाणवते की सत्तेचे वितरण ही लिंगभाव असमानता असण्याची मुख्य चिंता आहे. भारतात सार्वजनिक क्षेत्रात प्रगती असूनही, नेतृत्व पदांवर महिलांचे प्रतिनिधित्व कमी आहे. पितृसत्ता आणि लिंगभाव भूमिकांचे समाजशास्त्रीय सिद्धांत स्पष्ट करतात की इतर क्षेत्रांप्रमाणे सार्वजनिक क्षेत्रात समाजातील पुरुषांना सत्तेच्या स्थानावर आणि स्त्रियांना गौण भूमिकांमध्ये ठेवून लैंगिक पूर्वाग्रहांना प्रतिबिंबित केले जाते. भारतात, लिंगभाव लेखापरीक्षण हे खाजगी आणि सरकारी दोन्ही क्षेत्रांमध्ये लैंगिक समानतेचे मूल्यांकन आणि प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक आहे. दोन्ही क्षेत्रांसमोर अनन्य आव्हाने असताना, लिंगभाव लेखापरीक्षणाचे उद्दिष्ट सारखेच आहे: लैंगिक असमानतेचे मूल्यांकन करणे आणि त्यांचे निराकरण करणे, सर्वसमावेशकता वाढविणे, धोरणे व पद्धती लैंगिक समानतेचे समर्थन करत असल्याची खात्री करणे. लिंगभाव लेखापरीक्षण आयोजित करण्याच्या प्रक्रियेमध्ये लिंगभाव असमानतेची क्षेत्रे ओळखण्यासाठी तसेच लिंगभाव-संबंधित उद्दिष्टांवरील प्रगती मोजण्यासाठी गुणात्मक आणि परिमाणवाचक डेटा वापरून धोरणे, पद्धती आणि परिणामांचे सर्वसमावेशक पुनरावलोकन करणे समाविष्ट असते.भारतातील खाजगी क्षेत्रातील संस्थांमध्ये, लिंगभाव लेखापरीक्षण हे लैंगिक समानता वाढवण्यासाठी महत्वाचे आहे. लिंगभाव लेखापरीक्षण संस्थेची धोरणे, पद्धती आणि कार्यक्षेत्र संस्कृतीत लिंगभाव-संवेदनशीलता आणि समानतेचे मूल्यांकन करण्यासाठी सर्वसमावेशक पुनरावलोकन करण्याचे साधन आहे. यामध्ये सर्व स्तरातील अगदी प्राथमिक स्तरापासून ते नेतृत्व भूमिकांपर्यंत लिंगभाव प्रतिनिधित्वाचे परीक्षण करणे आणि लिंगभाव वेतनातील दरी ओळखणे अंतर्भूत असते. लेखापरीक्षणामध्ये लैंगिक-विभाजन माहितीचे संकलन आणि विश्लेषण समाविष्ट असते, जसे की भरतीचे कल, पदोन्नतीचे दर, पगारातील फरक आणि वेतनवाढीतील उदासीनता. याव्यतिरिक्त, लिंगभाव लेखापरीक्षण कामाच्या ठिकाणी लिंगभाव आधारित प्रथा आणि कर्मचारी लाभ जसे की मातृत्व व पितृत्व रजा, लैंगिक छळ प्रतिबंधक धोरणे, लवचिक कामकाजाची व्यवस्था, सुरक्षितता आणि समावेशी कार्यक्षेत्रांची तरतुदींवर लक्ष ठेवते. लिंगभाव लेखपरीक्षणाचे उद्दिष्ट केवळ सुधारणेची क्षेत्रे ओळखणे नाही तर संघटनात्मक संरचना, संस्कृती किंवा धोरणांद्वारे लिंगभाव-आधारित पूर्वाग्रहांवर प्रकाश टाकणे देखील आहे. भारतात, खाजगी क्षेत्रात अजूनही टिकून राहिलेल्या लक्षणीय लैंगिक असमानता लक्षात घेता लिंगभाव लेखापरीक्षण काळाची गरज देखील आहे. वरिष्ठ नेतृत्व भूमिकांमध्ये, तंत्रज्ञान, वित्त आणि उत्पादन उद्योगांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व कमी दिसते. तथापि, काही प्रगतीशील कंपन्या, विशेषत: बहुराष्ट्रीय कंपन्या आणि जागतिक ओळख असलेल्या मोठ्या भारतीय कंपन्यांनी, त्यांच्या व्यापक विविधता आणि समावेशन धोरणांचा भाग म्हणून लिंगभाव लेखापरीक्षण स्वीकारण्यास सुरुवात केलेली दिसते. या लेखापरीक्षणांमुळे महिलांसाठी लक्ष्यित भरती धोरणांची अंमलबजावणी करणे, मार्गदर्शन

कार्यक्रमांची स्थापना करणे, नेतृत्व विकास उपक्रम सुरू करणे आणि समान वेतन आणि भेदभावविरोधी धोरणांमध्ये सुधारणा यासारख्या विशिष्ट कृती योजना तयार केल्या जात आहेत. विश्वास, सुरक्षितता आणि समान संधीचे वातावरण निर्माण करून त्यांची कार्यस्थळ संस्कृती सुधारण्यासाठी कंपन्या लिंगभाव लेखापरीक्षण राबवतात. या मूल्यमापनातून मिळालेली अंतर्दृष्टी केवळ कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा २०१३ सारख्या कायदेशीर चौकटींचे पालन करण्यासाठी उपयुक्त नाही तर अधिक वैविध्यपूर्ण आणि सशक्त कार्यबल तयार करण्यात, कर्मचाऱ्यांचे समाधान, प्रतिधारण आणि एकूण संघटनात्मक कामगिरी वाढविण्यात मदत करते. लहान कंपन्या ज्यांच्याकडे संसाधने नाहीत, त्यांच्या समोर व्यापक लिंगभाव सुधारणा लागू करण्याची संस्थात्मक बांधिलकीची आव्हाने कायम आहेत. तथापि, भारताच्या कॉर्पोरेट क्षेत्रातील लिंगभाव लेखापरीक्षणाची वाढती गती अधिक समावेशक, निष्पक्ष आणि न्याय्य कार्यस्थळांकडे सकारात्मक बदल दर्शवते. भारतातील सरकारी क्षेत्रात, लैंगिक समानता धोरणांच्या अंमलबजावणीचे लेखापरीक्षण, सरकारी कार्यक्रमांच्या लिंगभाव प्रतिसादाचे मूल्यांकन आणि सार्वजनिक सेवा सर्व लिंगभावांसाठी समान पद्धतीने उपलब्ध आहेत याची खात्री करण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षण आवश्यक आहे. सरकारी संस्थांमधील लिंगभाव लेखापरीक्षण सामान्यतः आरोग्य, शिक्षण, कल्याण, पायाभूत सुविधा आणि प्रशासन यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये धोरणे, नियोजन, अंदाजपत्रके आणि अंमलबजावणीमध्ये लिंगभाव विचारांचे एकत्रीकरण तपासण्यावर लक्ष केंद्रित करते. भारतात लिंगभाव अर्थसंकल्प प्रथम २००५-०६ च्या अर्थसंकल्पात सादर करण्यात आले. मंत्रालये/विभागांनी दिलेल्या माहितीच्या आधारे, लिंगभाव अर्थसंकल्प निवेदन तयार केले जाते. विधी आणि प्रशासकीय चौकटीत लैंगिक समस्या किती चांगल्या प्रकारे प्रतिबिंबित होतात आणि लिंगभाव-संवेदनशील धोरणे किती प्रभावीपणे अंमलात आणली जातात याचे विश्लेषण करणे हे सरकारी क्षेत्रातील लिंगभाव मूल्यमापनात समाविष्ट आहे. या लेखापरीक्षणाचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे, जे स्त्रिया-पुरुष आणि उपेक्षित लिंगभाव गटांमूळे संसाधनांची उपलब्धता, निर्णय घेणे किंवा सामाजिक सेवा अशा क्षेत्रांपासून वगळले जाऊ शकतात किंवा वंचित ठेवले जाऊ शकतात त्यांच्या लिंगभाव डेटाचे पुनरावलोकन करणे. लेखापरीक्षण विद्यमान लिंगभाव-प्रतिसाद कार्यक्रमांच्या परिणामकारकतेची देखील छाननी करते ज्यामध्ये महिला सुरक्षा, शिक्षण आणि आर्थिक सक्षमीकरणाशी संबंधित बाबी अंतर्भूत आहेत. देशातील सामाजिक-सांस्कृतिक आव्हाने आणि रोजगार, शिक्षण, आरोग्यसेवा आणि राजकीय सहभाग यासारख्या क्षेत्रांमध्ये लैंगिक असमानता कमी करण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेपांची आवश्यकता लक्षात घेता सरकारी क्षेत्रातील लिंगभाव लेखापरीक्षण महत्वाचे ठरते. उदाहरणार्थ, बेटी बचाओ बेटी पढाओ किंवा प्रधानमंत्री उज्ज्वला योजना (गरीब महिलांना एलपीजी कनेक्शन प्रदान करण्याचा कार्यक्रम) यांसारख्या सरकारी योजना इच्छित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत आहेत आणि लिंगभाव समानता व उद्दिष्टे साध्य करत आहेत की नाही हे तपसण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षण मदत करते. शिवाय, लिंगभाव लेखापरीक्षण पंचायतींच्या माध्यमातून स्थानिक प्रशासनासह सरकारच्या विविध स्तरांवर निर्णय घेणाऱ्या संस्थांमध्ये महिलांच्या सहभागातील अडथळे ओळखण्यात मदत करतात. अशा मूल्यमापनाद्वारे, धोरणातील तफावत आणि अंमलबजावणीतील त्रुटी दूर करून उत्तम उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेला चालना मिळु शकते. लिंगभाव मूल्यमापनामधील निष्कर्ष अनेकदा सुधारात्मक उपायांचा परिचय करून देतात, जसे

लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी सार्वजनिक सेवा भरतीमध्ये सुधारणा, लिंगभाव-विशिष्ट अर्थसंकल्प वाटप किंवा पारंपारिकपणे पुरुष-प्रधान क्षेत्रातील महिलांना सक्षम करण्यासाठी नवीन कार्यक्रमांची स्थापना इ. भारताची प्रगतीच्या दिशेने वाटचाल असूनही, अनेक सरकारी विभागांमध्ये लैंगिक जागृतीचा अभाव, बदलाला विरोध आणि सर्वसमावेशक लेखापरीक्षणासाठी मर्यादित क्षमता यासारखी आव्हाने कायम आहेत. तरीसुद्धा, भारताच्या सार्वजनिक क्षेत्रातील लैंगिक समानता वाढवण्यासाठी लिंगभाव लेखापरीक्षण महत्त्वपूर्ण असल्याचे सिद्ध झाले आहे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न- क्रमांक ४**

**अ) बहुपर्यायी प्रश्न**

१) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा कोणत्या वर्षी मंजूर करण्यात आला?

अ) २०१०   ब) २०१४   क) २००९   ड) २०१३

२) लिंगभाव अर्थसंकल्प प्रथम कोणत्या वर्षीच्या अर्थसंकल्पात सादर करण्यात आले?

अ) २००५-०६   ब) २००९-१०   क) २००८-०९   ड) २०११-१२

३) भारताची प्रगती दिशेत वाटचाल असूनही कोणती आव्हाने आहेत?

अ) बदलाला विरोध   ब) सरकारी विभागांमध्ये लैंगिक जागृतीचा अभाव

क) सर्वसमावेशक लेखापरीक्षणासाठी मर्यादित क्षमता

ड) वरीलपैकी सर्व

४) लिंगभाव मूल्यमापनात कोणकोणत्या बाबींवर लक्ष दिले जाते?

अ) लिंगभाव समावेशन जोपासणे   ब) कामाच्या ठिकाणी लिंगभाव समानता ठेवणे

क) लिंगभाव आधारित भेदभाव नष्ट करणे   ड) वरीलपैकी सर्व

५) १९७५ मध्ये पहिली आंतरराष्ट्रीय महिला परिषद कुठे आयोजित करण्यात आली होती?

अ) मेक्सिको   ब) नैरोबी   क) फ्रांस   ड) चीन

## २.४ सारांश

या दुसऱ्या घटकात तुम्ही लिंगभाव लेखापरीक्षण कसे करावे याविषयेचे विभाग अभ्यासले आहेत. लिंगभाव लेखापरीक्षणाच्या इतिहासात लिंगभाव लेखापरीक्षणाचा प्रारंभिक पाया, ते एक संस्थात्मक साधन, जागतिक फ्रेमवर्क, लिंगभाव मुख्यप्रवाहसाठीचे साधन म्हणून कसे पुढे आले ते पाहिले. लिंगभाव लेखापरीक्षणाची उद्दिष्टे समजावून घेतली. तसेच लिंगभाव लेखापरीक्षणाची गरज आपण या घटकात समजून घेतली आहे. लिंगभाव लेखापरीक्षण प्रक्रियेतील टप्पे आपण समजून घेतले ज्यामध्ये नियोजन, लेखापरीक्षण पार पडण्याचा टप्पा, मसुदा अहवाल व अंतिम अहवाल असे चार टप्पे आपण समजून घेतले आहेत. लिंगभाव लेखापरीक्षणासाठी लेखापरिक्षकांची भूमिका व लिंगभाव लेखापरीक्षणाची यादीची प्रश्नावली समजून

घेतली आणि शेवटच्या विभागात भारतातील खाजगी आणि सरकारी क्षेत्रातील लिंगभाव लेखापरीक्षणाचा अभ्यास केला आहे.

## २.५ स्मरणार्थ संज्ञा

**लिंगभाव लेखापरीक्षण –** लिंगभाव लेखापरीक्षण हे संस्थांमध्ये त्यांची धोरणे, कार्यक्रम, प्रकल्प आणि/किंवा सेवांच्या तरतुदी, संरचना, कार्यवाही आणि बजेट यासह लैंगिक समानतेचे संस्थात्मकीकरणाचे मूल्यांकन आणि तपासणी करण्याचे साधन आहे.

**लिंगभाव आणि विकास दृष्टिकोन–** (Gender And Development) दृष्टीकोन ही सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संरचनांमधील लैंगिक असमानतेचे विश्लेषण आणि निराकरण करणारी एक चौकट आहे.

**International Women's Suffrage Alliance-** इंटरनॅशनल वुमेन्स सफ्रेज अलायन्स (IWSA) ही एक प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्था होती ज्याने महिलांच्या मताधिकारासाठी मोहीम चालवली होती.

**The Convention on the Elimination of All Forms of Discrimination against Women–** द कन्व्हेन्शन ऑन द एलिमिनेशन ऑफ द एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्म्स ऑल फॉर्म्स डिस्क्रिमिनेशन विरुद्ध महिला (CEDAW): लैंगिक भेदभाव – आंतरराष्ट्रीय क्रियाकलाप. उएऊअथ १९७९ मध्ये यूएन जनरल असेंब्लीने स्वीकारले आणि ३ सप्टेंबर १९८१ रोजी अंमलात आले.

**लिंगभाव मुख्यप्रवाह (Gender Mainstreaming)**– हा एक धोरण बनवण्याचा दृष्टीकोन आहे ज्यामध्ये स्त्री आणि पुरुष दोघांच्याही गरजा आणि समस्या विचारात घेऊन धोरणे तयार केली जातात.

**नॉन–बायनरी व्यक्ती (Non-Binary)** ही अशा लोकांसाठी एक संयुक्त संज्ञा आहे ज्यांची लिंगभाव ओळख स्त्री किंवा पुरुष नाही.

## २.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयंअध्ययनासाठी प्रश्न– क्रमांक १ ची उत्तरे

१) क – १९७५ २) अ – नैरोबी ३) क – १९९२ ४) ड – वरीलपैकी सर्व

५) ड – लिंगभाव अंतर वाढविणे

स्वयंअध्ययनासाठी प्रश्न– क्रमांक २ ची उत्तरे

१) क – नियोजन २) क – अ व ब दोन्ही ३) ब – अंतिम अहवाल

४) ड – सात ५) क – चार

स्वयंअध्ययनासाठी प्रश्न- क्रमांक ३ ची उत्तरे

१) अ - संघटनात्मक    २) क - सामान्य माहिती    ३) ड - वरीलपैकी सर्व

४) ब - लेखापरीक्षक    ५) क - चौथ्या

स्वयंअध्ययनासाठी प्रश्न- क्रमांक ४ ची उत्तरे

१) ड - २०१३    २) अ - २००५-०६ ३) ड - वरीलपैकी सर्व    ४) ड - वरीलपैकी सर्व

५) अ - मेक्सिको

## २.७ स्वाध्याय

अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या.

१) लिंगभाव लेखापरीक्षणाचा इतिहास सविस्तर स्पष्ट करा.

२) लिंगभाव लेखापरीक्षणाची उद्दिष्टे स्पष्ट करा.

३) लिंगभाव लेखापरीक्षण प्रक्रिया सविस्तर लिहा.

४) लिंगभाव लेखापरीक्षकाच्या भूमिका लिहा.

५) भारतातील सरकारी क्षेत्रातील लिंगभाव लेखापरीक्षण सविस्तर स्पष्ट करा.

ब) टिपा लिहा.

१) लिंगभाव लेखापरीक्षण सूची

२) खाजगी क्षेत्रातील लिंगभाव लेखापरीक्षण

३) लिंगभाव लेखापरीक्षणाची गरज

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


- कमला भसीन, तांबे श्रुती (२०१०), लिंगभाव समजून घेताना- (मराठी अनुवाद), लोकवाङ्मय गृह, मुंबई
- Inter Action (2010), The Gender Audit Handbook, A Tool for Organizational Self-Assessment and Transformation
- International Labour Organisation (2012), A Manual for Gender Audit Facilitators, The ILO Participatory Gender Audit Methodology
- UNICEF (2012), Gender Audit Manual, A social audit tool to monitor the progress of Viet Nam’s Socio-Economic Development Plan
- UN Women (2023), Gender Audit Guide


❑❑❑